ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४४ | अंक ४ | पाने ५६ | नोव्हेंबर २०१६ | मूल्य २२ रु.

## 'कर विषयक सुधारणा'


कर सुधारणा - भूत, वर्तमान आणि भविष्य :
टी. एन. अशोक

जीएसटीचा सामान्य माणसावरील परिणाम
डॉ. रणजीत मेहता

जीएसटी आणि घटनात्मक दुविधा
जयंत रॉय चौधरी

भारतीय करप्रणाली
मालिनी चक्रवर्ती






(विशेष लेख)
वस्तू व सेवा कर आणि आंतरराष्ट्रीय अनुभव
प्रवाकर साहू व अश्वनी बिश्नोई

(फोकस)
काळ्या पैशाच्या प्रतिबंधासाठी सरकारचे युद्धपातळीवर प्रयत्न
दिलाशा सेठ

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४४ ❖ ❖ अंक ४ ❖ ❖ नोव्हेंबर २०१६ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| ■ कर सुधारणा - भूत, वर्तमान आणि भविष्य | टी. एन. अशोक | ५ |
| ■ जीएसटीचा सामान्य माणसावरील परिणाम | डॉ. रणजीत मेहता | १० |
| ■ कौटिल्यकालीन करपद्धती | रेश्मा घाणेकर | १४ |
| ■ जीएसटी आणि घटनात्मक दुविधा | जयंत रॉय चौधरी | १७ |
| ■ अप्रत्यक्ष कर सुधारणांचा आलेख | नजीब शाह | २१ |
| ■ काळ्या पैशाच्या प्रतिबंधासाठी सरकारचे युद्धपातळीवरील प्रयत्न (फोकस) | दिलाशा सेठ | २७ |
| ■ पगारदार आणि आयकर | डॉ. रवींद्र न. सोनटक्के | ३४ |
| ■ वस्तु आणि सेवा कर : एक देश, एक कर | शिशिर सिन्हा | ३७ |
| ■ वस्तू व सेवा कर आणि आंतरराष्ट्रीय अनुभव (विशेष लेख) | प्रवाकर साहू व अश्वनी बिश्नोई | ४३ |
| ■ भारतीय करप्रणाली | मालिनी चक्रवर्ती | ४६ |
| ■ अप्रत्यक्ष कर आणि अर्थव्यवस्था | वैभव वझे | ५१ |

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक
योजना

संपादकीय

# कर सुधारणा: आश्वासक वाटचाल

कर- हा शब्द उच्चारला कि आपल्यासमोर चित्र उभे राहते ते एखाद्या व्यावसायिकाच्या घरावर पडलेल्या धाडीचे किंवा शेवटच्या दिवशी आयकर भरण्यासाठी धावपळ करणाऱ्या एखाद्या व्यक्तीचे. अशारीतीने कर हा शब्द काहीसा भीतीदायक वाटत असला तरी कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी कर नितांत गरजेचे असतात, हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही. एखाद्या देशाचे नागरिक भरत असलेल्या करातूनच शिक्षण, रस्ते-पूल बांधणी, धरणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्था यासारखी देशहिताची आणि समाजपयोगी विकासकामे केली जातात.

राजा महाराजांच्या काळापासून करवसुलीची पद्धत भारतात प्रचलित असल्याचे आढळून येते. त्यातल्या त्यात अशोक आणि अकबर या राजांनी राबविलेली करपद्धती उल्लेखनीय मानली जाते. त्यांनी राज्यशकट चालविण्यासाठी आवश्यक महसूल करांद्वारे मिळविताना सामान्य जनतेवर जास्त भार पडणार नाही, याची काळजी घेतली होती. अर्थात, काही राजांनी आपल्या विलासी राहणीमानासाठी आणि युद्धे लढण्यासाठी प्रजेवर अन्यायकारक कर लादल्याचीही बरीच उदाहरणे आपल्याकडे आहेत. आजच्या आधुनिक काळात विविध कायदे आणि नियमाच्या अधीन राहून लोकप्रतिनिधींच्या निगराणीखाली करांचे नियमन केले जाते.

केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना महसूल प्राप्तीसाठी वेगवेगळे कर आणि अधिभार लावण्याची मुभा असल्यामुळे भारतीय करपद्धती ही सर्वात क्लिष्ठ मानली जाते. भारतात विविध प्रकारचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर वेगवेगळ्या पातळीवर गोळा केले जातात. यातील आयकर आणि मालमता कर यासारखे कर सामान्य माणसांना थेट प्रभावित करणारे आहेत. याचप्रमाणे व्हॅट, सेवाकर आणि कॉर्पोरेट टॅक्स ही झाली अप्रत्यक्ष करांची उदाहरणे. प्रत्येक अर्थसंकल्पाकडून सामान्य नागरिक आणि कॉर्पोरेट क्षेत्राला करसुधारणांची अपेक्षा असते. सामान्य नागरिकांना कर श्रेणीमधील उत्पन्नाची मर्यादा वाढवून हवी असते तर कॉर्पोरेट जगताला विविध क्षेत्रांसाठी जास्त करसवलत हवी असते. आर्थिक गरजांनुसार सरकार या अपेक्षांच्या पूर्ततेसंदर्भात निर्णय घेत असते. मागील काही वर्षात भारताची मोठ्या प्रमाणावर आर्थिक वाढ होत आहे. त्यामुळे या वाढीला पोषक अशी स्थिती निर्माण करण्यासाठी विदेशी तसेच देशी गुंतवणूकदारांसाठी सुटसुटीत, आकर्षक आणि आश्वासक ठरतील अशा करसुधारणा करणे गरजेचे बनले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांना अनुसरून मागील दशकभरापासून भारतीय करपद्धतीमध्ये न्याय्य आणि साधे -सुटसुटीत करविषयक कायदे याद्वारे उल्लेखनीय परिवर्तन घडताना दिसून येत आहे.

अलीकडेच मंजूर करण्यात आलेला वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी कायदा हा भारताच्या करविषयक सुधारणांच्या इतिहासातील सर्वात महत्वाची घटना म्हणावी लागेल. वस्तू आणि सेवांसाठी एक देश एक कर ही रचना जीएसटीमुळे अस्तित्वात येणार आहे. राज्ये आकारात असलेले आणि संघराज्य पातळीवरील सुमारे १५ कर जीएसटीमुळे बंद होणार आहेत. जीएसटीला पन्नास टक्के राज्यांची मान्यता घेण्याची अट सरकारने केंव्हाच पूर्ण केल्यामुळे १ एप्रिल २०१७ पासून जीएसटीच्या रूपात भारत नव्या युगात प्रवेश करणे जवळपास निश्चित आहे. मैलाचा दगड ठरणारी ही करसुधारणा भारतात उद्योग-व्यवसाय करणे सहज-सुलभ करण्यास मदत करणारी तसेच जागतिक व्यापार स्पर्धेत देशाला सक्षम करणारी ठरणार आहे.

सोपी करपद्धती निर्माण करण्याच्या दिशेतील जीएसटी हे महत्वाचे पाऊल असून काळया पैशाच्या समस्येचा मुकाबला करण्यासाठी त्याचा मोठा उपयोग होणार आहे. कायदे, धोरणे आणि तंत्रज्ञान अशा विविध पद्धतीने सरकार काळ्या पैशाच्या उच्चाटनासाठी युद्धपातळीवर काम करीत आहे.

बंदिस्त आणि किचकट या स्वरूपापासून भारतीय करपद्धतीचा प्रवास मुक्त, सोपी आणि आशादायी या दिशेने झाला आहे. विद्यमान सरकार त्यापुढे जाऊन भारताला गुंतवणूक आणि उत्पादनासाठी सर्वात चांगले ठिकाण बनविण्यासाठी कटीबद्ध आहे.

■■■

# कर सुधारणा - भूत, वर्तमान आणि भविष्य

टी. एन. अशोक



**कोणतीही करप्रणाली ही संयुक्तिक, योग्य आणि निष्पक्षपाती असली पाहिजे ज्यामुळे थेट कर भरण्याच्या वर्गवारीत येणारी व्यक्ती आणि मोठ्या प्रमाणात अप्रत्यक्ष कर भरणारे कंपन्या व उद्योग क्षेत्र केवळ कर भरणारे होऊ नये तर कर भरणे हे त्याला सामाजिक व नागरी दायित्व वाटले पाहिजे, जे कोणत्याही सरकारला विकास प्रकल्प हाती घेण्यासाठी अत्यंत महत्वाचे असते.**

करसुधारणा हा कोणत्याही देशाच्या विकास प्रक्रियेचा अंतर्गत घटक असतो. इंग्लंड आणि अमेरिकेसारख्या प्रगत देशांमध्येही जे भारतासारख्या विकसनशील देशांसाठी आदर्श म्हणून मानले जातात, त्यांनीही गेल्या काही वर्षांत करसुधारणा हाती घेतल्या आहेत.

युनायटेड किंग्डम (इंग्लंड) चे प्रकरण : काँझर्व्हेटिव्ह उदारमतवादी आघाडी सरकारने २०१० ते २०१५ या दरम्यान करसुधारणा राबवल्या. २०१३ मध्ये जेव्हा सुधारणा सुरू करण्यात आल्या, त्यावेळेस इंग्लंडच्या अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात २० लाख लोकांना प्राप्तीकरातून मुक्त करण्यात आले. सुधारणांच्या या तराफ्यातून वैयक्तिक भत्त्यात वृद्धी आणली गेली, ज्याचा अर्थ असा होता की, ९,४४० स्टर्लिंग पौंड पर्यंत कमाई असलेल्या कुणालाही कसलाही कर द्यावा लागणार नाही. कर भरण्यासाठीची किमान मर्यादा- ज्याच्या वरील उत्पन्नासाठी लोकाना ४० टक्के कर द्यावा लागेल ती वैयक्तिक भत्ता वगळून ३४,३७० स्टर्लिंग पौंडावरून ३२,०१० स्टर्लिंग पौंडापर्यंत आणण्यात आली.

त्याचवेळेस ज्यांचे करपात्र उत्पन्न १,५०,००० स्टर्लिंग पौंडापेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी उच्च कराचा दर २०१३-१४ मध्ये ५० टक्क्यांवरून ४५ टक्के खाली आला.

अमेरिकेसारख्या देशाचे उदाहरण : मुक्त व्यापार आणि प्रगत अर्थव्यवस्थेचे प्रतीक म्हणून असलेल्या युनायटेड स्टेट्ससारख्या देशाला करसुधारणांची कधी नव्हे इतकी गरज होती. याची जाणीव होऊन दोन कायदे मंडळ सदस्यांनी व्यापक करसुधारणा राबवण्याचा प्रयत्न केला आहे. सिनेटच्या करलेखन समितीचे प्रमुख डेमोक्रेटिक पक्षाचे मॅक्स बाऊकस आणि प्रतिनिधी सभेतील त्यांचे रिपब्लिकन सहकारी डेव्ह कॅम्प हे तीन वर्षांपासून हा प्रयोग करत आहेत, लोकांशी बोलत आहेत तसेच नवीन कल्पना मांडत आहेत. संपूर्ण योजना अजून आकारास यायची असली तरीही त्यांची तत्वे उत्तम आहेत - करसवलतींवर (tax breaks) मर्यादा आणून अथवा त्या रद्द करुन कंपन्या आणि व्यक्तिगत दोघांसाठीही कराचे दर खाली आणणे.

कॅम्प आणि बाऊकस दोघेही वेगवेगळ्या पक्षांचे असले तरीही दोघांनाही असे तात्विक दृष्ट्या वाटते की, कोणत्याही करसवलती जशा की

लोकप्रिय असलेले धर्मादाय, गृहनिर्माण, आरोग्य विमा व संशोधन आणि विकास सोडता कामा नये. इच्छित असले तरीही त्यांच्यामुळे उच्च करांच्या स्वरूपात अन्य इच्छित गोष्टींवर किमत लादली जाते. इकॉनॉमिस्टमधील लेखातून निर्देशन केल्याप्रमाणे काही करसवलती टिकून राहतीलच, कारण पैसा उभारण्यासाठी सर्वात योग्य मार्ग मानला जाणाऱ्या कार्बन कराबाबत काहीच आशा नाही.

तरीही कॅम्प आणि बाऊकस यांना अधिक परिणामकारक करप्रणाली उभारण्यासाठी पुरेशी सामायिक पार्श्वभूमी सापडली. मात्र कर सुधारणांमुळे अधिक उत्पन्न वाढवावे का, या महत्वाच्या प्रश्नांवर त्यांचे मतभेद झाले. रिपब्लिकन असलेल्या कॅम्प यांना तसे होऊ नये असे वाटले तर बाऊकस यांना अध्यक्ष बराक यांच्या नेतृत्वाखालील इतर रिपब्लिकन सहकाऱ्यांप्रमाणेच उत्पन्न वाढवावे, असे वाटत होते.

म्हणून भारतही करसुधारणांना अपवाद नाही. ९० च्या दशकाच्या सुरुवातीला आर्थिक सुधारणा सुरू केल्यापासून करसुधारणा याही तातडीची गरज बनल्या होत्या. भरपूर विचारविनिमय केल्यावर तेव्हाच्या सरकारला असे वाटले की, कोणतीही करप्रणाली ही संयुक्तिक, योग्य आणि निष्पक्षपाती असली पाहिजे ज्यामुळे थेट कर भरण्याच्या वर्गवारीत येणारी व्यक्ती आणि मोठ्या प्रमाणात अप्रत्यक्ष कर भरणारे कंपन्या व उद्योग क्षेत्र केवळ कर भरणारे होऊ नये तर कर भरणे हे त्याला सामाजिक व नागरी दायित्व वाटले पाहिजे, जे कोणत्याही सरकारला विकास प्रकल्प हाती घेण्यासाठी अत्यंत महत्वाचे असते.

२०१६ पर्यंतच्या सर्व सरकारांच्या माध्यमातून करसुधारणा ही चालत आलेली चैतन्यदायी प्रक्रिया आहे. मूलभूत तत्वे ही तीच राहिली आहेत, पारदर्शक, समन्यायी आणि योग्य करप्रणाली ही राबवण्यास सहज आहे. आतापर्यंतच्या सरकारानी सातत्याने थेट कर रचनेचे सुसुत्रीकरण असे केले आहे की, व्यक्तिगत करदात्याला जास्तीत जास्त फायदा व्हावा.

***अधिकाधिक लोकांना कराच्या जाळ्यात आणण्यासाठी सरकार अधिकाधिक करसुधारणा राबवून कर गोळा करण्यात आघाडी घेत असले तरीही या सर्वात ठळकपणे उठून दिसणारी एकच करसुधारणा म्हणजे वस्तू व सेवा कर आहे (जीएसटी). सर्व करांचा क्रमवार संग्रह करून एकच कर लावल्याने उत्पादकांना एकाच देशात अनेक करांचा सामना करावा लागणार नाही आणि मालवाहतूकही सोपी होणार आहे.***

वर्षानुवर्षांपासून किरकोळ का होईना, परंतु प्रारंभिक करप्रणालीवरील मर्यादा हटवण्यात आल्या असून करांची रचना तीन सुटसुटीत आणि साध्या पद्धतीच्या स्लॅबमध्ये करण्यात आली आहे. २.५० लाख ते ५ लाख ते १० लाखांपर्यंतच्या उत्पन्नासाठी १० टक्के, २० टक्के आणि ३० टक्के कर आहे. त्यानुसार अडीच लाखापर्यंत कमावणाऱ्यांना कोणताही कर नाही, अडीच लाख ते ५ लाख कमावणाऱ्यांना १० टक्के कर, ५ लाख ते १० लाख कमावणाऱ्यांना २० टक्के कर व १० लाखांच्या वरच्या उत्पन्नासाठी ३० टक्के सरसकट कर द्यावा लागेल.

अनेक प्रकारच्या प्रयोगांवर विचार करुन कंपनी कर आणि कस्टम कर आता सुलभ करण्यात आले आहेत. या सर्वांचा मुख्य उद्देश्य हा लोकांना कर भरण्यास प्रोत्साहन देणे आणि जास्तीत जास्त लोकांना कराच्या जाळ्यात आणणे हाच होता. करांच्या जीडीपीतील वाट्याचे प्रमाण प्रागतिक असले तरीही करांचे लोकसंख्येच्या बाबतीतील प्रमाण अत्यंत दयनीय आहे. फक्त २ टक्के लोकसंख्या कर भरते, असे सांगितले जाते. आणि हे कर भरणारेही नागरी वस्तीतच अधिकाधिक आहेत.

अधिकाधिक लोकांना कराच्या जाळ्यात आणण्यासाठी सरकार अधिकाधिक करसुधारणा राबवून कर गोळा करण्यात आघाडी घेत असले तरीही या सर्वात ठळक पणे उठून दिसणारी एकच करसुधारणा म्हणजे वस्तू व सेवा कर आहे (जीएसटी). सर्व करांचा क्रमवार संग्रह करून एकच कर लावल्याने उत्पादकांना एकाच देशात अनेक करांचा सामना करावा लागणार नाही आणि मालवाहतूकही सोपी होणार आहे.

संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मान्यता देण्यापूर्वी इतकी वळणे आणि अनिश्चितता पार करून आलेले जीएसटी ऐतिहासिक विधेयक का आहे, ते आता पाहू या.

जीएसटी ग्राहकाला राजा बनवते. मे २०१५ मध्ये प्रथम लोकसभेने १२२ वे घटनादुरुस्ती विधेयक मंजूर केले, नंतर राज्यसभेने त्यात केलेल्या बदलांना मान्यता देण्यासाठी पुन्हा ते खालच्या सभागृहात मांडण्यात आले. अखेर

दोन्ही सभागृहांनी त्यास मान्यता दिली आणि आता राष्ट्रपतींचीही त्यास मंजुरी मिळाली आहे. १ टक्का अतिरिक्त कर रद्द करण्यासह सरकारने सहा अधिकृत दुरुस्त्या सुचवल्या असून वरिष्ठ सभागृहानेही त्यास मंजुरी दिली आहे.

जीएसटी हा असा वैधानिक उपाय आहे की, ज्यामुळे अर्थव्यवस्था पारदर्शकतेकडे वाटचाल करू लागेल आणि सर्वात महत्वाचे म्हणजे एक देश एक कर ही संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे. जीएसटी राजवटीखालील कराचा दर हा किमान व्यवहार्य असेल आणि कोणतेही राज्य सरकार उच्च कराचा दर लावून लोकांच्या रोषाचा धनी होणार नाही. अंतिम कराचा दर हा जीएसटी मंडळाकडून ठरवला जाईल. आता या विधेयकावर २९ पैकी किमान १६ राज्यांच्या विधानसभांनी शिक्कामोर्तब करावे लागेल, जे लवकरात लवकर होईल, अशी आशा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे.

केंद्रीय आणि राज्य सरकारांच्या एकाच वेळेस लावण्यात येत असलेल्या वेगवेगळ्या करांच्या गर्दीतून जीएसटीमुळे एकच आर्थिक मार्ग समोर येणार आहे. न्यूयॉर्क टाईम्सने तर भारताने सर्वप्रथम जेव्हा १९९१ मध्ये आपली बाजारपेठ खुली केली त्यानंतर हे विधेयक म्हणजे आतापर्यंतची सर्वात मोठी सुधारणा असल्याचे वर्णन केले आहे. विकसनशील जगातील सर्वात चैतन्यदायी अर्थव्यवस्था असलेल्या भारतात वेगवेगळ्या राज्यांतील वेगवेगळ्या कर संहितांच्या मती गुंग करणाऱ्या जाळ्यामुळे अडथळा येत असून यामुळे राज्याराज्यांतील व्यवसाय करण्यास नाउमेद केले जात आहे.

या समस्येशी सामना करण्यासाठी अधिकाऱ्यांना बळ देणारे जीएसटी हे मोठे यश मानले जात असून अखेरीस अशी एकसमान अर्थव्यवस्था तयार होणार असून ज्यामुळे व्यवसायांना देशव्यापी विस्तार अत्यंत सुलभपणे करता येईल, असे निरीक्षण न्यूयॉर्क टाईम्सने नोंदवले आहे. हे प्रदीर्घ काळापासून प्रतिक्षित आणि व्यवसायस्नेही वातावरणासाठी मोठ्या प्रमाणावर परिणामकारक होते तसेच भारत आपली अर्थव्यवस्था २१ व्या शतकाकडे घेऊन जात आहे, हे जगाला दाखवण्यासाठीही होते, असे

***राज्यांना त्यांचा योग्य वाटा मिळेल, या सहकारी संघराज्यवादाच्या सध्याच्या सरकारच्या विचारसरणीच्या अनुसारच जीएसटीची रचना केली आहे. राज्यांनी केंद्राच्या हातात हात मिळवून पुढे वाटचाल करावी, या केंद्राच्या विचारसरणीत राज्यांनाही आणण्याच्या दृष्टीने राज्यांना अधिक वाटा सुपूर्द करावा, अशा पद्धतीने कर महसुली वाटपाचे सूत्र सरकारने ठरवले आहे.***

कार्नेजी एंडोमेंट फॉर इंटरनॅशनल पीसमधील दक्षिण आशिया कार्यक्रम या संस्थेतील वरिष्ठ सहयोगी मिलन वैष्णव यांनी म्हटल्याचा हवाला देण्यात आला आहे.

जीएसटी सध्याच्या १५ राज्य व केंद्र सरकारच्या करांची जागा घेणार असून भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर ०.५ ते २ टक्क्यांनी वाढवण्यास मदत करणार आहे. केंद्र व राज्य सरकारांनी देशाच्या फायद्यासाठी एकत्रितपणे काम करावे ज्यात राज्यांना त्यांचा योग्य वाटा मिळेल, या सहकारी संघराज्यवादाच्या सध्याच्या सरकारच्या विचारसरणीच्या अनुसारच जीएसटीची रचना केली आहे. राज्यांनी केंद्राच्या हातात हात मिळवून पुढे वाटचाल करावी, या केंद्राच्या विचारसरणीत राज्यांनाही आणण्याच्या दृष्टीने राज्यांना अधिक वाटा सुपूर्द करावा, अशा पद्धतीने कर महसुली वाटपाचे सूत्र सरकारने ठरवले आहे.

या सर्वांची सुरुवात १९९१ मध्ये झाली जेव्हा सरकारने राज्यांना करांच्या अधिक वाट्यासह अधिकाधिक सत्ता सुपूर्द करण्याचा आर्थिक सुधारणा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर स्वीकारला. एकाचवेळेस आकारण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या करांमुळे विकासाला रोखून धरले आहे, हे जस-जसे स्पष्ट होऊ लागले तसे सर्वच सरकारांना करप्रणालीची संपूर्ण रचना बदलण्याची गरज भासू लागली होती.

जीएसटीचे लाभ संथ गतीने संभवत: २०१९ मध्ये दिसू लागतील. तसेच सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांनी सांगितल्याप्रमाणे जीएसटीच्या परिणामी महागाई उसळीही घेईल. भारतभर असलेला जीएसटी हा एकच सरसकट कर असून प्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत विशाल, गोंधळवून टाकणारा असा गुंतागुंतीचा मामला असेल, असेही सुब्रमण्यम यांनी सांगितले.

जीएसटीचे दीर्घकालीन परिणाम म्हणजे त्यामुळे परकीय गुंतवणूक आकर्षिली जाण्याची अपेक्षा असून भांडवली मालाची किंमत कमी होईल, उत्पादन क्षेत्र व निर्यात वाढेल, करवसुलीचे प्रमाण वाढेल आणि सर्वात

महत्वाचे म्हणजे काळाची गरज असलेली रोजगारनिर्मिती वाढणार आहे.

जीएसटी ही भारतातील सर्व आर्थिक सुधारणांची आई आहे, अशा शब्दांत तिचे स्वागत करण्यात आले आहे. व्यवसाय प्रमुख आणि कॉर्पोरेट जगत या बदलामुळे आमच्या दैनंदिन जीवनावर सखोल परिणाम होणार आहे, असा दावा करते. जीएसटीमुळे कररुपी दहशतवादाचा अंत होणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे कारण उद्योगाच्या म्हणण्यानुसार सध्याच्या केंद्रीय व राज्यांच्या बेसुमार करांमुळे अनेकविध कर अधिकाऱ्यांकडून आमचा छळ केला जात आहे तसाच बळीही घेतला जात आहे. एका उद्योगाच्या प्रवक्त्याने असे म्हटले आहे की, बहुतेक वेळ आम्ही करभरण्याच्या औपचारिकता पूर्ण करत असतो, कर गोळा करतो, कर भरतो, अर्ज सादर करतो, आमचा पैसा व्यवस्था आणि इतर मुद्यांमध्ये अडकलेला असतो.

यामध्ये सर्वाधिक क्लेशदायक मुद्दा म्हणजे केंद्र व राज्य सरकार यांच्यात कराच्या दराचा आहे. राज्यांना आपले उत्पन्न जास्तीत जास्त वाढवायचे असल्याने उच्च दर हवा आहे तर केंद्राने महागाई भडकू नये म्हणून दर कमी ठेवण्याचा आग्रह धरला आहे. दशकांनुदशकानंतर प्रथमच भारतात आता महागाईचा दर कमी असून भारताची अर्थव्यवस्था आता ७.६ टक्के इतक्या मजबूत दराने वाढत आहे. रोजगारांत मात्र अजूनही वाढ झालेली नाही आणि कॉर्पोरेट जगत अजूनही निधीवाचून उपाशीच आहे.ज्यामुळे उत्पादन क्षेत्रांत मंदी आहे, बहुतेक होत असेलल्या वाढीच्या गतीला आयटी आणि आयटी सक्षम सेवासह सेवा क्षेत्राने चालना दिली असून त्यांचे बहुमोल निव्वळ परकीय चलन आता ३७० अब्ज अमेरिकन डॉलर एवढ्यावर गेले आहे.

जीएसटीवरच कर सुधारणांचा संपणार नाहीत. आम्हाला अजूनही आणखी एक अत्यंत महत्वाचे विधेयक थेट कर संहिता (डीटीसी) आणावे लागेल, ज्यामुळे प्रत्यक्ष करांची रचना सुटसुटीत होऊन मोठ्या प्रमाणावर लोकसंख्येला त्याचा आणखी फायदा होईल. २०१६-१७च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्रालयाने असे संकेत दिले होते की, थेट कर संहिता रद्द करण्यात येत आहे. परंतु संसदेच्या आर्थिक विषयावरील स्थायी समितीने अर्थमंत्रालयाला सांगितले की, कर सुधारणांच्या दिशेने आणखी एक मोठे पाऊल म्हणून डीटीसीच्या तरतुदी समोर आणण्याची गरज आहे.

***जीएसटीवरच कर सुधारणांचा संपणार नाहीत. आम्हाला अजूनही आणखी एक अत्यंत महत्वाचे विधेयक थेट कर संहिता (डीटीसी) आणावे लागेल, ज्यामुळे प्रत्यक्ष करांची रचना सुटसुटीत होऊन मोठ्या प्रमाणावर लोकसंख्येला त्याचा आणखी फायदा होईल. २०१६-१७च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्रालयाने असे संकेत दिले होते की, थेट कर संहिता रद्द करण्यात येत आहे.***

**डीटीसीत काय अनुस्यूत आहे ? :**

सरकारने मांडलेल्या कल्पनेनुसार, डीटीसी हे प्राप्ती कर, लाभांश वितरण कर, तदनुषंगिक लाभ कर(fringe benefits) आणि संपत्ती कर यांसारख्या थेट करांशी संबंधित सर्व कायद्यांमध्ये सुधारणा करून भारतीय प्राप्ती कर कायद्याची (१९६१) जागा नवीन करसुधारणा घेईल ज्यामुळे आर्थिकदृष्ट्या कार्यक्षम, परिणामकारक आणि समन्यायी थेट कर व्यवस्था अमलात येईल जिचा उपयोग स्वयंस्फूर्तीने करविषयक कायद्यांचे पालन व कर-जीडीपी गुणोत्तर प्रमाणात वाढ होण्यास मदत होणार आहे.

आणखी एक उद्देश्य म्हणजे तंट्यांची संख्या कमी होऊन खटल्यांची संख्या कमीत कमी होईल.कर आकारणीची सर्वमान्य तत्वे आणि सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय व्यवहार यावर आधारित असल्याने करव्यवस्थेला स्थैर्य प्रदान करण्यासाठी डीटीसी आहे. अखेरीस त्यामुळे करदात्यांची माहिती मिळवण्यासाठी एकीकृत व्यवस्था आणण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

**थेट कर संहितेची ठळक वैशिष्ट्ये**

विद्यमान प्राप्ती कर कायद्यातील २९८ विभाग आणि १४ परिशिष्टांऐवजी प्रस्तावित कर संहितेत ३१९ विभाग व२२ परिशिष्टे आहेत. एकदा अमलात आल्यावर डीटीसी आता अप्रचलित झालेल्या (जुना आणि निरुपयोगी) प्राप्ती कर कायद्याची जागा घेईल. तथापि अनेक प्राप्ती कर कायद्यातील तरतुदी डीटीसीचाही भाग असतील.म्युच्युअल फंड/युलिपला ८० सी कलमातून वगळणे, समभाग अभिमुख म्युच्युअल फंडातून किंवा युलिपद्वारे मिळवलेले उत्पन्न ५ टक्के कराच्या अधीन राहील, तदनुषंगिक लाभ कर मालकाच्या ऐवजी कर्मचाऱ्यांना लागू करणे, एकूण उत्पन्नाच्या पाच टक्के राजकीय देणगी वजावटीसाठी पात्र राहील अशा तरतुदी त्याच राहतील.

**थेट करांसाठी एकच संहिता लागू**

सर्व थेट कर एकाच संहितेखाली आणण्यात येणार असून पालन करण्याच्या

प्रक्रियेचे एकीकरण करण्यात येणार आहे ज्यामुळे एकीकृत करदात्यांच्या माहितीची व्यवस्था आणण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.डीटीसीमध्ये वापरण्यात आलेल्या साध्यासोप्या भाषेचा उपयोग करविषयक कायद्यांत स्पष्टता असावी व लोकांनी स्वयंस्फूर्तीने करभरणा करावा यासाठी केला जाणार आहे. जेथे शक्य असेल तेथे खटल्यांना कमी वाव दिला जाणार असून परस्परविरोधी अर्थ काढले जाऊ नयेत यासाठी संदिग्धता टाळण्यात आली आहे. सातत्याने सुधारणा करण्याऐवजी वाढत्या अर्थव्यवस्थेतील बदलांचा समावेश करण्यास सक्षम असे कायदे विकसित करण्यात आले आहेत.

***कॉर्पोरेट क्षेत्राकडे पुढील करविषयक सुधारणांसाठी मोठी यादी तयार आहे. किमान पर्यायी कर रद्द करणे, पूर्वलक्ष्यी कराचे भूत (कराची थकबाकी वसूल करण्यासाठी व्होडाफोन-प्राप्तीकर विभागातील तंटा) गाडून टाकणे, करसुट्टी टप्प्याटप्प्याने बंद केल्याने विशेष आर्थिक क्षेत्रातील (सेझ) गुंतवणूक कमी होत जाण्याची भीती आणि बाय बॅक समभागांसाठी भांडवली जमा कर पुन्हा लागू करण्याला या क्षेत्राचा विरोध आहे***

बहुतेक सर्व करदाते हे लहान व किरकोळ वर्गवारीतील असल्याने त्याचे प्रतिबिंब अर्जात उमटले आहे. त्यामुळे करविषयक कायदे हे तार्किकदृष्ट्या अर्जात उमटले आहेत. जेथे सर्व करांचे दर संहितेच्या पहिल्या ते चौथ्या परिशिष्टात नमूद करण्याचे प्रस्तावित आहेत, तेथे डीटीसी हे स्थैर्य प्रदान करते. ज्याद्वारे वार्षिक आर्थिक विधेयकाची गरज टाळता येईल.काही बदल करायचे असतील तर परिशिष्टांत योग्य ते बदल करून संसदेत दुरूस्ती विधेयकाद्वारे ते आणले जातील.

डीटीसीवर खूप मोठा विचार करण्यात आल्याने ती टाळता येणार नाहीच. फक्त परिभाषा बदलू शकेल, त्याला दुसरे कोणतेही नाव द्या, परंतु बहुतेक तरतुदी या करदात्यांच्या फायद्याच्या असल्याने त्या राहणारच आहेत, हे निश्चित आहे.

कॉर्पोरेट क्षेत्राकडे पुढील करविषयक सुधारणांसाठी मोठी यादी तयार आहे. किमान पर्यायी कर रद्द करणे, पूर्वलक्ष्यी कराचे भूत (कराची थकबाकी वसूल करण्यासाठी व्होडाफोन-प्राप्तीकर विभागातील तंटा) गाडून टाकणे, करसुट्टी टप्प्याटप्प्याने बंद केल्याने विशेष आर्थिक क्षेत्रातील (सेझ) गुंतवणूक कमी होत जाण्याची भीती आणि बाय बॅक समभागांसाठी भांडवली जमा कर पुन्हा लागू करण्याला या क्षेत्राचा विरोध आहे.

अशा तऱ्हेने जीएसटी ही अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या दृष्टीने गुंतवणूकदार व उत्पादकांच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी मोठी झेप आहे आणि जीडीपीच्या वाढीला चालना देण्यासाठी २०१६-१७च्या अर्थसंकल्पात आणखी सुधारणा उपाय घोषित केले जातील, अशी आशा बाळगता येईल. डीटीसी अथवा कॉर्पोरेट क्षेत्राच्या यादीबाबत सरकार वेळ घेऊ शकेल परंतु वस्तुत: सरकार व्यक्ती तसेच उद्योगांचे आयुष्य सुसह्य करण्यासाठी करविषयक कायदे सुटसुटीत करण्याच्या मुख्य उद्देश्यावर लक्ष्य केंद्रित करून राहील. शिवाय अधिकाधिक नागरिक समूहांना करांच्या जाळ्यात आणून प्रत्येक भारतीयाला कर भरण्याच्या आपल्या सामाजिक जबाबादारीबाबत सजग करुन देशाला अधिक करपालन करणारा म्हणून बनवले जाईल.

■■■

*लेखक हे पीटीआयचे माजी आर्थिक संपादक असून वित्त व पायाभूत सुविधा यात तज्ञ आहेत.प्रमुख भारतीय व आघाडीच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये त्यांनी धोरणात्मक व्यवहार व सार्वजनिक विषयांवर कॉर्पोरेट सल्लागार म्हणून काम केले आहे.*

email: shoktnex@gmail.com




विकास समर्पित
मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

# जीएसटीचा सामान्य माणसावर परिणाम

डॉ. रणजीत मेहता




**आताची कररचना ही विविध स्तरांची असून त्यात राज्य व केंद्रांचे वेगळे कर आहेत. त्यामुळे करावर कर असा परिणाम होत जातो. या करांचे दर भिन्न आहेत. विविध ठिकाणी ते वसूल केले जातात. हे कर भारतीय उत्पादनांवर कराचे ओझे वाढवून देशात व परदेशात वस्तूंच्या किंमती वाढवतात. यावर उपाय म्हणून घटनात्मक सुधारणा विधेयक जीएसटी हे राज्यसभेत ३ ऑगस्ट २०१६ व लोकसभेत ८ ऑगस्ट २०१६ रोजी मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपतींनीही त्याला मंजुरी दिली.**

भारत सरकारने जीएसटी आघाडीवर जी प्रगती केली ती प्रशंसनीय आहे. यातील घटनात्मक सुधारणा विधेयक व आदर्श जीएसटी कायदा यातून सरकारची जीएसटी लवकर लागू करण्याची इच्छाशक्ती दिसून येते. 'मेक इन इंडिया' कार्यक्रमात भारत सरकारने अनेक पुढाकार घेतले आहेत. त्यांना यामुळे चालना मिळेल त्यात भारत उत्पादनाचे केंद्र होईल. त्यामुळे रोजगार व नोकरीच्या संधी वाढतील तसेच उद्योग करण्यास चालना मिळेल. यात परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करणे आवश्यक आहे. त्यातून युवकांना संधी मिळतील. भारताला उत्पादन केंद्र बनवण्यासाठी अप्रत्यक्ष करातील व काही अनिश्चित स्थितीमधील अडथळे दूर करावे लागतील.

आताची कररचना ही विविध स्तरांची असून त्यात राज्य व केंद्रांचे वेगळे कर आहेत. त्यामुळे करावर कर असा परिणाम होत जातो. या करांचे दर भिन्न आहेत. विविध ठिकाणी ते वसूल केले जातात. केंद्राचे प्राप्तीकर, सेवा कर, केंद्रीय विक्री कर, अबकारी कर, सुरक्षा उलाढाल कर असे कर आहेत. राज्यांचे व्हॅट व विक्री कर, जकात कर, राज्य अबकारी कर, मालमत्ता कर, प्रवेश कर, कृषी कर असे कर आहेत. हे कर भारतीय उत्पादनांवर कराचे ओझे वाढवून देशात व परदेशात वस्तूंच्या किंमती वाढवतात. यावर उपाय म्हणून घटनात्मक सुधारणा विधेयक जीएसटी हे राज्यसभेत ३ ऑगस्ट २०१६ व लोकसभेत ८ ऑगस्ट २०१६ रोजी मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपतींनीही त्याला मंजुरी दिली. देशातील पन्नास टक्के विधानसभांनी ते मंजूर केले आहे. केंद्र सरकार अप्रत्यक्ष कर दूर करून जीएसटी लागू करण्यास वचनबद्ध आहे. एप्रिल २०१७ हे त्यासाठी उद्दिष्ट ठेवले आहे.

केंद्र सरकारने बहुपक्षीय लोकशाहीत हा बदल घडवून आणताना केंद्र, २९ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेश यांचे हितसंबंध लक्षात घेऊन राजकीय मतैक्य घडवले. त्यासाठी आता नवीन यंत्रणा राबवाव्या लागणार आहेत. जगाच्या कर इतिहासातील एखाद्या देशात होणारा हा मोठा बदल म्हणावा लागेल. काहीवेळा जीएसटीने आपण काय मिळवले याचे पूर्ण आकलनच झालेले नाही असे वाटते कारण त्यामुळे संबंधितांना अनेक फायदे मिळणार आहेत. केंद्र व राज्य सरकारे आता जीएसटीसाठी प्रयत्न करीत आहेत. जीएसटी भारताची अर्थव्यवस्था निर्णायक

रित्या बदलणार आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील ही सर्वात मोठी कर सुधारणा असून आशियातील तिसरी अर्थव्यवस्था म्हणून भारताचे नाव घेतले जाते. जीएसटीमुळे अप्रत्यक्ष कर, अधिभार, उपकर, असे कर एकाच करात असतील व त्याचे प्रमाणही फार नसेल.त्यामुळे वस्तू एका राज्यातून दुसऱ्या राज्यात करचकुवेगिरी न करता जातील व महसूल तसेच गुंतवणूक वाढेल. गुंतवणूक व उद्योग सोपे होईल. जीएसटीमध्ये हे अपेक्षित आहे की, कर पाया सर्वंकष असावा. सर्व वस्तूंवर व सेवांवर कर असावा व कमीत कमी वस्तू व सेवांना त्यातून सूट असावी. जीएसटीमुळे करसुधारणा होत आहे. भारताची सामायिक बाजारपेठ तयार होऊन करांवर करांचा बोजा टळेल. कर रचना, करमोजणी, करभरणा, पत वापर यात सुधारणा होतील. उत्पादने व सेवा यांच्या किंमती, पुरवठा साखळ्या, आयटी, अकाउंटिंग व पालन प्रणाली यात बदल होतील. सध्या राज्यातील कर वेगळे आहेत ते आता समान असतील. पद्धती सोप्या होतील त्यामुळे ग्राहक खर्च कमी होऊन भारताचे एकूण देशांतर्गत उत्पन्न २ टक्क्यांनी वाढणार आहे असा अर्थमंत्रालयाचा अंदाज आहे.

**जीएसटीचे फायदे**

१- भारतीय अर्थव्यवस्था वरचा थर गाठेल. पंतप्रधानांनी घेतलेल्या आढाव्यानुसार जीएसटीमुळे आर्थिक साधने वाढतील. दारिद्र्य निर्मूलन व विकासास हातभार लागेल. करपाया विस्तारेल. केंद्र व राज्यांची आर्थिक साधने वाढतील. उत्तर प्रदेश,. बिहार, मध्यप्रदेश या राज्यात जास्त ग्राहक असल्याने त्यांना जास्त फायदा मिळून ती गरीब राज्ये राहणार नाहीत.

२. केंद्रीभूत प्रणालीचे तोटे राहणार नाहीत, व्हॅटमध्ये सुधारणा होईल. राज्य व केंद्रांचे दर समान असल्याने आंतरराज्य विक्री सोपी होईल. पेट्रोलियम, तंबाखू, अल्कोहोल यावर केंद्र व राज्यांचे कर राहतील ते अपवाद वगळता राज्यांना आर्थिक स्वायत्तता राहील. जीएसटीमुळे राज्यांची स्वायत्तता वाढेल व ते टॉपअप कर लावू शकतील

---

***जीएसटीमुळे अप्रत्यक्ष कर, अधिभार, उपकर, असे कर एकाच करात असतील व त्याचे प्रमाणही फार नसेल.त्यामुळे वस्तू एका राज्यातून दुसऱ्या राज्यात करचकुवेगिरी न करता जातील व महसूल तसेच गुंतवणूक वाढेल. गुंतवणूक व उद्योग सोपे होईल. जीएसटीमध्ये हे अपेक्षित आहे की, कर पाया सर्वंकष असावा. सर्व वस्तूंवर व सेवांवर कर असावा व कमीत कमी वस्तू व सेवांना त्यातून सूट असावी.***

---

३. जीएसटीमुळे 'मेक इन इंडिया' एक मंचावर येईल, सध्याची कररचना भारतीय बाजारपेठेला खंडित करीत आहे. आता ती एकत्र होईल. राज्यांमधील वस्तू विक्रीवर केंद्रीय कर तसेच काही राज्यांचे कर होते. जीएसटी यातील सर्व त्रुटी दूर करणार आहे व सीएसटी नाहीसा होणार आहे. इतर कर जीएसटीमध्ये येतील. देशांतर्गत उत्पादनास चालना मिळेल.

४. कर प्रशासनात सुधारणा होईल. स्वनियंत्रणामुळे फायदा होईल. इनपुट टॅक्स क्रेडिटमुळे जीएसटीत स्वयंनियंत्रणाचा चांगला उपयोग होईल. कराचे विवरण मागण्याचा अधिकार राहील. केंद्र व राज्य यांचे दोन पातळीवरचे निरीक्षण ही चिंतेची बाब असली तरी त्यामुळे कर स्पर्धा निर्माण होईल. राज्य व केंद्रांच्या अधिकाऱ्यांमध्ये स्पर्धा लागून कर वसुली योग्य होईल. एकीकडून करचकुवेगिरी लक्षात आली नाही तर ती दुसरीकडे लक्षात येईल.

५. विविध करांमुळे जे गोंधळ सामान्य नागरिकांना सहन करावे लागत होते ते दूर होतील. जीएसटीमध्ये केंद्रीय, राज्य व एकात्म जीएसटी असे कर राहतील. त्यामुळे आंतरराज्य व्यवहार सुरळित होतील. जीएसटी कर सुधारणांमुळे वस्तूंचा पुरवठा सेवा हस्तांतर, विक्री, विनिमय व भाड्याने देणे सोपे होईल. यात सीजीएसटी व एसजीएसटीचा समावेश राहील. अ) केंद्र व राज्यांचा कर एकत्र केल्याने दुहेरी कर टळेल, सामायिक बाजारपेठ तयार होईल. ग्राहकांना वस्तूंवर कराचे ओझे कमी झालेले दिसेल. सध्या २५ ते ३० टक्के कर आहे. ब) वस्तूंच्या किंमती कमी होतील व त्यात उत्पादक व व्यापारी यांना उत्पादन खर्च धरावा लागणार नाही. क) प्रक्रियात्मक खर्च कमी होईल व पालनही चांगले होईल. सीजीएसटी व एसजीएसटी तसेच आयजीएसटी यांची वेगळी नोंद ठेवावी लागणार नाही. ड) जीएसटीची यशस्वी अंमलबजावणी परदेशी गुंतवणूकदारांना सकारात्मक संदेश देईल व उद्योग करणे सोपे आहे हे सुचवील. इ) जीएसटीमुळे उत्पादकांचे कर ओझे कमी होईल व उत्पादनात वाढ होईल. दुहेरी कर उत्पादकांना लागणार नाही. त्यांना कर्ज मिळणे सोपे होईल.

फ) विविध तपासणी नाके, टोल नाके कमी होतील व वाहतुकीच मालाची नासाडी कमी होईल. एककर प्रणालीने अनेक अडथळे दूर होतील. ग) एकच करामुळे उत्पादकांना अंतिम विक्री किंमत कमी करता येईल तसेच सामान्य माणसाचे ओझे कमी होईल. पारदर्शकता येऊन ग्राहकांना नेमका कर कळेल. ह) जीएसटीमुळे उत्पादकांना कर्ज मिळेल व त्यामुळे ते कच्च्या मालावर खर्च करू शकतील. जास्तीत जास्त विक्रेते व पुरवठादार कराच्या जाळ्यात येतील. ग) जीएसटीमुळे निर्यातीवरील सीमा शुल्क जाईल व परदेशी बाजारपेठात स्पर्धात्मकता येऊन कमी पैशात व्यवहार होतील.

**प्रमुख क्षेत्रात जीएसटीचे परिणाम**

**स्थावर मालमत्ता**

स्थावर मालमत्ता क्षेत्रात अनेक परिणाम होतील त्यात बांधकाम क्षेत्र रोजगार निर्मितीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. कृषी क्षेत्र अजूनही पहिल्या क्रमांकावर आहे. २०१५-१६ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार देशाचे ७.४ टक्के देशांतर्गत उत्पन्न स्थावर मालमत्ता क्षेत्रातून येते किंबहुना २०१३-१४ मध्ये तरी ही स्थिती होती. सध्याच्या अप्रत्यक्ष करांमुळे या क्षेत्रात वाद आहेत तरतुदी व कररचना स्पष्ट नाही. सध्याच्या कायद्यानुसार सेवा कर, मूल्यवर्धित कर मुद्रांक शुल्क, बांधकाम कर, व खरेदी कर, अबकारी कर, सीएसटी यांचा समावेश आहे. त्यामुळे घरांच्या किंमती वाढतात. जीएसटीमुळे अप्रत्यक्ष कर कमी होतील. वस्तू व सेवांवर जीएसटी असल्याने अप्रत्यक्ष कर राहणार नाहीत पण मुद्रांक शुल्कासारखे काही कर राहतील. मालमत्ता हस्तांतर जीएसटीमध्ये येणार नाही. जीएसटीमुळे स्थावर मालमत्ता क्षेत्रात पारदर्शकता येईल व करचुकवेगिरी कमी होईल. कारण लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणा व पद्धती वेगळ्या असतील. करावर कर राहणार नाही. एकच कर राहील. सध्या विकसकांना विविध कर भरावे लागतात. त्यात आता एकच कर असेल त्यामुळे सर्वांनाच फायदा होईल.

---

***जीएसटीमुळे पुरवठा सुधारून औषध क्षेत्र दोन टक्क्यांनी वाढेल. औषध कंपन्यांना वितरण व इतर पद्धती बदलाव्या लागतील. कराधारित पत वाढेल व अनुपालन चांगले राहील त्यामुळे कंपन्यांना समान संधी राहील, उलाढाल खर्च कमी होईल कारण सीएसटी राहणार नाही. जीएसटीमुळे उत्पादन व वितरण खर्च २ टक्के कमी होऊन २० टक्के नफा होईल.***

---

**आरोग्य क्षेत्र**

उलटया पिरॅमिडसारखी कररचना देशांतर्गत उत्पादकांना हानिकारक ठरते. उत्पादन खर्च विक्री खर्चापेक्षा जास्त असतो. आता तसे होणार नाही. जीएसटीमुळे आताची रचना बदलून परतावा मिळेल, हा या उद्योगास दिलासा राहील. करावर कर राहणार नाहीत त्यामुळे यंत्रांची आयात सोपी व कमी खर्चिक असेल. औषध उत्पादन क्षेत्रावर चांगला परिणाम होऊन सध्या या क्षेत्रात आठ कर आहेत ते जातील व एकच कर असेल. जीएसटीमुळे पुरवठा सुधारून औषध क्षेत्र दोन टक्क्यांनी वाढेल. औषध कंपन्यांना वितरण व इतर पद्धती बदलाव्या लागतील. कराधारित पत वाढेल व अनुपालन चांगले राहील त्यामुळे कंपन्यांना समान संधी राहील, उलाढाल खर्च कमी होईल कारण सीएसटी राहणार नाही. जीएसटीमुळे उत्पादन व वितरण खर्च २ टक्के कमी होऊन २० टक्के नफा होईल. त्याचा फायदा ग्राहकांनाही मिळेल.आरोग्य विमा व निदान केंद्रे यांनाही फायदा मिळेल की नाही हे अजून निश्चित नाही कारण ते सेवेशी निगडित आहेत. आरोग्य क्षेत्रातील करसवलतींचे फायदे राहतील की नाही हे समजलेले नाही.

**बँकिंग व आर्थिक सेवा**

भारतात बँकिंग व आर्थिक सेवा यात सेवा कर जास्त आहे सध्या तो १४.५ टक्के आहे. जीएसटी १८ ते २० टक्के मानला तरी सेवा महागणार आहे. जीएसटीमुळे आर्थिक सेवादारांना अनेक राज्यांचे अनुपालन करावे लागेल सध्या एकच केंद्रीय नोंदणी आहे. जीएसटी ठिकाणानुसार आकारला जाणारा कर असून सध्या तसे नाही. त्यामुळे राज्यांचा जीएसटी, केंद्राचा जीएसटी, आंतरराज्य जीएसटी हे बी टू बी व बी टू सी व्यवहारांवर लागू असतील. कर्जावरील व्याज व रोख्यातील व्यवहार परदेशी चलन व किरकोळ सेवा जीएसटीमध्ये येतील. बँकिंग क्षेत्राने या सेवा जीएसटीत आणू नयेत असे सुचवले आहे पण अजून शिफारशी अजून स्वीकारलेल्या नाहीत. बँकिंग क्षेत्रात जीएसटी लागू करणे

आव्हान आहे जर ते यशस्वी झाले तर उर्वरित जगासाठी आदर्श राहील.

**प्रवास, पर्यटन व आदरातिथ्य उद्योग**

भारतात प्रवास, पर्यटन व आदरातिथ्य उद्योगावर अनेक कर आहेत. केंद्र व राज्यांचे वेगळे कर आता जीएसटीत येतील हॉटेल व रेस्टॉरंट यावर एकच कर राहील.सध्या इनपुट सेवांवर पतपुरवठा उपलब्ध नाही जीएसटीमुळे ते बदलेल. आर अँड डी कर, फ्रँचाइजी शुल्क व तंत्रज्ञान कर हे जीएसटीत येतील त्यामुळे वेगळे कर राहणार नाहीत. सध्याचे परदेशी व्यापार धोरण जीएसटीत येणार असल्याने त्याचे फायदे होतील. त्यामुळे इनपुट क्रेडिट उपलब्ध होणार नाही त्यामुळे किंमती वाढतील. त्यामुळे कररचना सोपी होईल तरी पतपुरवठ्यावर परिणाम होईल त्यामुळे कर वाढतील.

**शिक्षण क्षेत्र**

शिक्षण क्षेत्रात सध्या अनेक करसवलती आहेत शाळांच्या व महाविद्यालयांच्या सेवांवर कर नाहीत. जीएसटीनंतर हीच स्थिती राहील पण जर तसे झाले नाही तर इनपुट क्रेडिट उपलब्ध होईल किंवा सेनव्हॅट क्रेडिट घेता येईल.

**सामान्य नागरिकांवर परिणाम**

जीएसटीमुळे एकात्मिक कररचना असेल व त्यामुळे देशांतर्गत उत्पन्न दोन टक्क्यानी वाढेल. काही सेवा महागड्या होतील एकूण संमिश्र परिणाम दिसेल. सध्या वस्तूंवर १२.५ टक्के अबकारी कर तसेच ५ ते १५ टक्के व्हॅट म्हणजे मूल्यवर्धित कर आहे तो ग्राहकांवर टाकला जातो. जीएसटीमुळे १८ टक्के ही कराची मर्यादा राहील. काही वस्तूंच्या किंमती कमी होतील. खरेदी किंमती कमी होतील. साखळीच्या अंतिम टप्प्यातील काही नफा उद्योग व ग्राहकांना मिळेल. ग्राहक किंमत निर्देशांकानुसार ५५ टक्के वस्तू करसवलतीत, ३२ टक्के कमी करात व १२ टक्के प्रमाणित करात असताना जो फरक दिसतो तो दिसेल.

***बॅग, शूज, इलेक्ट्रॉनिक, ऑनलाईन खरेदी महाग होईल. ई व्यापार करजाळ्यात येईल त्यांना ग्राहकाला वस्तू देण्याआधीच कर भरावा लागेल, ई व्यापार कंपन्यांचा नफा कमी होईल व कर अनुपालन वाढेल. डिस्काउंट व फुकट वस्तू देण्याच्या ऑफर्स कमी होतील. सामान्य माणसासाठी परिणाम चांगला असेल कारण सर्व सेवा व वस्तूंवर सारखाच प्रमाणित कर राहील. एक देश एक कर ही कल्पना देशाला सकारात्मकतेकरडे नेईल.***

कपडे, पुस्तके, स्वयंपाकाचे तेल या वस्तूंवर ५-८ टक्के कर आहे तेथे कर १८ टक्के झाला तर किंमती वाढतील. सेवा क्षेत्रातील कर १५ वरून १८ टक्के झाल्याने बाहेरचे खाणे महाग पडेल. फोनचे बील वाढेल. दूरसंचार, रेल्वे, बँकिंग, हवाई प्रवास महागेल. लहान मोटारी, फास्ट मुव्हिंग कन्झ्युमर गुडस स्वस्त होतील. दूरचित्रवाणी संच स्वस्त होतील कारण मेक इन इंडियाचा त्याला फायदा होऊन जीएसटी कमी होईल. सध्या एलईडी टीव्ही २० हजारांना आहे त्यावर २४.५ टक्के कर लागून किंमत २४९०० होते. जीएसटीमध्ये १८ टक्के कर राहील व किंमत २३६०० राहील त्यामुळे ग्राहाकांना फायदा मिळेल. बॅग, शूज, इलेक्ट्रॉनिक ऑनलाइन खरेदी महाग होईल. ई व्यापार करजाळ्यात येईल त्यांना ग्राहकाला वस्तू देण्याआधीच कर भरावा लागेल, ई व्यापार कंपन्यांचा नफा कमी होईल व कर अनुपालन वाढेल. डिस्काउंट व फुकट वस्तू देण्याच्या ऑफर्स कमी होतील. सामान्य माणसासाठी परिणाम चांगला असेल कारण सर्व सेवा व वस्तूंवर सारखाच प्रमाणित कर राहील. एक देश एक कर ही कल्पना देशाला सकारात्मकतेकडे नेईल. सामान्य लोकांनाच नव्हे तर देशाला त्याचा फायदा आहे. हा कायदा अंमलात येईल तेव्हा सामान्य माणसाला त्याचा फायदा दिसेल. थेट परिणाम ग्राहकांवर होणार असल्याने तो सकारात्मक राहील अशी अपेक्षा आहे. त्यातून भारतीय अर्थव्यवस्थेला वाढीस उत्तेजन मिळेल व एकात्मिक बाजारपेठ एकात्मिक करामुळे तयार होईल. अर्थव्यवस्था वाढली की, सामान्य माणसाची आर्थिक वाढ आपोआप होईल.


■■■

*लेखक पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे संचालक आहेत.*

email: ranjeetmehta@gmail.com

# कौटिल्यकालीन करपद्धती

रेश्मा घाणेकर



**प्राचीन काळात करपद्धतीविषयी मागोवा घेतला तर महाभारतापर्यंत मागे जावे लागते. राजधर्मपर्वात याविषयी उल्लेख आहेत. त्यात म्हटले आहे ''अराजक राष्ट्रात मात्स्यन्याय म्हणजे मोठे मासे लहान माशास खाणे सुरु होते.'' यातून बाहेर पडण्यासाठी प्रजाजनांचा करार झाला. पण तो करार फार टिकला नाही म्हणून सर्व लोकांनी वैवस्वतमनूस शेतीच्या उत्पन्नाच्या १/६ भाग आणि व्यापारातील नफ्याच्या १/१० रोख देण्याचा करार करून त्यास राजा केले. राजाने प्रजेचा योगक्षेम चालवावा आणि त्याकरता प्रजेनं कर द्यावा असा हा करार होता.**

आज वस्तु व सेवा कर कायदा भारतात लागू करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. हा कायदा लागू केला की करपद्धती सोपी आणि सुटसुटीत होईल असे सर्व तज्ज्ञ लोक सांगत आहेत. भारतात संघराज्यपद्धती आहे त्यामुळे केंद्र आणि सर्व राज्यांनी अवलंबण्याची करपद्धती यावर या कायद्यात विचार केला आहे. मात्र ही झाली आजची करपद्धती. आज करपद्धतीविषयी वेगवेगळे सिद्धांत आणि पुष्कळ मुलभूत संशोधन झाले आहे. पण प्राचीन काळात करपद्धतीविषयी काय विचार होता तो कितपत सोपा होता?

या दृष्टीने मागोवा घेतला तर महाभारतापर्यंत मागे जावे लागते. राजधर्मपर्वात याविषयी उल्लेख आहेत त्यात म्हटले आहे ''अराजक राष्ट्रात मात्स्यन्याय म्हणजे मोठे मासे लहान माशास खाणे सुरु होते.'' यातून बाहेर पडण्यासाठी प्रजाजनांचा करार झाला. पण तो करार फार टिकला नाही म्हणून सर्व लोकांनी वैवस्वतमनूस शेतीच्या उत्पन्नाच्या १/६ भाग आणि व्यापारातील नफ्याच्या १/१० रोख देण्याचा करार करून त्यास राजा केले. राजाने प्रजेचा योगक्षेम चालवावा आणि त्याकरता प्रजेनं कर द्यावा असा हा करार होता. ही झाली सुरुवात. पुढील काळात चन्द्रगुप्त मौर्याच्या वेळेस वेगवेगळे कर आढळतात. कौटिलीय अर्थशास्त्रात महसूल मिळवण्याच्या मार्गांचा तपशीलवार विचार केला आहे. या काळात जरी राजसत्ता असली तरीही 'प्रजासुख हेच सुख मानणारा तो राजा' अशीच कौटिल्याची धारणा आहे तो म्हणतो-

प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्

नात्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम् ।।

(प्रजासुख हेच राजाचे सुख. प्रजेचे हित हेच राजाचे हित. स्वतःच्या इच्छेची तृप्ती करण्यात त्याचे हित नाही तर प्रजेच्या इच्छेप्रमाणे वागण्यात त्याचे हित असते.)

या प्रजापालनासाठी राज्यकारभार नियोजनपूर्वक हवा. त्या नियोजनासाठी वेगवेगळी खाती आणि त्यांच्या मंत्र्यांची नावे दिली आहेत. कौटिलीय अर्थशास्त्रातील २७, ४२, ४३, ५६ हे अध्याय तत्कालिन जमा महसूल आणि त्यासाठीची करपद्धती यावर अधिक प्रकाश टाकतात.

समाहर्ता (फडणीस) हा कर वसुलीची रक्कम ठरवत असे. कौटिल्य म्हणतो, 'समाहर्त्याने दुर्ग, राष्ट्र, खाणी,

सेतू, वने, गौळवाडे, व्यापाराचे मार्ग यांच्यावर देखरेख ठेवावी.

दुर्ग म्हणजे शहर यात जकात, दंड, वजने मापे, मद्यगृहे, कत्तलखाने, तेल, तूप, मीठ, सोने विकणारे, वेश्यागृहे, जुगारांचे अड्डे, बाहेरून गावात येणाऱ्या मालावर वेशीत घ्यावयाचा कर इ. सर्वांचा समावेश होतो.

राष्ट्र (जनपद) शब्दांत शेतसारा, यात्रेकरुंवरील कर, रोकड कर, व्यापारी इ. गोष्टींचा समावेश होतो. सोने, रुपे, हिरे, मोती, पोवळे, शंख, लोह, सैंधव, माती, शिला, पारा व धातू यांचा खाणीत समावेश होतो. फुले, फळे, पानमळे, वाफे या सर्वांचा अंतर्भाव सेतूत होतो. पशू, मृग, इमारती, लाकडे, हत्ती यांचा महसूल वन शब्दात येतो. गाई, म्हशी, शेळया, मेंढया, गाढवे, उंट, घोडे, खेचरे हे व्रज (गौळवाडे) याच्या अंतर्गत येतात. महसूल या सर्वातून जास्तीत जास्त कसा येईल हे पाहण्याची जबाबदारी ही समाहर्त्याचीच. हा महसूल वेगवेगळया करांमधून आणि उत्पन्नातून जमत असे.

जकात, धंद्यांच्या प्राप्तीवरील कर, शेतसारा, जुगाराच्या अडडयावरील कर, वजने मापे वापरण्याबद्दल कर, यात्रेकरुवरील कर, तीर्थावरील कर इ. कराचे प्रकार होते.

याशिवाय इतर उत्पन्नाचे प्रकार होते. उदा. खाणीतील माल, तरी नांवा वगैरेचे भाडे, जंगलातील मालाची विक्री, पाणीपटटी , सरकारी इमारतीचे भाडे इत्यादी.

सांगितलेल्या करांपैकी जकातीविषयी अधिक माहिती कौटिलीय अर्थशास्त्राच्या बेचाळिसाव्या आणि त्रेचाळिसाव्या अध्यायात आढळते. कौटिल्य म्हणतो जकात अधिकाऱ्याने मोठया वेशीनजीक जकातीचे नाकं बसवावं त्यावर खुणेकरिता निशाण लावून ठेवावे. जकात वसूल करण्याकरिता काही कारकून नेमावे आणि जे व्यापारी माल घेऊन येतील ते कोण कोठले, कोणता माल त्यांचेजवळ आहे याची चौकशी, करुन त्यांनी नोंद करावी.

ज्या मालावर शिक्का नसेल त्याबद्दल दुप्पट दंड घ्यावा, खोटा छाप मारलेला असल्यास जकातीच्या आठपट दंड घ्यावा. छाप फाडला असल्यास तिथच एक दिवस रहायला लावावे. सरकारी मालावरील शिक्का बदलला किंवा भलताच माल आपला आहे असे म्हटले तर त्यांना बंदीत टाकावे आणि प्रत्येक मालाच्या गठ्ठयाबद्दल दंड करावा असं कौटिल्य म्हणतो.

व्यापाऱ्यानं जकातीच्या नाक्यावर माल आणून ठेवून तो माल किती आहे त्यांची किंमत काय हे ओरडून सांगावं. तीन वेळा किंमत पुकारल्यावर जो शेवटी लिलाव बोलेल त्याला तो माल दयावा. गिऱ्हाईकांच्या गर्दीमुळं मालाची किंमत वाढते तशी ती वाढल्यास किंमतीतील वाढ आणि जकात सरकारी तिजोरीत भरणा करावी. भरणा सरकारी खजिन्यात करावा किंवा नेहमीच्या जकातीच्या दुप्पट जकात द्यावी असं सांगितलं आहे.

***ज्या मालावर शिक्का नसेल त्याबद्दल दुप्पट दंड घ्यावा, खोटा छाप मारलेला असल्यास जकातीच्या आठपट दंड घ्यावा. छाप फाडला असल्यास तिथच एक दिवस रहायला लावावे. सरकारी मालावरील शिक्का बदलला किंवा भलताच माल आपला आहे असे म्हटले तर त्यांना बंदीत टाकावे आणि प्रत्येक मालाच्या गठ्ठयाबद्दल दंड करावा असं कौटिल्य म्हणतो.***

लग्न, यज्ञ, उपनयन, व्रत उद्यापन किंवा बाळंतिणीकरता आणलेला माल असेल तर मात्र त्यावर जकात घेऊ नये असं कौटिल्य सांगतो.

जकात चुकवण्याचे मार्ग ही काही आजचीच गोष्ट नाही. त्याहीवेळी असे गैरप्रकार घडत होते. यासाठी काही दंड कौटिल्यानं सांगितले आहेत. जकात जास्त पडेल म्हणून जर मालाचं वजन किंवा मालाची किंमत कोणी कमी सांगेल तर राजाने तो अधिक माल आपल्या ताब्यात घ्यावा किंवा आठपट जकात घ्यावी. त्याचप्रमाणं कमी प्रतीचा नमुना दाखवून त्याच्याखाली भारी किमतीचा माल लपवला तर आठपट दंड करावा असे कौटिल्य सांगतो. जकात न देता नाक्याचं निशाण ओलांडून जाणाऱ्यांस जकातीच्या आठपट दंड आकारावा असं तो सांगतो.

ज्यावर जकात भरली नाही असा माल जकात भरलेल्या मालात घुसडून घेऊन जाणाऱ्या व्यापाऱ्याकडून अथवा एका मालाचा परवाना दाखवून दुसराच माल घेऊन जाणाऱ्या व्यापाऱ्याकडून त्या मालाची किंमत आणि तितकाच दंड घ्यावा असं सांगितलं आहे. नाक्यावरुन जो कोणी शेण काडया वगैरे घेऊन चाललो आहे अस भासवून माल नेईल त्यासही दंड लावला आहे.

शेतमालाबाबत कौटिल्यांनं नियम सांगितले आहेत. देशात पीडा करणारे जिन्नस नष्ट करुन टाकावे. ज्यापासून थोडेच फळ उत्पन्न होते असे जिन्नस येऊ देऊ नये आणि ज्यापासून देशास अत्यंत फायदा आहे व ज्यांचे बीज सहज मिळविण्यासारखे नाहीत असे जिन्नस जकात न घेता येऊ द्यावे असं तो म्हणतो यातून त्याची दूरदृष्टीच दिसते.

जकात, त्यावरच्या सवलती किंवा चुकवणाऱ्यास दंड सांगून झाल्यावर

त्रेचाळिसाव्या अध्यायात जकातीचं प्रमाण ठरवलं आहे. कौटिल्य म्हणतो आयात मालावर किंमतीच्या एक पंचमांश जकात घ्यावी. फळेभाजीपाला सुके मासे व मांस यावर एक षष्ठांश जकात घ्यावी. शंख हिरे रत्न मोती पोवळी यावर त्याविषयीच्या तज्ञास विचारुन जकात ठरवावी असं सांगितलं आहे

जाडे तलम रेशमी, सुती कापड, धातू, रंग, चंदन, कुटकी अंगात घालायची वस्त्रं, मद्य हस्तिदंत, चामडी, जाड कापड, सतरंज्या, कांबळी, रेशीम, लोकर यावर एक दशांश किंवा पंधरांश जकात सांगितली आहे.

जनावरं, कापूस, औषध, सुगंधी माल, लाकूड, वेळू, वल्कल, मातीची भांडी, धान्य, तूप-तेल, गूळ, साखर, मीठ इ. वर एक विसांश किंवा एक पंचविसांश जकात घ्यावी. मात्र स्वत:च्या कुटुंबाच्या जरुरीपुरतं मीठ कोणी तयार केल्यास त्याला जकातमाफी होती.

परदेशाशी व्यापाराचं दळणवळण वाढलं तर आपल्या मालाला गिऱ्हाईक वाढून फायदा होतो हे लक्षात घेऊन व्यापाऱ्यांना शक्य तितक्या सवलती मिळत. अतिशय दूरच्या देशातून अतोनात खर्च करुन आणलेल्या मालास उत्तेजन मिळावं म्हणून त्यास जकात पूर्ण माफ होती.

मात्र व्यापारी लोक संघ करुन मालाच्या किमती भरमसाट वाढवू लागले तर त्यांना दंड सांगितला आहे. म्हणजेच कौटिल्य व्यापाराला चालना ही देतो आणि नफेखोरीला आळाही घालतो.

यानंतरचा कर म्हणजे शेतसारा. लागवडीस येणाऱ्या सर्व जमिनीवर उत्पन्नाच्या प्रमाणात १@२० पासून १@३ पर्यंत वसूल घेण्यात यायचा. कालव्याचं पाणी दिलं, दुसरी सोय केली तर वसुलीचा हिस्सा १@३ पर्यंत घेतला जायचा. हा वसूल अर्धा रोख आणि अर्धा मालाच्या रुपानं घेतला जायचा. यामुळे दुष्काळाने पीक कमी अधिक आल्यास त्याचा नफातोटा सरकार व जनता या दोघात विभागला जायचा. त्यामुळे सारावसुलीसाठी जुलूम व्हायचा नाही. शिवाय उत्पन्न नाही आले तरी सरकारी कर भरलाच पाहिजे असे नव्हते.

तिसऱ्या प्रकारचा कर म्हणजे बाजारात विक्री होणाऱ्या मालावरचा कर. मापावर १६ : वजनावर २० : व मोजून घ्यावयाच्या पदार्थांवर ११ : असा कर घेण्यात येई. जनावरांच्या विक्रीवर पावपट किंमत कर म्हणून सरकारला द्यावी असा नियम होता. परदेशातून येणाऱ्या मिठावर किंमतीच्या एक षष्ठांश कर होता.

याशिवायही काही इतर कर होते. नाटकमंडळी, गवई, कथेकरी, जादूगार वगैरे व्यक्ती परदेशातून आल्यास त्यांना कार्यक्रम करण्यास परवानगीसाठी परवाना फी लावली जात असे. वजने मापं याची, परीक्षा करुन शिक्के मारण्याबद्दल दर मापाला विशिष्ट फी घेण्यात येत होती. जुगार खेळण्यासाठीही विशिष्ट वसूल होता. जुगारासंबंधित अधिकाऱ्यानं जिंकणाऱ्याच्या पैजेच्या रकमेवर शेकडा पाच प्रमाणे कर वसुल करावा असे सांगितले आहे. जो कोणी बनावट फासे अगर कवडया वापरेल त्यास दंड करावा. पैजेची रक्कम जप्त करावी अशी शिक्षाही सांगितली आहे.

याशिवाय मासे पकडणारे कोळी नदीत समुद्रात फिरणारी जहाजे यासाठी शुल्क, गायरानात गुरे चरण्याबद्दल शुल्क असे अनेक प्रकार होते.

कराशिवाय सरकारी उत्पन्नाचे काही मार्ग होते. खनिज द्रव्यांच्या खाणी हा एक मार्ग होता. खाणी सरकारी मालकीच्या होत्या. त्यातून खनिज बाहेर काढण्यांचे आणि विकण्याचं काम स्वत: सरकार करत असे. जंगलातील उत्पन्न ही सुध्दा एक उत्पन्नाची बाब असे जंगलाच्या शेजारी जंगलातील मालापासून चालवायचे कारखाने असत आणि तेही सरकार चालवत असे. ज्या व्यक्तीला भूमिगत द्रव्य सापडेल त्यास १@६ ते १ @३ पर्यंत त्याची किमंत मिळत असे. बाकीचा हिस्सा सरकार जमा होत असे.

एकंदरीत तत्कालीन समाजात जे मुख्य व्यवसाय होते त्यावर कर लावले होते. शेती, व्यापार, पशुपालन इ. व्यवसायांवर कर अथवा शुल्क आकारले आहे. करचुकवेगिरींचे अनुमान करुन दंडाची व्यवस्था चोख केली आहे.

व्यापाराचे दळणवळण वाढले तर राज्याला फायदा होतो हे लक्षात घेऊन व्यापाऱ्यांना सवलती मिळत परंतु व्यापारी लोक संघ करुन मालाच्या किमती भलत्याच वाढवू नाही यासाठी दंड होते मात्र कुटुंबाच्या जरुरीपुरत मीठ कोणीही तयार केल्यास त्याला जकातीची माफी असे किंवा काही संस्कार वा धार्मिक कार्य वा गर्भवतीसंबंधी सामग्रीला जकातीची माफी होती. म्हणजेच तत्कालीन करव्यवस्था काहीशी लवचिक होती असे म्हणता येईल.

■ ■ ■

*लेखिका या विक्रीकर उपायुक्त असून संस्कृतच्या अभ्यासक आहेत.*
email: rbgonline@gmail.com

# जीएसटी आणि घटनात्मक दुविधा

जयंत रॉय चौधरी




**या शतकाच्या सुरुवातीला देशातील बाजारपेठेच्या एकात्मीकरणाला VAT(व्हॅट) ने म्हणजे मूल्याधारित कराने सुरुवात झाली. मात्र, करविषयक धोरणाबाबत राज्ये पूर्णतः स्वतंत्र होती.काही बाबतीत मात्र आर्थिक गरजांमुळे व्हॅट बरोबरच इतर अनेक पूरक कर पद्धती चालू ठेवाव्या लागल्या होत्या. त्यामुळेच बऱ्याचवेळा भारताची गणना सर्वात जास्त कर भराव्या लागणाऱ्या देशांमध्ये केली जाते.**

बहुप्रतिक्षित वस्तू आणि सेवा करामुळे भारताचे रुपांतर एकाच बाजारपेठेत होणार आहे. अशाच प्रकारच्या करामुळे, कॅनडा आणि युरोपियन युनियन यांच्याबाबतही हेच घडले. 'एकात्मतेकडे झुकलेले संघराज्य' हे भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्य! हेतुपुरस्सर नसले तरी 'जीएसटी मुळे 'संघराज्याकडे झुकलेल्या युनियनसाठी राज्यघटना' असे वर्णन आता करावे लागणार आहे.

वस्तू आणि सेवा कर मंजूर होण्यापूर्वी वेगवेगळ्या राज्यांमध्ये विविध टप्प्यांवर असणाऱ्या बहुविध करपद्धतींमुळे होणाऱ्या मनःस्तापाबद्दल अनेक व्यावसायिकांनी विरोध दर्शवला आणि त्यांनी "एक राष्ट्र, एक करप्रणाली(करपद्धती)' अशी घोषणा दिली. या शतकाच्या सुरुवातीला देशातील बाजारपेठेच्या एकात्मीकरणाला VAT (व्हॅट) ने म्हणजे मूल्याधारित कराने सुरुवात झाली. मात्र, करविषयक धोरणाबाबत राज्ये पूर्णतः स्वतंत्र होती. काही बाबतीत मात्र आर्थिक गरजांमुळे व्हॅट बरोबरच इतर अनेक पूरक कर पद्धती चालू ठेवाव्या लागल्या होत्या. त्यामुळेच बऱ्याचवेळा भारताची गणना सर्वात जास्त कर भराव्या लागणाऱ्या देशांमध्ये केली जाते.

'एक राष्ट्र, एक करप्रणाली' घोषणा देशामध्ये व्यापार-व्यवसाय सुलभपणे व्हावा यासाठी होती; ती स्वातंत्र्य आणि फाळणीनंतर राज्यघटनेच्या निर्मिती प्रक्रियेविरोधात प्रतिक्रिया नव्हती. फाळणीच्या काळात आलेल्या अनुभवांमुळे आणि देशद्रोही प्रवृत्तींनी नव्याने जन्माला आलेल्या या देशाच्या बाल्यावस्थेतच वेगळा भाग आपल्या स्वाधीन करावा असे धमकावल्यामुळे एकात्मतेवर आधारित संघराज्य निर्माण करण्याचा निर्णय भारताने घेतला.

नव्या राष्ट्राच्या निर्मितीत एकता आणि अखंडतेवर जरा जास्तच भर दिला जात आहे,असे घटना समितीच्या कामकाजात सहभागी झालेल्या काही जणांना तसेच काही स्वतंत्र निरीक्षकांना वाटत होते.याबाबत झालेल्या एका प्रदीर्घ चर्चेत बिहारचे खासदार श्यामानंदन सहाय म्हणाले होते, केंद्र आणि प्रांतांच्या आर्थिक घडामोडींबाबत प्रांतांना जी वागणूक दिली जात आहे,तशी ती दिली जाऊ नये,असे मला वाटते.१९३५च्या कायद्यानंतर जे दिवस आले होते,त्यापेक्षाही वाईट स्थिती प्रांतांवर याबाबत आली आहे असे मला वाटते', असेही ते म्हणाले.लोकांसाठी सुधारणा करणे याबाबत केंद्रापेक्षा प्रांतांवर असलेली बांधिलकी मोठी

असल्याने करपद्धतीच्या क्षेत्रात त्यांना पुरेसा वाव देण्यात यावा,असे मतही सहाय यांनी मांडले.

मात्र, संघराज्यवादाचे वर्चस्व वाढेल काय अशी भीती व्यक्त करत यावर जोरदार चर्चा होऊन शेवटी भारत एकसंध राहण्याचा मुद्दा महत्त्वाचा मानला गेला आणि सध्याची चौकट स्वीकारण्यात आली.त्यामुळे वैधानिक आणि करविषयक अधिकार राज्यांकडे न जाता मुख्यत: केंद्राकडे राहिले. प्रातांचे आर्थिक आणि प्रशासकीय स्थैर्य हे बऱ्याच अंशी केंद्राच्या स्थितीवर अवलंबून असते. केंद्र सरकारच्या आर्थिक स्थितीवर आपल्या वाट्याचा मोठा हिस्सा प्रांतांनी मागितल्याने परिणाम होऊ शकतो हे जाणूनही तशी मागणी प्रांतांनी करणे हे संकुचितपणाचे,अदूरदृष्टीचे द्योतक आहे', असे मत संयुक्त प्रांताचे खासदार पंडित हृदयनाथ कुंझरू यांनी संघराज्याबाबत चर्चा करताना मांडले आहे.

स्वातंत्र्यानंतरची पहिली काही वर्षे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार काम करीत असताना बहुतेक राज्यांमध्ये कॉंग्रेसचीच सरकारे असल्याने केंद्र-राज्य संबंध सौहार्दाचे होते. त्यांना या व्यवस्थेमुळे काही समस्या निर्माण झाल्या नाहीत.१९६०नंतर मात्र काही राज्यांमध्ये पर्यायी सरकारे उदयाला आली आणि त्यांनी राज्यांना अधिक अधिकार असावेत अशी मागणी करायला सुरुवात केली. पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी,आंध्रमध्ये एन टी रामा राव यांच्या नेतृत्वाखाली आलेले सरकार,ही त्याची काही उदाहरणे आहेत.

राज्यांना सध्या मोठया प्रमाणावर वस्तू आणि व्यवसायांवर कर बसवण्याचे अधिकार आहेत आणि ते विविध प्रकारचे कर,लेव्हि,दर आकारणी करून ते वसूल करतात.कायद्यांचा स्वैरआणि सोयीस्कर अर्थ लावून ती राज्ये स्वत:चा फायदा करून घेतात. उदाहणार्थ,बंगाल त्यांच्या सीमेच्या बाहेर विकण्यात येणारया कोळशावर जबरदस्तीने कर वसुली करते.इतर राज्यांनीही त्यांच्या सीमेपलीकडून येणाऱ्या वस्तूंवर प्रवेश कर बसवला आहे.कोणत्याही ग्राहक अगर व्यवसायाच्या दृष्टीने ही कालबाह्य झालेली बाब आहे.

---

***स्वातंत्र्यानंतरची पहिली काही वर्षे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार काम करीत असताना बहुतेक राज्यांमध्ये कॉंग्रेसचीच सरकारे असल्याने केंद्र-राज्य संबंध सौहार्दाचे होते. त्यांना या व्यवस्थेमुळे काही समस्या निर्माण झाल्या नाहीत. १९६०नंतर मात्र काही राज्यांमध्ये पर्यायी सरकारे उदयाला आली आणि त्यांनी राज्यांना अधिक अधिकार असावेत अशी मागणी करायला सुरुवात केली.***

---

कर लावण्याच्या, ते वाढवण्याच्या या क्षमतेचा फायदा राज्यांना मिळून त्यांनी मोठया प्रमाणावर साधन संपत्तीची उभारणी केली आणि आपल्या समस्येवर तोडगा काढला.काही वेळा या सगळ्यामध्ये मोठी साधनसंपत्ती वायाही गेली.तामिळनाडू सरकार वस्तू आणि सेवा करामधील काही कलमांना विरोध करते ,तेव्हा त्यामध्ये काही तथ्य असते. त्यांच्या म्हणण्यानुसार कर आकारणीमधून मिळणारया पैशातून त्यांनी सामाजिक क्षेत्रात अनेक सुधारणांची अंमलबजावणी केली आहे.

सामाजिक मापदंड लावले तर दक्षिणेकडील राज्यांनी आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या क्षेत्रांत, त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या कितीतरी पुढे जाऊन उल्लेखनीय कामगिरी केली आहे आणि त्यांची तुलना आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेतील देशांशी(ओ इ सी डी) होऊ शकते.अर्थशास्त्रज्ञ जीन ड्रेझे यांच्या शब्दांत सांगायचे तर," सारांश विकास निर्देशांकाचा विचार करता केरळ आणि तामिळनाडू या राज्यांनी अव्वल स्थान प्राप्त केले असून, सुधारणांच्या गतीबाबत इतर राज्यांना मागे टाकले आहे.'

राज्यांपेक्षाही, स्थानिक स्वराज्य संस्था स्वतंत्रपणे कर आकारणी करून चांगला पैसा वसूल करतात. उदाहरणार्थ,मुंबई महानगरपालिकेला जकात वसुलीतून प्रचंड पैसा मिळतो. नव्या वस्तू आणि सेवा करामुळे (जीएसटी) याला आर्थिकदृष्ट्या आव्हान दिले जाणार आहे.त्यांच्या कर आकारणीच्या अधिकाराला अक्षरश: धक्का पोहोचणार आहे.हे ओळखूनच शहरी विकास मंत्रालयाने देशभरात लागू होणाऱ्या वस्तू आणि सेवा करामध्ये राज्यांच्या हिश्शामध्ये सर्व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा २५ ते ३० टक्के वाटा असावा अशी मागणी केली आहे.

वस्तू आणि सेवा कर, केंद्र आणि राज्यांमध्ये दोघांच्या सहमतीने आणि दोघांना मान्य होईल असे सूत्र ठरवून

दिले जाणार आहे.मात्र एकदा का ही नवी कर आकारणी पद्धत आली की,स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रचंड आर्थिक तूट जाणवणार आहे कारण या नवीन करामुळे त्यांनी लावलेले कर,जकात,प्रवेश कर सगळे निरुपयोगी ठरणार आहेत.तेव्हा या बाबींचा विचार सरकारने करावा अशी मागणी मंत्रालयाने केली आहे.

कायदेशीर भाषेत बोलायचे तर जी एस टी दुरुस्ती कायदा, कर आकारणीचे अधिकार निवडून न दिलेल्या संस्थेकडे सोपवतो आहे.या नवीन कायद्यानुसार वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) परिषद उभारण्यात आली आहे. संसद आणि राज्यांची विधिमंडळे यांच्याकडून करविषयक दर ठरवण्याचे अधिकार या परिषदेला देण्यात आले आहेत.या परिषदेमध्ये मते नोंदवण्याचा अधिकार कोणाला आणि कशा प्रकारे दिला गेला आहे याविषयी आपण इथे चर्चा करणार नाही.पण एवढे मात्र नक्की की संपूर्ण देशातील वस्तू आणि सेवा याबाबतची कर पद्धती ठरवण्याचे अधिकार या परिषदेकडे देण्यात आले आहेत.हे अधिकार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या निवडून दिलेल्या संसद किंवा राज्य विधिमंडळ सदस्यांना नाहीत तर आता याबाबत जीएसटी परिषद हीच सर्वोच्च कायदेशीर संस्था राहणार आहे, ही वस्तुस्थिती आहे.थोडक्यात सार सांगायचे तर निवडून आलेल्या सदस्यांनी निवडून दिलेली ही सर्वोच्च संस्था आहे.

राज्यांनी जे कर लावले होते त्यांचा आता जीएसटी मध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. तसेच राज्यघटनेनेही यापूर्वीच उत्पन्नावर आणि इतर काही उर्वरित बाबींवर कर लावण्याचा अधिकार केंद्राला दिला आहे.याचाच अर्थ असा आहे की राज्यांच्या कार्यकारी आणि कायदेमंडळांना त्यांच्या संबंधित राज्यामध्ये कोणते कर उभारावेत याबाबत फारसा काही अधिकार राहणार नाही.

राज्यांना रोखे आणि बाजारपेठेतील कर्ज यांच्या मार्फत पैसा उभारण्यावरही आर्थिक जबाबदारी आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन कायद्यामुळे बंधने आली आहेत.खरे तर भारतीय राज्यांचीही कर्जबाजारी होण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे.अशा वेळी खंबीर उपाययोजना करण्याची गरज आहे, नाही तर ग्रीसवर कशी शरमेने मान खाली घालायची वेळ आली ते आपण पाहिलेच आहे. अशा प्रकारच्या उपाययोजनेमुळे संभाव्य धोका टाळता येणे शक्य आहे. डॉ.बी सी रॉय किंवा सर विश्वेश्वरय्या किंवा प्रतापसिंग कैरों यांनी हे ओळखून राज्यांच्या कर्जाचा साधन म्हणून वापर करून त्यांच्या राज्यांना विकास निधीची किती आवश्यकता आहे हे पटवून दिले.


***राज्यांनी जे कर लावले होते त्यांचा आता जीएसटी मध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. तसेच राज्यघटनेनेही यापूर्वीच उत्पन्नावर आणि इतर काही उर्वरित बाबींवर कर लावण्याचा अधिकार केंद्राला दिला आहे.याचाच अर्थ असा आहे की राज्यांच्या कार्यकारी आणि कायदेमंडळांना त्यांच्या संबंधित राज्यामध्ये कोणते कर उभारावेत याबाबत फारसा काही अधिकार राहणार नाही.***

जीएसटीबाबत झालेली घटना दुरुस्ती आणि आर्थिक जबाबदारी आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन कायदा या दोन कायद्यांच्या संयोगामुळे राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना आणि मंत्रिमंडळांना त्यांच्या संबंधित प्रांतांमध्ये कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचे राजकीय कार्यकारी अधिकारी म्हणून अधिकार मिळाले आहेत मात्र अशा कार्यक्रमांसाठी निधी उभारण्याचे अधिकार त्यांना नाहीत. तसेच केंद्र सरकारकडे कानाडोळा करून अशा कार्यक्रमांची व्याप्ती वाढवता येणार नाही.

अमेरिकी स्वातंत्र्ययुद्धाच्या कालखंडात सार्वभौमत्वाची चर्चा करत असताना करविषयक अधिकार कोणाकडे राहणार, हा नेहमीच महत्त्वाचा मुद्दा राहिला होता आणि नंतर इतर युरोपीय देशांनीही त्याविषयी चर्चा,वादविवाद चालूच ठेवले. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली उत्कृष्ट वकील आहेत. राज्यघटनेबाबत त्यांचा गाढा अभ्यास आहे.त्यांनी कुशलतेने आणि योग्य प्रकारे याबाबत उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांचे खंडन केले. काहींना यामुळे आपण आपले सार्वभौमत्व केंद्राच्या स्वाधीन करत आहोत असे वाटत आहे, पण यामुळे राज्यांचे सार्वभौमत्व आपण केंद्राकडे आणत आहोत ही वस्तुस्थिती आहे,' असे ते म्हणतात.

तरीसुद्धा संपूर्ण जगभरात वस्तू आणि सेवा कराच्या (जीएसटी) दुष्परिणामांबाबतचा रामबाण उपाय म्हणून जीएसटीचा संपूर्णतया स्वीकार करण्यात आलेला नाही,हे आपण लक्षात ठेवणे गरजेचे आहे.खरे तर अमेरिकेने देखील कोणत्याही रुपात जीएसटी ला मान्यता

दिलेली नाही.कदाचित राज्यघटनेचे संघराज्यीय स्वरूप हे त्याचे कारण असावे. अमेरिकी संघराज्य अधिकारी वर्गाने राज्ये आणि इतर महापालिका सरकारांनी इतक्या प्रकारचे कर लादलेले असल्याने करांच्या संख्येत बेसुमार वाढ झाली आहे.त्यामुळे नवीन येणारा




गोंधळात पडतो. त्यांच्या देशात विशेषत: प्रत्यक्ष कर हे राज्यांच्या अखत्यारित येतात.आपल्याकडे भारतात वेगळी परिस्थिती आहे.आपल्याकडे कराची आकारणी केंद्र सरकार करते आणि नंतर त्याचा हिस्सा एका ठरवलेल्या सूत्रानुसार राज्यांना दिला जातो.

राज्याच्या कायद्यानुसार राज्य आणि स्थानिक करपात्र उत्पन्न ठरवले जात असले तरी ते संघराज्याच्या करपात्र उत्पन्न गणनेवर अवलंबून असते.मात्र,काही राज्यांच्या बाबतीत ही परिस्थिती नाही. करपात्र उत्पन्न मोजण्याच्या पर्यायी पद्धती त्यांनी शोधल्या आहेत किंवा पर्यायी करही निर्माण केले आहेत.या सगळ्या गोंधळाच्या परिस्थितीमुळे प्रत्येक व्यक्तीला स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या २४.८ टक्के कर भरावा लागतो. भारतात मात्र हे प्रमाण १६.६ टक्के आहे.

खरे तर कॅनडामध्ये गेल्या शतकातच जी एस टी सुरु करण्यात आला आहे. प्रत्यक्ष कर ठरवण्याचे अधिकार प्रांतांना आहेत तर संघराज्य सरकार अप्रत्यक्ष कर ठरवते.त्यामुळे त्यांच्याकडे जी एस टी स्वीकारताना राज्यांच्या अधिकारांवर कोणतीही बंधने लादली गेली नाहीत.

वस्तू आणि सेवा कराची भारतात अंतिमत: जेव्हा अंमलबजावणी सुरु होईल तेव्हाच भारतीय राज्यव्यवस्थेचा त्याला प्रतिसाद कसा राहील,हे कळेल.नव्याने विकसित झालेली ही करपद्धती बरीच चर्चा होऊन ठरवण्यात आली असल्याने तिचा चांगल्या प्रकारे स्वीकार होऊन विकासाच्या नव्या मार्गावर वाटचाल सुरु होईल.

अंतिमत: राज्यांना जर व्यवस्थित संरक्षण देणारी आर्थिक व्यवस्था हवी असेल तर ते ऑस्ट्रेलियन मॉडेलची (पद्धतीची) निवड करू शकतात.या पद्धतीमध्ये ७५ टक्के करांची उभारणी ही संघराज्य किंवा राष्ट्रकुल सरकारकडून केली जाते.आणि अत्याधुनिक यंत्रणेद्वारे म्हणजे भारतातल्या वित्त आयोगाच्या धर्तीवरील संस्थांद्वारे त्याचे वितरण केले जाते.नाहीतर दुसरा पर्याय कॅनडातील मॉडेलचा असू शकतो.यामध्ये भारतातील राज्ये करांची अदलाबदल करून अप्रत्यक्ष करांच्या वसुलीचा अधिकार केंद्राकडे सोपवू शकतात आणि प्रत्यक्ष उत्पन्नावर कर बसवण्याचा अधिकार स्वत:कडे घेऊ शकतात.किंवा पूर्णपणे नव्या व्यवस्थेचे नियोजन करू शकतात.

भविष्यात भारतातील राज्यव्यवस्था करआकारणी कायद्याची स्वत:ची अशी अद्वितीय पद्धत शोधून काढेल. असे असले तरी सध्या वस्तू आणि सेवा कर अर्थात जी एस टीमुळे देशात मोठी घुसळण झाली,चर्चा झाली त्यामुळे येत्या काही वर्षांत भारतीय संघराज्य संबंधांबाबत स्पष्टता येईल,अशी अपेक्षा करूया!

■■■

*लेखक 'टेलिग्राफ'या दैनिकामध्ये 'एडिटर-बिझीनेस'या पदावर कार्यरत असून मागील २५ वर्षांपासून अर्थविषयक लिखाण करित आहेत.*

email: jrchowdhury@yahoo.com

# अप्रत्यक्ष कर सुधारणांचा आलेख

नजीब शाह



**सन २०१५–१६ मध्ये अप्रत्यक्ष कर वसुलीमध्ये वाढ दिसून आली असून-अप्रत्यक्ष कराचे राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरचे गुणोत्तर २०१४-१५ मध्ये ४.४% इतके होते, जे आता २०१५-१६ मध्ये ५.२% इतके झाले आहे. अप्रत्यक्ष कराचे राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरचे अंदाजित गुणोत्तर २०१६-१७ साठी ५.२०% इतके मानले गेले आहे. सीबीइसीला २०१५-१६ मध्ये ७.९ लाख कोटी इतका महसूल मिळाला. या मध्ये ३१% इतकी वाढ झालेली आहे.**

देश उभारणीच्या प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष कर महत्वाची भुमिका निभावत असताना जकात मंडळ - सेंट्रल बोर्ड ऑफ एक्साइज अँड कस्टमस् (सी बी इ सी) हे वैधानिक कार्यकारी मंडळ कार्यरत असते. हे मंडळ केंद्रीय महसूल अधिनियम १९६३ (१९६३ च्या ५४ कलम) या कायद्यान्वये स्थापित झाले आहे. केंद्रीय जकात कर, तसेच केंद्रीय उत्पादन शुल्क त्याचप्रमाणे सेवाकर आकारणीसाठी मांडणी करणे, अंमलबजावणी संदर्भात धोरण ठरवणे याकरीता हे मंडळ कार्यरत असते. देशाच्या वाढी आणि विकासामध्ये महसूल गोळा करण्याच्या कामी महत्वपूर्ण योगदान दिल्याच्या कामी केंद्रशासन या गोष्टीची दखल घेत असताना करविषयक धोरण, स्पर्धात्मक अंदाज व्यक्त करण्यायोग्य, पारदर्शक वातावरण तयार करणारे शिवाय ज्याचा दृष्टीकोन नकारात्मक नसेल अशा धोरणांसाठी आग्रही असते. रॅपीड धोरणांतर्गत (RAPID for R-Revenue, A-Accountability, P-Probity, I-Information, D-Digitisation) केंद्रीय उत्पादन शुल्क व जकात मंडळाने (सी बी इ सी) अनेकविध प्रकारांनी पुढाकार घेतला आहे. ज्यायोगे भारतात उद्योग करण्यासाठी अनुकूल वातावरण तयार होईल. उत्पादन क्षेत्र , आयात तसेच निर्यात या साऱ्यांसाठी बंधने शिथील करणे, त्याच प्रमाणे सुयोग्य अशी करप्रणाली निर्माण करणे आदींचा समावेश यात आहे.

सन २०१५–१६ मधील अप्रत्यक्ष करांची कार्यवाही अशी की, अप्रत्यक्ष कर वसुली मध्ये वाढ दिसून आली असून - अप्रत्यक्ष कराचे राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरचे गुणोत्तर २०१४-१५ मध्ये ४.४% इतके होते, जे आता २०१५-१६ मध्ये ५.२% इतके झाले आहे. अप्रत्यक्ष कराचे राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरचे अंदाजित गुणोत्तर २०१६-१७ साठी ५.२०% इतके मानले गेले आहे. सीबीइसीला २०१५-१६ मध्ये ७.९ लाख कोटी इतका महसूल मिळाला. या मध्ये ३१% इतकी वाढ झालेली आहे. त्याच प्रमाणे चालू वित्तीय वर्षात ७.८ लाख कोटी महसुलाचे लक्ष्य ठरविले गेले आहे.

सीबीइसी ने गेल्या अडीच वर्षामध्ये ज्या गोष्टीच्या सहाय्याने नेत्रदीपक पावले उचलली आहेत. ती खालील प्रमाणे:

- **मेक इन इंडिया अर्थात स्थानिक निर्मितीचा आरंभ**

खाजगी क्षेत्राला संरक्षण विषयक उत्पादनांसाठी, सार्वजनिक उद्योगांबरोबर कार्यरत राहण्यासाठी जकात कर तसेच उत्पादन शुल्क माफ केले जाते. त्याचप्रमाणे संरक्षणादी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना उत्पादन शुल्क सूट देण्यात आली आहे.

**जीएसटीच्या अंमलबजावणी करीता पावले उचलणे:-**

- दागिन्यांवर (इनपुट टॅक्स क्रेडीट सोडून) १% इतके उत्पादन शुल्क आकारणे.
- कर बाहूल्य (मल्टीप्लिसिटी ऑफ टॅक्स) कमी करण्यासाठी विविध मंत्रालयानी लावलेले तसेच महसूल खात्याने नियंत्रण ठेवलेले १३ प्रकारचे अधिभार संपविण्यात आले आहेत.ज्यामध्ये शिक्षणकर तसेच माध्यमिक आणि उच्च शिक्षणाकरिता उत्पादित मालावरील शुल्कावर अधिभारीत केलेला कर काढून टाकण्यात आला आहे.
- शासन, स्थानिक स्वराज्य संस्था या उद्योगसमूहातून पुरवल्या जाणाऱ्या विविध सेवांवर सेवाकर आकारतात. ह्याला अपवाद तो केवळ सेवाकरमुक्त सेवा आणि नकारयादीत अंतर्भाव असणाऱ्या सेवा.

**व्यवसायातील सहजसुलभता**

- यातील मुद्दे असे की, जकाती संदर्भातील निपटारा करणे, त्याकरिता अनुकूल वातावरण , निर्यात मालासाठी झटपट मंजुरी या करिता कस्टम क्लिअरन्स फॅसिलीटेशन कमिटी (सीसी एफसी) हे मंडळ प्रत्येक प्रमुख बंदरावर त्याच प्रमाणे विमान तळावर कार्यरत आहे.
- सीबीइसी (सेंट्रल बोर्ड ऑफ एक्साइज अँड कस्टम) ने 'स्विफ्ट' (सिंगल विंडो इंटरफेस फॉर फॅसिलिटेटींग ट्रेड ) ही योजना १.४.२०१६ पासून आणली आहे. स्विफ्ट मुळे जकात विषयक सर्व कागदपत्रांची एकाच वेळी विशिष्ट ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून कस्टम विषयक क्लिअरन्स साठी पूर्तता केली जाते. जे काही परवाने मिळवायचे असतील ते परवाने कस्टम क्लिअरन्सच्या बाबतीत इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे न जाता मिळवता येतात. वैयक्तिकरित्या कोणत्याही प्राधिकरणाकडे जाण्याची गरज पडत नाही. १ एप्रिल २०१६ पासून हा प्रकल्प कार्यान्वयीत झाला आहे. त्यामुळे कागदपत्रे पडताळणीच्या कामाच्या वेळेची १ एप्रिल २०१६ पासून सुमारे १० लक्ष आयात संदर्भातील कागदपत्रांची (बिल ऑफ एंट्री ) यशस्वीरित्या पूर्तता झाली आहे.

***'स्विफ्ट' (सिंगल विंडो इंटरफेस फॉर फॅसिलिटेटींग ट्रेड) ही योजना १.४.२०१६ पासून आणली आहे. स्विफ्ट मुळे जकात विषयक सर्व कागदपत्रांची एकाच वेळी विशिष्ट ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक माध्यमातून कस्टम विषयक क्लिअरन्स साठी पूर्तता केली जाते. जे काही परवाने मिळवायचे असतील ते परवाने कस्टम क्लिअरन्सच्या बाबतीत इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे न जाता मिळवता येतात. वैयक्तिकरित्या कोणत्याही प्राधिकरणाकडे जाण्याची गरज पडत नाही.***

- सीबीइसीने एक महत्वपूर्ण निर्णय घेत, ०१.०१.२०१६ पासून सर्व आयातदार व निर्यातदार त्यांच्या सागरी तसेच हवाई वाहतुकीची कागदपत्रे डिजिटल स्वाक्षरीच्या माध्यमातूनच कार्यान्वित करतील. या कार्याचा आवाका विस्तारत आहे. भविष्यात प्रत्यक्षरित्या कागदपत्रे सादर करण्याची गरजच पडणार नाही.
- काही आयात तसेच निर्यात मालाच्या विशिष्ट गटाला शासनाप्रति भरावा लागणारा कर लांबणीवर टाकण्याची मुभा देण्यात आली आहे. याचा फायदा असा की कर न भरताच तुम्ही बंदरामधून आपला माल सोडवू शकाल किंवा निर्यात करु शकाल. उद्योगांना जलदगतीने काम करण्यासाठी याचा खूप उपयोग होईल तसेच उद्योगांच्या हातात कर न भरल्यामुळे खेळते भांडवलही राहील.
- १९ बंदरे आणि १७ हवाई संकुलांमध्ये अखंड २४ x ७ सेवा जकात (कस्टम) विभागाने सुरु केली आहे.

- उद्योगांच्या मालाच्या मूल्यांकनासाठी 'खास मूल्यांकन शाखा' निर्माण करण्यात आल्या असून त्याच बरोबर विश्वसनीय संबंध प्रस्थापित करणाऱ्यांसाठी प्रक्रियेतूनही सूट देण्यात आली आहे.
- उत्पादन शुल्क कर भरणा करणा-यांसाठी सेवा कराचा परतावा आणि सूट देण्यासाठी RTGS / NEFT या माध्यमांचा इ पेमेंट पध्दतीने (इंटरनेटच्या सहाय्याने) भरणा करण्याची सोय केलेली आहे.
- उत्पादक व्यवसाय करण्याऱ्याला पूर्वी २७ प्रकारची विविध रिटर्न्स (देय) भरावी लागत असत आता ती संख्या १३ पर्यंत आली आहे.
- सेन-व्हॅट क्रेडीट नियमांमध्ये सुलभता आणून कायद्याची किचकट प्रक्रिया कमी करण्यात आली आहे.
- नोंदणीकृत व्यापाऱ्याला ग्राहकांपर्यंत परस्पर माल पाठविण्याची मुभा देण्यात आली आहे. हीच सुविधा जॉब वर्क साठीही उपलब्ध आहे.
- सेन-व्हॅट अंतर्गत भरलेल्या उत्पादन शुल्कावर किंवा करावर सेनव्हॅट क्रेडीट अंतर्गत घेण्याच्या कालमर्यादेत वाढ करुन तो कालावधी ६ महिन्यावरुन १२ महिन्यांपर्यंत वाढवला आहे.
- महालेखा नियंत्रकांनी हिशेब तपासाअंतर्गत उपस्थित केलेल्या प्रश्नांसाठी उपाय शोधून एक परिपत्रक काढून सारी प्रक्रिया सोपी केली आहे. हे परिपत्रक असे सांगते की, ज्यावेळी हिशेब तपासाअंतर्गत मागणीचा भरणा करण्याचा प्रश्न येईल त्या त्या वेळी ही प्रक्रिया गतिमान करुन प्रश्न सोडवला जाईल. हा प्रयत्न करदात्याशी सुसंवाद साधला जावा आणि कोणत्याही तऱ्हेची कटुता येऊ नये या करिता आहे.
- निर्यातदाराला निर्यात केल्यापासून ५ दिवसांच्या आत ८०% परतावा दिला जाईल.

वादमिमांसा आणि दावा व्यवस्थापन

- जकात, उत्पादन शुल्क तसेच सेवाकरांच्या दंडात्मक तरतुदीचे सुसुत्रिकरण करण्यात आले असून त्यामुळे प्रोत्साहन तर मिळतेच. पण, वादांचा निपटारा लवकरात लवकर होतो.
- सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निवाडे अभ्यासून त्याच संदर्भातील उच्च न्यायालयात तसेच सेसटॅट (CESTAT) अंतर्गत दावे मागे घेऊन न्यायालयाचा अवमान न करता खात्यांतर्गत खटले निकाली काढणे.
- माननीय उच्च न्यायालय तसेच सेसटॅट (निवाडा मंडळ) यांच्याकडे पूर्वी १० लाखापर्यंत असलेल्या दाव्यांची न्यायक्षेत्र मर्यादा वाढवून १५ लाख इतकी केली असल्याने उच्च न्यायालयातील २०५१ दावे तर सेसटॅट मधील ५२६१ दावे काढून घेण्यात आले आहेत.
- १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या, कायदेशीर कारवाई चालू असलेल्या ५ लाखापर्यंतचे दावे मागे घेण्यात आले आहेत.
- मुख्य आयुक्त तसेच इतर आयुक्तांना ५० लाखावरील दाव्यांमध्ये कारणे दाखवा सुचनेच्या कामी सल्ला मसलत करणे सक्तीचे केले आहे.

या ठिकाणी एक नवीन बाब सांगणे प्रस्तुत ठरेल. FICCI त्याच प्रमाणे KPMG यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षांपासून सीबीईसी करदात्यांचे सर्वेक्षण करत आहे. करदात्यांच्या विचारांचा मागोवा घेतला जात आहे. त्यामध्ये ७२% प्रतिसाद असा होता की, कर खात्याने राबवलेले नूतन करविषयक धोरण हे करदात्यांना विश्वासात घेणारे मुक्त असे आहे. आयातदार तसेच निर्यातदारांसाठी कागदपत्रांच्या क्लिअरन्ससाठी जे नवीन बदल घडवून आणले आहेत, त्यामुळे वेळ व पैसा यांची खूप बचत झाली आहे.

या साऱ्यांचा दृश्य परिणाम देखील सकारात्मक आहे. आपल्या मालवाहतुकीमध्ये खूप सुधारणा झाली आहे. लॉजीस्टीक परफॉर्मन्स इन्डेक्स (LPI) खूप चांगला आहे. जागतिक बँकेने एलपीआय निर्देशकांप्रमाणे एक सर्वेक्षण केले होते. त्यामध्ये आपल्या मालवाहतुकीमध्ये १९ अंकांनी सुधारणा (५४ वरुन ३५) झाली आहे. भारतीय जकात खात्यानेही २७ अंक (६५ वरुन ३५) इतकी प्रगती साधली आहे. २०१४ च्या तुलनेत २०१६ मध्ये हे सुधार अधिक दिसून आले आहेत.

**वस्तु आणि सेवा कर**

शासन, अर्थशास्त्रज्ञ आणि उद्योग समूह या साऱ्यांच्याच मनावर जीएसटीने गारुड केले आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर गेल्या काही

महिन्यात या विषयी अत्यंत तीव्रतेने चर्चा करण्यात येत होती. जीएसटी चा पाया अर्थसंकल्पीय भाषणात २००६ साली प्रथम घातला गेला होता. त्यानंतर १२२ व्या घटना दुरुस्ती विधेयकात या संबंधी सातत्यपूर्व प्रयत्नांनंतर जीएसटी आकारास आले.

**जीएसटी कशासाठी ?**

सद्य स्थितित केंद्र सरकार उत्पादित मालावर कर लावते (केंद्रीय उत्पादन शुल्क), सेवांसाठी तरतूद आहे (सेवा कर) आंतराज्यीय मालावर कर आहे (केंद्र सरकार द्वारा आकारित परंतु राज्य सरकार द्वारे जमा होणारा कर), किरकोळ विक्रिवर लावलेला राज्य सरकारी कर (व्हॅट- व्हॅल्यू अॅडेड टॅक्स) , मालावरील प्रवेश कर (एंट्री टॅक्स), लक्झरी टॅक्स (विलास कर), खरेदीकर, यावरुन हे स्पष्ट होते की, राज्यांनी लावलेला कर तसेच केंद्राने लावलेला कर यांच्या दरम्यान करआकारणीमध्ये पोकळी आहे. या मार्गिकेमध्ये करांमधील फरक अत्यंत अस्पष्ट दिसतो. यामुळे करांवर कर असे चित्र यातून निर्माण होत असल्याने केंद्राकडून आकारलेल्या करांवर, राज्यांकडून सेट ऑफ मिळत नाही. मात्र व्हॅट करांमुळे करांच्या दरामध्ये बदल झाला आहे. विविध कर पध्दती आणि कर दर देशभरात वस्तु व सेवा करप्रणाली मध्ये दिसून येत असल्यामुळे देश विविध आर्थिक परिघांमध्ये विभागला गेला आहे. स्थानिक जकात, प्रवेश कर, तपासणी नाके यामुळे देशांतर्गत मुक्त व्यापाराला व्यत्यय येतो. त्याशिवाय, करांचे जेवढे प्रकार तेवढीच त्या त्या प्रकारच्या रिटर्न्सची पूर्तता करणे करदात्याला कठीण जाते. असे म्हटले जाते की, आपल्या कर-कायद्यानी अशी परिस्थिति निर्माण केली आहे की, तार्किक, आर्थिक घटकांऐवजी करविषयक कायद्याच्या माध्यमातून प्रथम विचार करावा लागतो. यामुळे एक कर पध्दतीची गरज निर्माण झाली असून आपण विस्तृत प्रमाणात या सर्व समस्यांचे निराकरण करु शकतो.

***एस जीएसटी अर्थात राज्यांचा जीएसटी आणि आय जीएसटी अर्थात इंटीग्रेटेड जीएसटी या एक समान करपध्दती कर चुकव्यांना प्रोत्साहित करणारी रक्कम कमी करतील. कारण दर समानीकरणामुळे पणन क्षेत्रात शेजारील राज्याराज्यांमधील व्यापारात सुरळीतपणा येणार आहे.***

उपरोक्त सर्व कर, येत्या काळात एकत्रितरित्या एका ‘कर’नामे लागू होणार आहेत. यालाच ‘‘जीएसटी‘‘ असे म्हणतात. ज्यामध्ये वस्तू व सेवांच्या पुरवठ्याच्या प्रत्येक टप्प्यावर म्हणजे निर्मिती किंवा आयात ते किरकोळ विक्रीपर्यंतच्या टप्प्यापर्यंत दुहेरी करआकारणी केली जाईल. केंद्र सरकार- केंद्रीय जीएसटी च्या माध्यमातून तर राज्य सरकार राज्य पातळीवर कर आकारेल तथा प्राप्त करेल. आंतर राज्यातील व्यापारी देवाण घेवाणीवर आयजीएसटी लागू केला जाईल.

**जीएसटीचे फायदे:**

अ. शासनाच्या दृष्टीने फायदा

- विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन तसेच ‘मेक इन इंडिया‘ मोहिमेच्या दृष्टीकोनातून अखिल भारतीय पातळीवर राष्ट्रीय बाजारपेठेची संकल्पना राबवता येईल.
- करांवर कर आकारण्याच्या पध्दती बंद होऊन ‘इनपुट टॅक्स क्रेडीट’ मालाच्या तसेच सेवांच्या प्रत्येक पातळीवर घेण्याची सोय उपलब्ध होईल.
- कायद्याचे, करदरांचे सुसुत्रिकरण होईल.
- कार्यप्रणालीच्या पुर्ततेसाठीच्या वातावरणात सुधारणा होईल. कारण ऑनलाइन पध्दतीने -रिटर्न्स भरणे, भरलेल्या करावरील क्रेडीट याच पध्दतीने तपासून पहाता येईल मुख्य म्हणजे ऑनलाइन पध्दतीने काम केल्याने कागदपत्रांची हाताळणी कमी होईल.
- एस जीएसटी अर्थात राज्यांचा जीएसटी आणि आय जीएसटी अर्थात इंटीग्रेटेड जीएसटी या एक समान करपध्दती कर चुकव्यांना प्रोत्साहित करणारी रक्कम कमी करतील. कारण दर समानीकरणामुळे पणन क्षेत्रात शेजारील राज्याराज्यांमधील व्यापारात सुरळीतपणा येणार आहे.
- उद्योगांनी केलेले व्यवहार ऑनलाइन जुळविता येणार असल्याने इनपुट टॅक्स क्रेडीट या प्रकारामध्ये संपूर्ण भारतभर एकच प्रणाली वापरण्यात आहे. त्यातून अधिकाधिक पारदर्शकपणा येणार आहे. त्याचबरोबर ‘इनव्हॉईस शॉपींग‘ला आळा बसणार आहे.
- करदात्यांच्या नोंदणीसाठी समान पध्दती अवलंबविण्यात येणार

आहे. त्याचबरोबर करपरतावा, रिटर्न्स च्या स्वरुपात एक समानता, सर्वसाधारण करांचा पाया, सेवा व वस्तू यांची एकसमान यादी, यामुळे करप्रणालीमध्ये खात्री वाटेल अशी व्यवस्था येणार आहे.

- माहिती आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर केल्यामुळे मानवी सहभाग कमी होऊन करदाते आणि कर प्रशासन यांच्या मध्ये चांगले संबंध प्रस्थापित होऊन भ्रष्टाचाराला आळा बसवता येईल.
- जागतिक व्यापार संघटनेच्या 'नॅशनल ट्रीटमेंट'या तत्वाला अनुसरुन जीएसटीचे कार्य असल्याने, ज्या योगे आयात मालावर अतिरिक्त जकात लावून समानता आणण्याच्या प्रक्रियेमध्ये अधिकाधिक पारदर्शकता येईल.
- उत्पादन प्रक्रिया आणि निर्यात यांना नवा जोम प्राप्त होणार आहे. त्यामुळे अधिकतर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून विकासामध्ये भरघोस अशी वाढ होईल.
- सरते शेवटी अधिक रोजगार उपलब्ध झाल्याने तसेच आर्थिक स्त्रोत वाढल्यामुळे गरीबीचे निर्मूलन होणार आहे.

ब. व्यापार व उद्योग यांच्या दृष्टीकोनातून फायदे

- काही बाबींमध्ये सूट मिळाल्याने करप्रणालीच्या दृष्टीतून साधे सोपे वातावरण
- आजच्या क्षणी अप्रत्यक्ष करांची प्रशासकीय प्रक्रिया राबविल्यामुळे करबहुलता (टॅक्स मल्टिप्लिसिटी) होते, ती कमी ठेवून एकसुत्रीपणा तसेच सुटसुटीतपणा येण्याकरिता मदत होणार आहे.
- करांच्या वारंवारतेला प्रतिबंध बसून उद्योजकांना मालाच्या व सेवेच्या प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यांवर इनपुट टॅक्स क्रेडीट मिळेल.
- अनेकविध प्रकारे हिशेब ठेवण्याचा प्रकार थांबणार आहे. अनेक प्रकारच्या करांना सामोरे जावे लागणार नाही. साहजिक प्रशासकीय पुर्ततेच्या कामामध्ये कमी येणार असून , या सर्वासाठी लागणाऱ्या मनुष्यबळ तसेच स्रोतांवर कमी खर्च येईल.


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________________ date ____________

Name (in block letters) : ____________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________________

Phone No. / email : ____________________

PIN : □□□□□□


Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

• निर्याती संबंधातील करांबाबतची उदासीनता कमी होईल. साहजिकच कमी करांमुळे आपल्याला अधिक स्पर्धात्मक भाव देण्यास मदत होऊन, भारतीय निर्यात व्यापाराला नवा जोश प्राप्त होईल.




• नोंदणी, रिटर्नस्, परतावा तसेच कर भरणा आदी मध्ये साधी सोपी तसेच स्वयंचलित प्रक्रिया सुरु होणार आहे.

• सर्वसामान्य जीएसटी पोर्टलच्या माध्यमातून बऱ्याच घडामोडी घडणार असल्याने करदाते आणि कर प्रशासन यांच्यातील दैनंदिन प्रत्यक्ष संबंध कमी होईल.

• नोंदणी संदर्भातील कामे, परतावे आदि महत्त्वाच्या कामांसाठी कालमर्यादा घालण्यात येणार आहे.

• कंपन्यांवरील करांचे ओझे कमी होणार आहे. परिणामत: मालांच्या किंमती कमी होतील. कमी किंमतीमुळे मालाला उठाव येईल. याचा परिणाम म्हणून उत्पादन आणि उत्पादकता वाढेल. औद्योगिक विकास वाढेल. या साऱ्यांचा एकत्रित परिणाम म्हणजे 'भारत एक उत्पादनाचे केंद्र' म्हणून विकसित होईल.

■■■


*लेखक केंद्रीय अबकारी आणि सीमाशुल्क मंडळाचे अध्यक्ष आहेत.*

email:chmn- cbec@nic.in



Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

फोकस

# काळ्या पैशाच्या प्रतिबंधासाठी सरकारचे युद्धपातळीवरील प्रयत्न

## उपाय

दिलाशा सेठ




**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेवर आल्यानंतर लगेचच देशाच्या अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाचे समूळ उच्चाटन करण्याची मोहिम हाती घेतली. या मोहिमेअंतर्गत राबवण्यात आलेली महत्वाची योजना म्हणजेच** Income Declaration Scheme (IDS) **बहिशोबी उत्पन्न घोषणा योजनेबाबत सरकारने वेळोवळी जनतेला आवाहन केले. पंतप्रधानांनी गेल्या महिन्याच्या सुरूवातीलाच कर चुकवेगिरी करणाऱ्यांना अखेरचा इशारा देताना सांगितले होते की ३० सप्टेंबरनंतर सरकार कर चुकवणाऱ्यांना कायद्याचा कठोर बडगा दाखवताना कोणतीही हयगय करणार नाही.**

सप्टेंबर महिन्याच्या ३० तारखेला रात्री १२ वाजेच्या काही तास आधीपर्यंत कैक लोक देशातल्या विविध भागातील आयकर कार्यालयात हातात कागदपत्रांची चळत घेऊन रांगेत तिष्ठत होते, तर त्याचवेळी इतरही अनेकजण आपापल्या घरांतील संगणकावरून आयकर विभागाच्या संकेतस्थळावर तांत्रिक सोपस्कारांची पूर्तता करण्यात गढलेले दिसून येत होते. हे सर्व लोक एकाच महत्वपूर्ण कारणासाठी- आपआपली बेहिशेबी संपत्ती आणि मालकीच्या मालमत्तेची सर्व माहिती सरकारी आयकर कार्यालयात देण्यासाठी दिलेल्या शेवटच्या मुदतीपूर्वी सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी झटत होते. हे सर्व लोक एकूण त्या ६४,२७५ व्यक्तींपैकी होते ज्यांनी सरकारद्वारा या वर्षी १ जून रोजी आवाहन केल्याप्रमाणे चार महिन्यांच्या कालावधीत स्वत: जवळील काळ्या पैशाची माहिती उघड करण्याच्या एकमेव संधीचा लाभ घेऊन काळ्या पैशाशी निगडीत भविष्यातील धोक्यांपासून स्वत:ची कायमची सुटका करून घेतली. तसेच या संधीअंतर्गत सरकारने या सर्व लोकांना आयकर कायदा, मालमत्ता कायदा व बेनामी कायद्यांअंतर्गत असणाऱ्या जाचक शिक्षांपासून मुक्तता मिळण्याचीही शाश्वती देऊ केली आहे. Income Declaration Scheme (IDS),म्हणजेच उत्पन्न घोषणा योजनेमुळे सरकारला पुढील सप्टेंबरपर्यंत सुमारे ३०,००० कोटी रूपये करवसुलीद्वारे मिळणार असल्याचा अंदाज असला, तरी हा आकडा ६५,२५० कोटी रूपयांच्या घोषित मालमत्तांच्या केवळ ४५ टक्के एवढाच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेवर आल्यानंतर लगेचच देशाच्या अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाचे समूळ उच्चाटन करण्याची मोहिम हाती घेतली. या मोहिमेअंतर्गत राबवण्यात आलेली महत्वाची योजना म्हणजेच Income Declaration Scheme (IDS) बहिशोबी उत्पन्न घोषणा योजनेबाबत सरकारने वेळोवळी जनतेला आवाहन केले पंतप्रधानांनी गेल्या महिन्याच्या सुरूवातीलाच कर चुकवेगिरी करणाऱ्यांना अखेरचा इशारा देताना सागितले होते की ३० सप्टेंबरनंतर सरकार कर चुकवणाऱ्यांना कायद्याचा कठोर बडगा दाखवताना कोणतीही हयगय करणार नाही.

देशातल्या एकूण १२० कोटी लोकसंख्येपैकी ५ टक्क्यांहूनही कमी लोक किंवा ५.४३३ कोटी लोक आयकर दाते आहेत. परंतु यातलेही सर्व लोक नियमितपणे आपले उत्पन्न घोषित

करण्यात टाळाटाळ करचुकवेगिरी करतात. त्यामुळे प्रामाणिक करदात्यांवर प्रत्येकवेळी जास्त कराचे ओझे पडते.

देशाच्या अर्थव्यवस्थेतील एकूण काळ्या पैशाचा प्रवाह मोजणे कठीण असले तरीही विविध आर्थिक अहवाल व अंदाजपत्रांनुसार भारताच्या २ दशअब्ज डॉलर अर्थव्यवस्थेत सुमारे २० ते ७० टक्क्यांच्या आसपास काळा पैसा अस्तित्वात आहे.

स्वीस सरकारच्या अहवालानुसार, २०१० वर्षाच्या अखेरीपर्यंत सर्व स्वीस बँकांमध्ये भारतीय ठेवीदारांच्या सुमारे ९५०० करोड रूपये एवढ्या रकमेच्या ठेवी उपलब्ध होत्या. या रकमेपैकी सुमारे ८ लाख कोटी रूपये हा थेट कर महसूल होता. ज्यामध्येही ४० टक्के रक्कम वैयक्तिक आयकराची होती व उर्वरित ६० टक्के रक्कम ही व्यवसाय कराशी संबंधित होती.

यावरून आपल्या अर्थव्यवस्थेतील कररूपी उत्पन्नाची वाढत जाणारी संभाव्य व्याप्ती अधोरेखित होते. देशातील एकूण २५ कोटी कायमस्वरूपी खाता क्रमांक कार्ड (Permanent Account Number card-PAN Card ) असणाऱ्यांपैकी केवळ ५.४३ कोटी लोक कर भरतात. निवडणूकपूर्व वचननाम्यात उल्लेख असलेल्या प्रमुख आश्वासनापैकी एक म्हणजे अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाच्या समूळ उच्चाटनासाठी सरकारने आता कडक पवित्रा घेतला असून त्यामुळे करचुकवेगिरी करणाऱ्या व परदेशी बँकांत बेहिशोबी मालमत्ता असणाऱ्यांसाठी येणाऱ्या काळात कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. सद्यस्थितीत सरकार काळ्यापैशाचा धोका कमी व्हावा यासाठी एक व्यापक असे ठोस धोरण आखण्याचे काम करित आहे. तसेच इन्कम डिक्लेरेशन स्किम सोबतच इतर काही उपाययोजनांद्वारेही काळ्या पैशाचा विनियोग रोखण्यासाठी प्रयत्न करित आहे. इतर उपाययोजनांमध्ये प्रामुख्याने विदेशी संपत्ती प्रकटीकरण करण्यासाठी विशेष सरकारी विभाग, काही महत्वाच्या व मोठ्या आर्थिक घोटाळ्यांची व त्यानुषंगाने त्यात असलेल्या काळ्या पैशाचा माग घेण्यासाठी विशेष अन्वेषण पथकांची (एसआयटी) स्थापना, इतर राष्ट्रांशी केलेल्या करसंबंधीच्या करारात काही विशेष नियमांचा समावेश, रूपये २ लाखांहून अधिकच्या आर्थिक व्यवहारांसाठी पॅन कार्ड अनिवार्य करणे, तसेच विविध देशांशी भारतातील कोणत्याही उद्योग समूहाने केलेल्या प्रकल्पांची अंतर्गत माहिती तसेच स्वाक्षरी करारपत्राची सविस्तर माहिती प्रसिध्द करणे अनिवार्य करण्याचा नियम इ. चा समावेश आहे. देशातील करसंबंधी सुधारणा कायद्यांपैकी एक महत्वाचे पाऊल म्हणजेच वस्तू व सेवा कर कायदा (Goods and Services Tax) पुढील आर्थिक वर्षापासून लागू करण्यात येणार आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे अप्रत्यक्ष करचुकवेगिरीवर अंकुश ठेवण्यास मोलाची मदत होइलच पण त्याबरोबरच अप्रत्यक्ष करासंबंधी सर्व नियमांची पूर्तता करण्याचे प्रमाण वाढवण्यासही मदत होऊ शकेल. तसेच वस्तू व सेवा करात केंद्र व सर्व राज्यांचे विशेष कर जसे, अबकारी, जकात, मूल्यवर्धित कर इ. सर्वांचा समावेश असल्याने सरकारकडे जमा होणाऱ्या सर्व करांच्या परताव्यासाठी एक नियमबध्द शृंखला तयार होण्यास मदत होईल.

***स्वीस सरकारच्या अहवालानुसार, २०१० वर्षाच्या अखेरीपर्यंत सर्व स्वीस बँकांमध्ये भारतीय ठेवीदारांच्या सुमारे ९५०० करोड रूपये एवढ्या रकमेच्या ठेवी उपलब्ध होत्या. या रकमेपैकी सुमारे ८ लाख कोटी रूपये हा थेट कर महसूल होता. ज्यामध्येही ४० टक्के रक्कम वैयक्तिक आयकराची होती व उर्वरित ६० टक्के रक्कम ही व्यवसाय कराशी संबंधित होती.***

**करचुकव्यांना गाठण्यासाठी बिगर अनाहूत उपाययोजना :**

अर्थमंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या आर्थिक वर्षात सुमारे १६ हजार कोटी रूपये बिगर अनाहुत उपाय वापरून द्वारे गोळा केले आहेत. यामध्ये आर्थिक तपशीलांबाबत तिस-या घटकाकडून अप्रत्यक्षपणे माहिती जमवणे, किंवा पॅन कार्ड क्रमांकावरून आयकर विभागाच्या करदात्यांच्या अद्ययावत माहितीयंत्रणेतून आर्थिक व्यवहारांची माहिती मिळवणे इ.चा समावेश आहे. सद्यस्थितीत आयकर विभागाचा सुमारे ९२ टक्के महसूल हा उत्पन्नाच्या मूळ स्त्रोतावर लावण्यात आलेला कर (Tax Deducted At Source), आगाउ कर भरणा (advance tax) व स्वयं छाननी करातून (self-assessment tax) येतो. तर उर्वरित ८ टक्के आर्थिक व्यवहांच्या चौकशीतून गोळा केलेल्या रकमेतून येतो. आयकर विभागाच्या महसूल स्त्रोताचे या सर्वसाधारण स्वरूपात गेल्या वर्षापासून परिवर्तनाची नांदी दिसून येउ लागली आहे.

तंत्रज्ञानाच्या मदतीने कर चुकव्यांना वेठीस धरण्यासाठी, लार्सन एण्ड टर्बो इन्फोटेकच्या मदतीने सरकारला मोठ्या प्रकल्पांच्या अंतर्गत आर्थिक बाबींचे तपशील मिळवणे शक्य होणार आहे. तसेच आयकर खात्याकडे विविध

स्त्रोतांतून जमा करण्यात आलेल्या आर्थिक माहितीच्या आधारवरून पध्दतशीरपणे प्रत्येक पॅनकार्ड क्रमांक असलेल्या व्यक्ती व संस्थांचा स्वतंत्र व सविस्तर असा माहिती दस्तावेज (Profile) तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या माहिती सारणीवरून सर्व व्यक्तिगत आर्थिक व्यवहार जसे, स्थावर मालमत्ता खरेदी, दागिने किंवा वाहन खरेदी इ.बाबतच्या व्यक्तींच्या आर्थिक व्यवहाराचे तपशील आयकर विभागाकडे पध्दतशीरपणे उपलब्ध असतील. त्यामुळे कर चुकव्यांपर्यंत पोहचणे अधिक सुलभ होणार आहे. तसेच करभरतीचा घोटाळ्यात चुकवलेल्या कराच्या रकमेच्या चढत्या क्रमाने करचुकव्यांची यादी तयार करण्याची सोय असेल. त्यामुळे आयकर अधिकाऱ्यांना अधिक रकमेचा घोटाळा करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करणे शक्य होईल. केंद्रिय प्रत्यक्ष कर विभाग (The central board of direct taxes), गुप्तचर विभाग (Intelligence Bureau), व इतर सरकारी विभागांत वरील पध्दतीं व तंत्रज्ञान विकसित करण्याचे काम प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.

सरकारने नुकत्याच केलेल्या बदलांमध्ये १ जानेवारी २०१६ पासून सुमारे २ लाख रूपये व त्याहून अधिक रकमेच्या आर्थिक व्यवहारांसाठी संबंधितांना पॅन कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. याबरोबरच २ लाख रूपये त्याहून अधिक रकमेचे सोन्याचे दागिने खरेदी करतांनाही पॅन कार्ड असणे बंधनकारक केले गेले आहे. पूर्वी हा नियम ५ लाख व त्याहून अधिकच्या सोने खरेदीसाठी लागू होता. तसेच पोस्ट कार्यालये, सहकारी पतसंस्था, बिगर बँकींग पतसंस्था, निधी इ.मध्ये निश्चित ठेवी खाती असलेल्यांनाही पॅन कार्ड असणे आवश्यक करण्यात आले आहे.

सध्या प्रमुख सात प्रत्यक्ष माहिती स्त्रोत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्था व व्यवसायांना त्यांच्या सर्व आर्थिक व्यवहारांचे तपशील व वार्षिक आर्थिक माहिती अहवाल देणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामध्ये वर्षाला व्यक्तिगत किंवा संस्थांच्या रूपये १० लाख व त्याहून अधिक रकमेच्या ठेवी स्वीकारणाऱ्या बँका, एका वर्षात कोणाही व्यक्तीला रूपये २ लाख व त्याहून अधिक किंमतीची रक्कम क्रेडिट कार्डाद्वारे देऊ करणा-या कंपन्या किंवा बँका, कोणाही व्यक्तीने दोन लाखांहून अधिक रकमेच्या भागभांडवलाच्या विक्रीतून केलेली गुंतवणूक स्वीकारणारे म्युच्युअल फंड निधी (mutual funds), कोणाही व्यक्ती किंवी संस्थेकडून ३० लाख व त्याहून अधिक किंमतीच्या स्थावर मालमत्ता विक्री किंवा खरेदीच्या बदल्यात वर्षाला ५ लाख व त्याहून अधिक रकमेचे समभाग (Shares) किंवा कर्ज रोखे (Debenture) व निबंधक (Registrars) किंवा उप निबंधक (Sub-Registarer) स्वीकारणाऱ्या कंपन्या, रूपये ५ लाख व त्याहून अधिक किंमतीचे बाँड वितरित करणारी भारतीय रिजर्व बँक इ. चा समावेश आहे.

***गेल्या काही काळात केंद्रिय प्रत्यक्ष कर विभागाने सात लाख व्यक्तींना पत्र पाठवून उत्पन्न घोषणा योजना अर्थात* (Income Declaration Scheme) *अंतर्गत त्यांच्या सर्व बेहिशोबी मालमत्तेची माहिती देण्याचे आवाहन केले आहे. यावरून तिसऱ्या माहिती स्त्रोतांकडून नियमितपणे आर्थिक व्यवहारांची माहिती जमा करणे, त्याची पध्दतशीरपणे छाननी इ. सारख्या कामांचा व्याप आयकर विभाग किती प्रभावीपणे राबवत आहे, याची कल्पना येते.***

**आयकर विभागाच्या विस्तारत जाणाऱ्या कार्यमोहिमा :**

गेल्या अडिच वर्षांत वाढलेल्या करविषयक शोध व प्रत्यक्ष छाप्यांतून आयकर विभागाने सुमारे १,९८६ कोटी रूपये जप्त केले आहेत. तसेच ५६,३७८ कोटी रूपयांच्या बेहिशोबी मालमत्ता ताब्यात घेतल्या आहेत. यापैकी सर्वाधिक रक्कमेची जप्ती ही शैक्षणिक व आरोग्यक्षेत्राशी निगडित संस्थांमधून करण्यात आली आहे. या लोकांशी संपर्क करण्यासाठी आयकर विभागाने पॅन कार्ड क्रमांकाविना झालेल्या ९० लाखाहून अधिक आर्थिक व्यवहारांच्या कागदपत्रांची छाननी करून मिळवलेल्या माहितीच्या आधारे व उच्च रकमांच्या आर्थिक व्यवहारांच्या वार्षिक माहिती परताव्यांच्या Annual Information Returns (AIR) परिक्षणांतून बचत खात्यांतील रूपये १० लाखाच्या रोख ठेवी, ३० लाख रूपये व त्याहून अधिक किंमतीच्या स्थावर मालमत्तांची खरेदी किंवा विक्री व पॅन कार्डविना झालेल्या इतरही अनेक आर्थिक व्यवहारांचे तपशील उघड करण्यात यश मिळवले आहे. यावरून मिळवलेल्या माहितीनुसार गेल्या काही काळात केंद्रिय प्रत्यक्ष कर विभागाने सात लाख व्यक्तींना पत्र पाठवून उत्पन्न घोषणा योजना अर्थात (Income Declaration Scheme) अंतर्गत त्यांच्या सर्व बेहिशोबी मालमत्तेची माहिती देण्याचे आवाहन केले आहे. यावरून तिसऱ्या माहिती स्त्रोतांकडून नियमितपणे आर्थिक व्यवहारांची माहिती जमा करणे, त्याची पध्दतशीरपणे छाननी इ. सारख्या

कामांचा व्याप आयकर विभाग किती प्रभावीपणे राबवत आहे, याची कल्पना येते. त्याप्रमाणेच, कामाची व्याप्ती वाढवण्यासंबंधी नियम करताना नुकतेच खाणकाम क्षेत्राशी संबंधित कंपन्यांच्या उत्पादन व कर परताव्याचे सर्व तपशील अभ्यासावेत व त्यात काही तफावत आढळल्यात त्वरित कारवाई करावी, असे निर्देशही केंद्रिय प्रत्यक्ष कर विभागाने आपल्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

तसेच अप्रत्यक्ष करांच्या बाबतीत कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीतून ५० हजार कोटी रूपयांची चुकवलेले कर रक्कम पाप्त करण्यात व २१ हजार कोटींची बेहिशोबी रक्कम शोधून काढण्यात विभागाला यश मिळाले आहे. काही महिन्यांपूर्वी आयकर अधिकाऱ्यांशी साधलेल्या संवादात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते की, जर केंद्रिय प्रत्यक्ष कर विभागातील ४२ हजार अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष करातून येणाऱ्या महसूलासंबंधी कार्यमोहिमा यशस्वी केल्या, तर नजीकच्या काळात करउत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे.

**रोख व्यवहारांवर अंकुश ठेवण्यासाठी विशेष शोध गट:**

काळ्या पैशाच्या समस्येबाबत २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. एम बी शाह यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष शोध गटाची स्थापना करण्यात आली. या गटाने सादर केलेल्या प्राथमिक अभ्यास अहवालानुसार अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाचा विनियोग थांबवण्यासाठी तीन लाख व त्यावरील किंमतीच्या रोख आर्थिक व्यवहारांवर व व्यक्तीगत स्तरावर १५ लाख रूपये व त्याहून अधिक रोख रक्कम जवळ बाळगण्यावर निर्बंध आणले पाहिजेत.

अनेक देशांतील परिस्थितीचा सखोल अभ्यास करून या गटाने सुचविलेल्या या उपाययोजनांची जर शासनाने अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले तर वर नमूद केलेल्या रक्कमांवरील आर्थिक व्यवहार व दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त रोख स्वत:जवळ बाळगणे हा कायदेशीररित्या गुन्हा ठरेल.

तसेच या गटाने असाही निष्कर्ष मांडला आहे की, रोख व्यवहारांवर मर्यादा आणणे तेव्हाच शक्य होईल, जेव्हा व्यक्तिगत पातळीवर रोख रक्कम बाळगण्यावर ठराविक मर्यादा निश्चित केलेली असेल. कारण हाती कमी रोख असेल तरच कोणतीही नोंद नसलेले आर्थिक व्यवहार कमी होतील. जर एखाद्या प्रसंगी व्यवसायातील मोठ्या उलाढालीत कोणा उद्योजकाला जास्त रोख बाळगणे अवश्यक असेल तर अशा वेळी त्या व्यक्तीने त्याच्या विभागातील संबंधित आयकर आयुक्ताकडून तशी परवानगी मिळवावी, असेही या अहवालात सांगण्यात आले.

---

***काळ्या पैशाच्या समस्येबाबत २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. एम बी शाह यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष शोध गटाची स्थापना करण्यात आली. या गटाने सादर केलेल्या प्राथमिक अभ्यास अहवालानुसार अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाचा विनियोग थांबवण्यासाठी तीन लाख व त्यावरील किंमतीच्या रोख आर्थिक व्यवहारांवर व व्यक्तीगत स्तरावर १५ लाख रूपये व त्याहून अधिक रोख रक्कम जवळ बाळगण्यावर निर्बंध आणले पाहिजेत.***

---

या विशेष शोध पथकाने सरकारला अशी विनंतीही केली आहे की, ठराविक रक्कमेवरील रोख आर्थिक व्यवहार व मर्यादेपेक्षा जास्त रोख बाळगणे कायदेशीर गुन्हा म्हणून घोषित करावेत. सध्या केंद्रिय अर्थ मंत्रालय शोध गटाने सुचवलेल्या सर्व उपाययोजनांवर विचारविनिमय करित आहे.

याशिवाय, या गटाने भारतीय रिजर्व बँकेला महसूल विभागाच्या मदतीने आयात-निर्यात व्यापारातील आर्थिक तपशीलांची माहिती मिळवण्यासाठी विशेष संस्थात्मक यंत्रणा विकसित करण्याची सूचना केली आहे. या माहितीच्या आधारे शोध अधिकाऱ्यांना बेकायदेशीर रकमेचे व्यवहार उघडकिस आणण्यात मदत होऊ शकेल. ही माहिती महसूल गुप्तचर संचालनालय (Directorate of Revenue Intelligence) व सक्तवसूली संचालनालयाला (Enforcement Directorate) तपासणी करण्यासाठी उपलब्ध करून द्यावी अशी सूचनाही केली आहे. तसेच निर्यातीतून मिळवलेले उत्पन्न भारतात न आणता निर्यातीतील करांवर सूट मागणाऱ्या कंपन्यांविरूध्द कठोर कारवाई करावी, अशी सूचनाही या अभ्यास गटाने महसूल गुप्तचर संचालनालयाला केली आहे. कारण अशा बाबतीत देशाला दोन प्रकारचे नुकसान होते-एक तर देशाला निर्यात उत्पन्न मिळत नाही व दुसरे म्हणजे निर्यातीवरील करांचे उत्पन्नही कमी होते.

**अघोषित परदेशी उत्पन्न आणि मालमत्ता:**

कंपन्यांच्या व व्यावसायिकांच्या तसेच व्यक्तीगत परदेशातील आर्थिक व्यवहारांच्या माहितीचे आदानप्रदान करण्याबाबत इतर देशांशी केलेल्या

करारांमुळे यापुढे देशाबाहेर बेहिशोबी संपत्ती ठेवणे अधिकाधिक कठिण होणार आहे. गेल्या वर्षीपासून लागू करण्यात आलेल्या भारत-अमेरिका विदेशी खाते कर अनुपालन कायद्यांतर्गत (The Indo-US Foreign Account Tax Compliance Act -FATCA), परदेशी उत्पन्नावर लागणारा कर भरणे बंधनकारक करण्यात आले आहे. भारताने यापूर्वीच वरील कायद्यान्वये स्वयंचलित माहिती आदानप्रदानाची (Automatic Exchange of Information -AEOI) सुरूवात केली आहे. सरकार २०१७ पर्यंत या कायद्यानुसार इतर देशांतूनही आर्थिक माहिती प्राप्त करू शकेल. यातून मिळणारी माहिती येणाऱ्या काळातील संभाव्य आर्थिक उलाढालींची असली तरीही या माहितीच्या मदतीने आयकर विभागाला संबंधित व्यक्ती किंवा संस्थेच्या भूतकाळातील आर्थिक देवाणघेवाणीवरून प्रभावीपणे लेखापरिक्षण करता येईल.

सरकारने काळ्या पैशांच्या व्यवहाराशी संबंधित एकूण १७५ प्रकरणांपैकी एचएसबीसी बँकेच्या परदेशातील खात्यांतील ८००० कोटी रुपयांच्या सुमारे १६४ प्रकरणी खटले दाखल केले आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय शोध पत्रकारांच्या संघटनेने (International Consortium of Investigative Journalists -ICIJ) दिलेल्या शोधअहवालातून मिळालेल्या माहितीच्या आधारे सरकारने ५ हजार कोटी रूपयांच्या परदेशस्थ अघोषित बँकठेवी ताब्यात घेतल्या असून त्यातील ५५ प्रकरणी खटले दाखल करण्यात आले आहेत. जगभरात खळबळ माजवून देणाऱ्या पनामा घोटाळ्याबाबतच्या शोधमोहिमेत या प्रकरणाशी संबंधित इतर काही देशांतले २५० संदर्भ प्राप्त झाले असून त्यावरून सरकार त्या त्या देशांना कर चुकवणाऱ्या व्यक्ती व त्यांच्या संबंधित बँक खात्यांची माहिती इ. तपशील मिळवण्याच्या प्रयत्नात आहे.

२०१५ या वर्षात आयकर कार्यालयांत व रिजर्व बँकेत सुरू करण्यात आलेल्या अघोषित परदेशस्थ संपत्ती अनुपालन विभागामार्फत (Compliance window in २०१५ for undisclosed assets stashed abroad) सरकारला सुमारे ४१४७ कोटी रूपये व २४२८ कोटी रूपयांच्या महसूलावरील ६० टक्के करप्राप्तीचा लाभ मिळाला आहे.

---

***करचुकवेगिरी करणारे कित्येक लोक बरेचदा करसंबंधीत जाचक नियमांतील पळवाटा शोधून त्यातल्या त्यात शून्य करआकारणी न्यायक्षेत्राच्या किंवा कमी करआकारणी न्यायक्षेत्रे असलेल्या मॉरिशस, सिंगापूर आणि सायप्रस यांसारख्या देशांतील बँक खात्यांत आपली मालमत्ता लपवतात व अशा खात्यातील पैसा परदेशी भांडवलाच्या रूपाने भारतात आणतात.***

---

पनामा पेपर्स हे जागतिक पातळीवरील आर्थिक व्यवहारांची माहिती उघड करणारे एक महत्वाचे प्रकरण मानले जाते. अमेरिकेतील पनामा या शहरात मुख्यालय असलेल्या व जगभरात ४०च्या आसापास शाखा असणाऱ्या मोझॅ क फोन्सेका या कायदेविषयक कंपनीशी संबंधित १.१५ कोटी गुप्त कागदपत्रे आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या शोधपत्रकारांच्या एका जागतिक गटाने पनामा पेपर्स या नावाने उघड केली होती. या कागदपत्रांमध्ये २,१४,००० पेक्षा जास्त ऑफशोअर कंपन्यांबद्दलची विस्तृत माहिती या कंपनीचे भागधारक आणि संचालक आहेत त्यांची नावे व सविस्तर माहिती इ. चा समावेश आहे. या कागदपत्रांमध्ये जगातील एकूण १४० व्यक्तींनी पनामात आर्थिक व्यवहार केल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये जागतिक राजकारणी, उद्योगपती, व्यावसायिक, चित्रपट कलावंत, क्रीडापटू आणि अनेक बडया असामींची नावे आहेत. त्यांनी आपली मालमत्ता लपवण्यासाठी, कर चुकवण्यासाठी आणि अन्य लाभांसाठी पनामा, ब्रिटिश व्हर्जिन आयलंड्स, जर्सी, बहामा आणि सेशल्स बेटे अशा कर नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशांमध्ये स्थापन केलेल्या कंपन्यांच्यामार्फत मोठया प्रमाणात पैसा फिरवला असे या कागदपत्रांमधून समोर येत आहे. विशेष म्हणजे जवळपास ५०० भारतीयांची नावे पनामा पेपर्समध्ये नमूद केलेल्या कंपन्यांशी निगडित असल्याचे दिसून आले आहे. तर २३४ भारतीयांनी आपली पारपत्रे मोझॅक फोन्सेकाकडे कंपन्यांच्या स्थापनेसाठी आणि अन्य व्यवहारांसाठी आवश्यक दस्तावेज म्हणून जमा केल्याचे आढळले आहे. अभिनेते अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय बच्चन, उद्योजक नीरा राडिया, डीएलएफचे मालक के. पी. सिंग, इंडियाबुल्स या कपंनीचे मालक समीर गेहलोत, गुंड इकबाल मिर्ची, शिशीर बाजोरिया, अनुराग केजरीवाल, विनोद अदानी यांच्यासह अनेक बड्या भारतीय आसामींचा या यादीत समावेश आहे. तसेच भारताने विकत घेतलेल्या संरक्षण सामग्रीसाठी युरोपातील कंपनीने भारतीय एजंटना कसे पैसे दिले, याचाही त्यात उल्लेख आहे.

पनामा आर्थिक घोटाळयाच्या

अभ्यास केल्यानंतर भारतीय विशेष शोध गटाने SIT ने काळा पैसा अघोषित विदेशी उत्पन्न आणि मालमत्ता आणि आयकर कायदा- २०१५ मध्ये सुधारणा सुचवल्या आहेत. यामध्ये करदात्या व प्रत्येक भारतीय नागरिकाने परदेशात कोणतीही रक्कम गुंतवण्यापूर्वी किंवा परदेशात स्थावर मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी जरी भारतीय रिजर्व बँकेची परवानगी घ्यावी लागत नसली तरी, त्याच्या विभागातील कर आयुक्ताला तशी माहिती देणे अनिवार्य करण्याचा नियम करावा, असे सुचवले आहे.

**दुहेरी कर भरणी करारात सुधारणा**

करचुकवेगिरी करणारे कित्येक लोक बरेचदा करसंबंधीत जाचक नियमांतील पळवाटा शोधून त्यातल्या त्यात शून्य करआकारणी न्यायक्षेत्राच्या किंवा कमी करआकारणी न्यायक्षेत्रे असलेल्या मॉरिशस, सिंगापूर आणि सायप्रस यांसारख्या देशांतील बँक खात्यांत आपली मालमत्ता लपवतात व अशा खात्यातील पैसा परदेशी भांडवलाच्या रूपाने भारतात आणतात. दुहेरी कर टाळण्याचा करार (Double Taxation Avoidance Agreements DTAA) खरं तर प्रमाणिकपणे नियमित कर भरणा-यांना दोन देशांमध्ये दुहेरी कर आकारणीचे ओझे पडू नये, या उद्देशाने बनवला गेला होता, परंतु करचुकवेगिरी करणारे या नियमाचा गैरफायदा घेउन दोनही देशांतील कर भरणे टाळण्याचे मार्ग शोधून त्यात यशस्वी होतात. त्यामुळे सरकार आता या नियमात अमूलाग्र सुधारणा करण्यासाठी व शून्य किंवा कमी करआकारणी न्यायक्षेत्रांच्या देशातील भांडवली नफ्यावर कर लादण्याचे अधिकार मिळवण्याच्या प्रयत्नांत आहे. मॉरिशस व सायप्रस या देशांबरोबरचा दुहेरी कर आकारणी बाबतच्या करारात भारताने सुधारणा कायदा पारित करण्यात यश मिळवले आहे, तर सिंगापूरबरोबर याबाबत बोलणी सुरू आहे. भारतात येणाऱ्या एकूण थेट परदेशी गुंतवणूकीपैकी अर्ध्याहून अधिक भांडवल मॉरिशस व सिंगापूर या देशांतून येते. गेल्या पंधरा वर्षांत मॉरिशस मधून प्राप्त झालेल्या थेट परदेशी गुंतवणूकीचे मूल्य ९५.९ बिलिअन अमेरिकन डॉलर एवढे आहे, तर सिंगापूरहून आलेली थेट परदेशी गुंतवणूक ४५.८ बिलिअन अमेरिकन डॉलर एवढी आहे. सायप्रस या देशातून भारतात होणारी थेट परदेशी गुंतवणूक ८.५ बिलिअन अमेरिकन डॉलर असून हा देश भारतात होणारी थेट परदेशी गुंतवणूक करणाऱ्या देशांच्या यादीत आठव्या क्रमांकावर आहे.

***ऑगस्ट २०१६ मध्ये देशाच्या संसदेत मंजूर करण्यात आलेल्या बेनामी व्यवहार (प्रतिबंध) सुधारणा कायद्यामुळे कर आकारणी टाळण्यासाठी इतर व्यक्तीचे नाव किंवा काल्पनिक नाव वापरणाऱ्यांबाबत दंड व शिक्षांचे स्वरूप आणि संबंधित संकल्पनांच्या कायदेशीर व्याख्या अधिक स्पष्ट करण्यात आल्या आहेत. या सुधारणा कायद्यामुळे बेनामी व्यवहारांवर अधिकाधिक प्रतिबंध घालणे तसेच अयोग्य पद्धती वापरून कायदेशीर नियमांतून पळवाट काढण्याचे मार्ग रोखण्याचा हेतू साध्य होईल.***

एप्रिल २०१७ लागू करण्यात आलेल्या सर्वसामान्य करचुकवेगिरी विरोधक नियमावलीमुळे (General Anti Avoidance Rule -GAAR) शून्य किंवा कमी करआकारणी न्यायक्षेत्रे असलेल्या अर्थव्यवस्थांनी करभरणा विषयक कायदेशीर तरतूदींतील त्रूटींबाबत सुधारणा करण्यासाठी स्वत:हून पुढाकार घेतला आहे. सर्वमान्य करचुकवेगिरी विरोधक नियमावलीमुळे भारतीय आयकर अधिकाऱ्यांना शून्य किंवा कमी करआकारणी न्यायक्षेत्रे असलेल्या देशांतील आर्थिक व करविषयक व्यवहारांची छाननी व पडताळणी करण्याचा अधिकार मिळाला आहे.

भारताने मॉरिशसबरोबरच्या दुहेरी करभरणी टाळण्याचा करारात या वर्षी एप्रिल महिन्यात सुधारणा करताना या देशातून आलेल्या भांडवली नफ्यावर कर लावण्याचा अधिकार मिळवला आहे. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षापासून मॉरिशस मधील कंपन्यांना भारतात गुंतवणूक करतांना पुढील अडिच वर्षांच्या कालावधीत झालेल्या भांडवली नफ्यावर ५० टक्के दराने कर द्यावा लागेल. तर एकूण गुंतवणूकीच्या संपूर्ण कालावधीतील भांडवली नफ्यावरील कराचा दर २०१९ पासून लागू करण्यात येईल. सध्याच्या घडिला कमी मुदतीच्या भांडवली नफ्यावरील कराचा दर १५ टक्के एवढा आहे.

याप्रमाणेच सिंगापूरसोबतच्या संबंधित करारात सुधारणा करण्यासाठी वाटाघाटी सुरू असून २०१७ पासून या सुधारणा लागू होण्याची शक्यता आहे.

याबरोबरच सायप्रस या राष्ट्रानेही भारताला त्या देशात असणाऱ्या भागभांडवलांवरील उत्पन्न परताव्यावर कर लावण्याचे अधिकार देऊ करण्याबाबत सहमती दर्शवली आहे. अनेक युरोपीय व अमेरिकन कंपन्यांनी आजवर सायप्रस व भारत यांच्यातील

जुन्या करविषयक कराराप्रमाणे भांडवली नफ्यावर असलेल्या शून्य किंवा अतिशय कमी कराच्या तरतूदीचा फायदा घेऊन व सायप्रसमधील कंपन्यांना एकूण भांडवली नफ्यावर १० टक्के एवढ्या कमी दराने कर देऊन तर भारतात पूर्णत: करचुकवेगिरी करून सायप्रसमधून भारतात थेट गुंतवणूक केली व त्यातून बऱ्याच मोठ्या रकमेचा काळा पैसा भारतात गुंतवला. या बाबत माहिती देऊनही आजवर सायप्रस सरकार करविषयक कायद्यात सुधारणा करण्यास तयार नव्हते. त्यामुळे भारतासाठी हा देश काळ्या पैशाबाबत असहकार करणाऱ्या व त्या देशात असलेल्या भारतीयांच्या आर्थिक ठेवींबाबत सरकारला माहिती न पुरवणाऱ्या देशांच्या यादीत २०१३ या वर्षापासून अग्रस्थानी होता.

भारताने जगातल्या एकूण ८२ देशांबरोबर दुहेरी करभरणी टाळण्याचा करार केला आहे. त्यापैकी ३० देशांत या कायद्याची व्याप्ती वाढवतांना एकमेकांच्या वतीने कर गोळा करण्यासाठी परस्पर सामंजस्यातून प्रयत्न वाढवण्यावर भर दिला आहे.

**बेनामी व्यवहार कायदा:**

ऑगस्ट २०१६ मध्ये देशाच्या संसदेत मंजूर करण्यात आलेल्या बेनामी व्यवहार (प्रतिबंध) सुधारणा कायद्यामुळे कर आकारणी टाळण्यासाठी इतर व्यक्तीचे नाव किंवा काल्पनिक नाव वापरणाऱ्यांबाबत दंड व शिक्षांचे स्वरूप आणि संबंधित संकल्पनांच्या कायदेशीर व्याख्या अधिक स्पष्ट करण्यात आल्या आहेत. या सुधारणा कायद्यामुळे बेनामी व्यवहारांवर अधिकाधिक प्रतिबंध घालणे तसेच अयोग्य पद्धती वापरून कायदेशीर नियमांतून पळवाट काढण्याचे मार्ग रोखण्याचा हेतू साध्य होईल. या कायद्यात बेनामी व्यवहाराची व्याख्या व संकल्पना व्यापक केली आहे. जसे यामध्ये आता काल्पनिक नाव वापरून केलेल्या आर्थिक व्यवहारांचा ज्यात संपत्तीचा मालकास तो त्या संपत्तीचा मालक आहे याची त्याला माहिती नाही किंवा तो त्या संपत्तीचा मालक नसल्याचा दावा करतो आहे, किंवा मालमत्तेसंबंधी आर्थिक मूल्य देणारा मूळ मालक सापडत नाहीए, अशी प्रकरणेही समाविष्ट करण्यात आली आहेत. रिअल ईस्टेट किंवा स्थावर मालमत्ता खरेदीत गुंतवणूक करणे हा बेहिशोबी पैशाचा विनियोग करण्याचा एक सोपा मार्ग मानला जातो कारण मोठ्या प्रमाणावर स्थावर मालमत्तेशी संबंधित खरेदी-विक्रीच्या व्यवहारांची नोंद ठेवली जात नाही. या सुधारणा कायद्यांतर्गत बेनामी व्यवहारांबाबत शिक्षेचे स्वरूपही कडक करतांना वरील गुन्ह्यांसाठी एक ते सात वर्षांपर्यंत सश्रम कारावास व बेनामी मालमत्तेच्या आताच्या बाजारभावाच्या २५ टक्के एवढा आर्थिक दंड अशी सुधारणा करण्यात आली आहे. तसेच चुकीची माहिती दिल्याबद्दल सहा महिने ते पाच वर्षांपर्यंत सश्रम कारावास व बेनामी मालमत्तेच्या आताच्या बाजारभावाच्या १० टक्के एवढा आर्थिक दंड अशी शिक्षा सांगितली आहे.

**भविष्यातील उपाययोजना:**

आज जगातील सर्व बलाढ्य देश काळ्या पैशाच्या समूळ उच्चाटनासाठी एकत्र येत आहेत. देशांदेशांतील सर्व शासकीय व खाजगी आर्थिक व्यवहारांची तसेच व्यवसाय व नफा-तोट्याच्या वाटणी संबंधी करारातील सर्व बाबींची सविस्तर माहिती संबंधित राष्ट्रांच्या सरकारी कार्यालयात जमा करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे आगामी काळात कर चुकवेगिरीला प्रतिबंध होऊन आर्थिक घोटाळ्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. तसेच संबंधित राष्ट्रांद्वारे एकमेकांना वरील माहितीचे आदानप्रदान करण्याची तरतूद असल्यामुळे आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याचे काम व कर चुकवणाऱ्यांचा माग काढणे आयकर अधिकाऱ्यांना अधिक सोपे होईल.

भारत सरकारने संपूर्ण आर्थिक यंत्रणेतील काळा पैसा उघड करण्यासाठी महत्वाच्या उपाययोजना कार्यान्वित केल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने व कठोर कायदे व नियमांच्या अंमलबजाबणीतून सर्व आर्थिक व्यवहारांतील अंतर्गत बाबी सरकारकडे उपलब्ध असण्याची माहिती यंत्रणा येणाऱ्या काळात विस्तारत जाणार आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने काळ्या पैशाच्या समस्येबाबतच्या उपाययोजना योग्य दिशेने विकसित होत आहेत. त्याबरोबरच थेट रोख व्यवहारांवर मर्यादा आणणे व आर्थिक व्यवहारांची तिसऱ्या घटकाकडे नोंद राहिल, अशाप्रकारे जसे क्रेडिड कार्ड इ. मार्फत व्यवहार अनिवार्य करण्यासाठी नियम करणे इ. उपाय अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाचे अभिसरण रोखण्यास प्रभावी ठरतील.

■■■

*लेखिका बिझीनेस स्टॅंडर्ड या दैनिकाच्या वरिष्ठ पत्रकार असून आर्थिक विषयांच्या जाणकार आहेत.*

*email:dilashaseth@gmail.com*

# पगारदार आणि आयकर

डॉ. रवींद्र न. सोनटक्के



**आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता आयकर दर व आयकरातून सुट प्राप्त गुंतवणूकीची अद्यावत माहिती व्हावी तसेच आयकर व गुंतवणूकीच्या दृष्टीने योग्य नियोजन करता यावे, याकरीता फेब्रुवारी २०१६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये आयकरातील झालेले बदल याची माहिती प्रस्तूत लेखात देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.**

आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता व्यक्ती (Individual) पुरुष व महिला करदात्याकरीता आयकर करमुक्त मर्यादा २,५०,००० रु. आहे. तर जेष्ठ नागरिकांकरीता (६० वर्षावरील) ३,००,०००/- रु. आहे.

| पुरुष व महिला करदात्यांकरीता | | जेष्ठ नागरिकांकरीता | |
|---|---|---|---|
| २,५०,००० पर्यन्त | करमुक्त | ३,००,००० पर्यन्त | करमुक्त |
| २,५०,००१ ते ५,००,००० रु.वर | १०% | ३,००,००१ ते ५,००,००० रु. वर | १०% |
| ५००००१ ते १०,००,००० रु. वर | २०% | ५००००१ ते १०,००,००० रु.वर | २० % |
| १०,००,००० रु. वरील रकमेवर | ३०% | १०,००,००० रु. वरील रकमेवर | ३०% |

*(२०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता व्यक्तीगत करदात्याकरीता आयकराचे दर)*

करपात्र उत्पन्नावरील आयकरावर ३% प्रमाणे एज्युकेशन सेस लागेल. (हा सेस सर्वांना अनिवार्य आहे.)

कलम ८७A नुसार ज्या व्यक्तीगत करदात्याचे एकुण उत्पन्न ५ लाखापेक्षा कमी आहे त्यांना आयकरातून ५०००/- रु. सुट मिळेल (आर्थिक वर्ष २०१६-२०१७ पासुन) पगारातुन मिळणाऱ्या वजावटी (Deductions)

**१. घरभाडे भत्ता कपात (H.R.A.)**

करदाता भाडयाच्या घरात राहात असेल व घरभाडे पावती जोडत असेल तर खालीलप्रमाणे घरभाडे भत्त्याची कपात मिळेल.

i) प्रत्यक्ष मिळालेला घरभाडे भत्ता

ii) दिलेले भाडे - वेतनाच्या १० %

iii) वेतनाच्या ४० % (मुंबई, चेन्नई, दिल्ली, कोलकाता यांकरीता ५०%)

वरील तीन पैकी कमी रक्कम करमुक्त ठरेल.

२. वाहतूक भत्ता कपात - कर्मचाऱ्यांना द.म.मिळणारा वाहतुक भत्ता

(T.A.) १६०० रु. द.म.याप्रमाणे करमुक्त आहे.

३. **व्यवसाय कर** (Prof. Tax)

कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात होणारा व्यवसाय कर कपातीस पात्र आहे.

एकूण सकल उत्पन्नातून वजावटी - कलम ८० नुसार (चॅप्टर VI-A )

४. **विशिष्ट गुंतवणूकीवर प्राप्त वजावट - कलम ८० सी**

१. भविष्य निधित अंशदान

२. जीवन विमा प्रव्याजी (स्वत:च्या, पत्नी व मुलांच्या पॉलीसीवरील)

३. गट विमा प्रव्याजी

४. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (NSC)

५. सार्वजनिक भविष्य निधी (PPF) मध्ये गुंतवणूक

६. एन.एस.सी. वरील देय व्याज (Accured Interest)

७. युनिट लिंक इन्शुरेशन्स प्लॅन (ULIP) मधील अंशदान

८. एल.आय.सी. च्या ॲन्युईटी प्लॅन मध्ये भरलेली रक्कम

९. मान्यताप्राप्त म्युच्युअल फंड किंवा युनिट ट्रस्ट म्युच्युअल फंड भरलेली रक्कम.

१०. एल.आय.सी.च्या बिमा निवेश या पॉलीसीमध्ये एक रक्कमी भरलेला हप्ता

११. दोन मुलांची शिक्षण फी (टयुशन फी)

१२. घरबांधणी कर्ज हप्ता

१३. अधिसुचित बँकेत ५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी करीता मुदत ठेव (एफ.डी.) खात्यात गुंतवलेली रक्कम.

१४. वित्तीय कंपनीच्या विमा हप्त्यांमध्ये भरलेली रक्कम गुंतवणूक योजनेसह.

१५. सुकन्या समृद्धी योजनेत गुंतवणुक.

५. **जीवन सुरक्षा** (Pension Plan) **पॉलीसीवरील हप्ता - कलम ८० सी. सी. सी.**

एल.आय.सी. च्या जीवन सुरक्षा पॉलीसी (पेंशन प्लॅन) चा भरलेले हप्त्याची १,००,०००/- रु. पर्यंत कपात मिळेल.

***करदात्यावर अवलंबून असलेल्या अपंग नातेवाईकांच्या उपचारांकरीता केलेला खर्च किंवा भविष्यातील आवश्यकतेकरीता एल.आय.सी. व यु.टी.आय. मधील योजनेत गुंतवणूक केल्यास ७५,०००/- रु.पर्यंत वजावट मिळेल. जर अपंगत्व गंभीर स्वरुपाचे असेल तर १,२५,०००/- रु.एवढी वजावट मिळेल.***

६. **मान्यता प्राप्त पेन्शन फंडातील अंशदान - कलम ८० सीसीडी**

एल.आय.सी. व इतर सरकारमान्य खाजगी क्षेत्रातील आयुर्विमा कंपनीच्या मान्यताप्राप्त पेंशन फंडातील अंशदान १,००,०००/- रु. पर्यंत कपात प्राप्त राहील.

(टिप - कलम ८० सी, ८० सीसीसी, व ८० सीसीडी या सर्व मिळून वजावट मर्यादा १,५०,००० रु. पर्यंत राहील.)

ङ आर्थिक वर्ष २०१३-२०१४ पासून राजीव गांधी इक्वीटी गुंतवणूक योजनेमध्ये ज्यांचे उत्पन्न १० लाखापेक्षा कमी आहे त्यांनी ५०,०००/- रुपयापर्यन्त गुंतवणूक केल्यास गुंतवणूकीच्या ५० टक्के आयकरातून सुट मिळविता येईल. (कलम ८० सी. सी.जी.)

७. **वैद्यकीय विमा हप्ता** (Medical Insurance Premium) **कलम ८० डी.**

करदाता स्वत: (जीवनसाथी पती/पत्नी), मुले व त्याच्यावर अवलंबून असलेल्या आई-वडीलांच्या वैद्यकीय विमा हप्त्याची २५,०००/- रु.पर्यंत वजावट मिळेल. जर हा हप्ता ज्यांच्या पॉलीसीवर भरला असेल ती व्यक्ती जेष्ठ नागरीक असेल तर ती वजावट ३०,०००/- रु. पर्यंत मिळेल.

८. **अवलंबून असलेल्या अपंग नातेवाईकांचा वैद्यकीय खर्च व गुंतवणूकीची सवलत - कलम ८० डी. डी** -करदात्यावर अवलंबून असलेल्या अपंग नातेवाईकांच्या उपचारांकरीता केलेला खर्च किंवा भविष्यातील आवश्यकतेकरीता एल.आय.सी. व यु.टी.आय. मधील योजनेत गुंतवणूक केल्यास ७५,०००/- रु.पर्यंत वजावट मिळेल. जर

अपंगत्व गंभीर स्वरुपाचे असेल तर १,२५,०००/- रु.एवढी वजावट मिळेल.

**९. शैक्षणिक कर्जावरील व्याज परतफेड - कलम ८० - ई -**

स्वत:च्या उच्च शिक्षणाकरीता आर्थिक संस्थेकडून कर्ज घेतल्यास त्याच्या व्याज परतफेडीवर पूर्णपणे वजावट मिळेल. तसेच आर्थिक वर्ष २००७-०८ पासून नातेवाईकांच्या (पती/पत्नी, मुले) उच्च शिक्षणाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याजाची सुद्धा वजावट मिळेल.

**१०. देणगी - कलम ८० जी -**

ज्या संस्थाना कलम ८० जी. खाली मान्यता आहे. अशा संस्थांना व राष्ट्रीय योजनांना दिलेल्या देणगीवर ५०% किंवा १००% अशी नियमाप्रमाणे वजावट मिळेल.

**११. शारीरिक विकलांग व्यक्तीसंबंधी कपात - कलम ८० यु -**

करदाता शारीरिकदृष्टया विकलांग किंवा अंधत्व किंवा दुर्बल मनस्क असेल तर त्याला एकूण उत्पन्नातून रु. ७५,०००/- ची कपात मिळेल., विकलांग तीव्र स्वरुपाचे असेल तर १,५०,०००/- रु. कपात मिळेल.

**१२. बचत खात्यावरील व्याजाला वजावट - (कलम ८० टीटीए)**

नविन कलम टीटीए नुसार व्यक्ती करदात्याला बचत खात्यावरील जमा रकमेवर मिळणारे व्याज जास्तीत जास्त १०,०००/- रु. एवढे करमुक्त आहे.

**१३. स्वनिवासी घरबांधणी कर्जावरील व्याज -**

स्वनिवासी घराकरीता करदात्याने घरबांधणी, घरखरेदी व घर दुरुस्तीकरीता गृहनिर्माण संस्था, वित्तीय संस्था, राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेतले व संबंधीत आर्थिक वर्षात परतफेड केलेल्या व्याजाची कपात ३०,०००/- रु. पर्यंत मिळेल.

स्वत: राहण्याकरीता १-४-९९ किंवा त्यानंतर घर बांधले किंवा विकत घेतले असेल आणि त्यासाठी १-४-९९ किंवा त्यानंतर कर्ज घेतले असेल तर, कर्जावरील व्याजाच्या परतफेडीला ३०,०००/- रु. ऐवजी १,५०,०००/- रु. पर्यंत व्याजाची कपात मिळेल. (आर्थिक वर्ष २०१४-१५ पासून ही मर्यादा २,००,०००/- रु. पर्यंत करण्यात आली आहे.)

याशिवाय आयकर कायद्याप्रमाणे आणखी कर कपाती व सवलती मिळतात. याकरीता आयकर अधिनियम लक्षात घ्यावा. तसेच कर विषयक तज्ञांचा सल्ला घ्यावा.

अशाप्रकारे आपल्या अनुमाणित उत्पन्नावरील आयकराचे आधीच आगमन करुन आयकर वाचविण्याकरीता योग्य गुंतवणूकीचे नियोजन वर्षाच्या सुरुवातीपासूनच करावे व योग्य योजनांमध्ये वेळोवेळी गुंतवणूक केल्यास वर्षाच्या शेवटी आयकराचे शोधन व मार्चपुर्वी गुंतवणूकीचा आर्थिक भार एकत्र येणार नाही.

■■■

*लेखक नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा(घा.) जि. वर्धा येथे सहयोगी प्राध्यापक आहेत.*

email: ravi_stax@rediffmail.com

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,

हे नम्र आवाहन.

# वस्तु आणि सेवा कर : एक देश, एक कर

शिशिर सिन्हा




**२०१७-१८ या नव्या आर्थिक वर्षात भारत एका नव्या करप्रणालीला म्हणजेच जीएसटी अर्थात वस्तु आणि सेवा कराला सामोरा जात आहे. त्यामुळे आता अप्रत्यक्ष करप्रणालीद्वारे भारत जीएसटी अस्तित्वात असलेल्या कॅनडा, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर आणि मलेशिया या देशांच्या पंक्तीत जाऊन बसणार आहे. १ एप्रिलपासून जीएसटी लागू करण्यासाठीच्या प्रक्रियेला सरकारने गती दिली आहे. वस्तु आणि सेवाकराबाबतच्या सल्लागार मंडळाची नुसती स्थापनाच झाली नाही, तर या मंडळाच्या सुरुवातीच्या काही बैठकांमधे अत्यंत महत्त्वाचे निर्णयसुद्धा घेतले गेले.**

'आपल्या देशाचे आर्थिक व्यवस्थापन लक्षात घेता, वस्तु आणि सेवा कराची अंमलबजावणी संघराज्यात्मक स्वरुपाचे उत्तम परिणाम साधेल, याची मला खात्री आहे. ह्यामुळे राज्य सरकारे सक्षम होतील. या करामुळे केंद्र तसेच राज्य सरकारांचा महसूल वाढेल. कर चुकवणाऱ्यांना वा टाळाटाळ करणाऱ्यांना असे करण्यापासून परावृत्त करणे आणि त्यातले धोके समजावून देऊन. कर टाळणाऱ्यांचे प्रमाण कमी करणे असे प्रयत्न या करप्रणालीतून करता येतील. कोणत्याही करावर आणि कर लावलेला नाही याबद्दल नागरिकांना खात्री देता येईल वस्तुंवर एका पाठोपाठ एक अशा लावलेल्या करांच्या पद्धतीतून सुटका होईल. परिणामी काही उत्पादनांच्या किंमती कमी सुद्धा झालेल्या दिसतील. सध्याच्या गंभीर आर्थिक परिस्थितीत अर्थव्यवस्थेला अत्यंत आवश्यक असलेले प्रोत्साहन देखिल यामुळे मिळेल.'

वस्तु आणि सेवा कराबाबत घटना सुधारणा विधेयक राज्यसभेत मंजुरीसाठी मांडले असता, त्यावर चर्चा करताना ३ ऑगस्ट २०१६ रोजी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी केलेल्या भाषणातून घेतलेला हा उतारा. या भाषणाबरोबरच स्वतंत्र भारताच्या इतिहासातल्या सर्वात महत्त्वाकांक्षी करप्रणाली सुधारणेची दीर्घ प्रतीक्षा संपवण्यात यश आलं. घटनेतले १२२वे सुधारणा विधेयक आता १०१वी सुधारणा कायद्यात परिवर्तित झाल्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांना एकाच वेळी हा कर लागू करणे शक्य होणार आहे. त्याबरोबरच आता २०१७-१८ या नव्या आर्थिक वर्षात भारत एका नव्या करप्रणालीला म्हणजेच जीएसटी अर्थात वस्तु आणि सेवा कराला सामोरा जात आहे. त्यामुळे आता आपण अप्रत्यक्ष करप्रणालीद्वारे जीएसटी अस्तित्वात असलेल्या कॅनडा, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर आणि मलेशिया या देशांच्या पंक्तीत जाऊन बसणार आहोत.

पुढच्या वर्षी १ एप्रिलपासून जीएसटी लागू करण्यासाठीच्या प्रक्रियेला आता सरकारने गती दिली आहे. सर्वात प्रथम वस्तु आणि सेवाकराबाबतच्या सल्लागार मंडळाची नुसती स्थापनाच झाली नाही, तर या मंडळाच्या सुरुवातीच्या काही बैठकांमधे अत्यंत महत्त्वाचे निर्णयसुद्धा घेतले गेले. दुसरे म्हणजे जीएसटीसाठी आवश्यक असलेला माहिती तंत्रज्ञानाच्या सर्व प्रकारच्या पाठिंब्यासाठीचे जाळे उभारले गेले आहे. तिसरे म्हणजे

सध्याचा जीएसटी कायदा नागरिकांच्या सूचना हरकतींसाठी खुला आहे. नंतर त्यांचे रुपांतर सहाय्यक कायद्यांमधे करण्यात येईल आणि चौथा आणि सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा असा की, सरकारने या करप्रणालीतले दर निश्चित करणे, करातून सूट देण्याचे नियम, करासाठीची उत्पन्नाची मर्यादा आणि या सगळ्यांबाबतचे आवश्यक नियम ठरवणे यासाठी २२ नोव्हेंबर २०१६ ही अंतिम तिथी ठरवली आहे.

**जीएसटी म्हणजे काय ?**

वस्तु आणि सेवांवर लावण्यात आलेल्या करप्रणालीचे सुलभीकरण म्हणजे जीएसटी. पुरवठा साखळीतल्या प्रत्येक टप्प्यावर लावण्यात येणारा हा कर असून, पुरवठ्यासाठी उपयोगात आणलेल्या प्रत्येक गुंतवणुकीवर भरलेल्या करासाठी तो काही रक्कम जमा करतो. सध्या प्रचलित पद्धतीप्रमाणे वस्तुंच्या उत्पादनावर किंवा विक्रीवर तसेच सेवा देताना अथवा दिल्यावर कर लावण्याऐवजी हा जीएसटी वस्तु आणि सेवांच्या पुरवठ्यावर लागणार आहे. सध्याप्रमाणे उत्पादनाच्या ठिकाणी लागणारा हा कर नसून तो अंतिम स्थळी म्हणजे वस्तु अथवा सेवा इच्छित स्थळी पोचल्यावर अथवा दिल्यावर लागणारा कर आहे.

संघराज्यीय संरचना कायम ठेवण्यासाठी, देशवासियांना जुन्या जीएसटीचे धोरण स्विकारावे लागेल. केंद्रीय वस्तु आणि सेवा कर (सीजीएसटी) आणि राज्यांच्या वस्तु आणि सेवा कर (एसजीएसटी) याचा अर्थ केंद्र आणि राज्य या दोन्हींसाठी एकच सामायिक पायावर आधारलेली कर रचना असेल. याबरोबरच एक एकात्मिक वस्तु आणि सेवा कर (आयजीएसटी) सुद्धा असेल. हा कर आंतरराज्यीय वस्तु आणि सेवा पुरवठ्यावर लागेल. हा कर केंद्राकडून गोळा केला जाईल, जेणेकरुन कर वसुलींची साखळी विस्कळीत होणार नाही. वस्तु आणि सेवा यांची आयात आंतरराज्यीय पुरवठा म्हणून मानली जाईल आणि त्यावर आयजीएसटी लागू होईल. खेरीज त्यांना नेहमीची जकात भरावी लागेल. सीजीएसटी, एसजीएसटी आणि आयजीएसटी या तिन्ही करांचे दर जीएसटी मंडळ निश्चित करेल.

***सध्या प्रचलित पद्धतीप्रमाणे वस्तुंच्या उत्पादनावर किंवा विक्रीवर तसेच सेवा देताना अथवा दिल्यावर कर लावण्याऐवजी हा जीएसटी वस्तु आणि सेवांच्या पुरवठ्यावर लागणार आहे. सध्याप्रमाणे उत्पादनाच्या ठिकाणी लागणारा हा कर नसून तो अंतिम स्थळी म्हणजे वस्तु अथवा सेवा इच्छित स्थळी पोचल्यावर अथवा दिल्यावर लागणारा कर आहे.***

**जीएसटी का लागू करायचा ?**

वस्तु आणि सेवांवर विविध पातळ्यांवर आकारल्या जाणाऱ्या करांबाबत कायदे करायचा वेगवेगळा अधिकार घटनेने केंद्र आणि राज्यांना दिल्यामुळे भारतात करांबाबत वैविध्य आहे. उदाहरणार्थ: पिण्याकरता वापरली जाणारी दारु, अफू तसेच इतर अंमली पदार्थ वगळता इतर सर्व वस्तुंच्या उत्पादनावर लागणाऱ्या कराबाबतचे कायदे आणि नियम तयार करायचा अधिकार केंद्र सरकारला आहे. तर वस्तुंच्या व्यापारावर लागणारे कर निर्धारीत करणे आणि त्याबाबतचे कायदेशीर अधिकार राज्य सरकारांना दिले आहेत. केंद्र सरकारला सध्या दोन वेगळे अधिकार दिलेत, पहिला, राज्यांदरम्यान होणाऱ्या वस्तुंच्या विक्रीवर करवसुली करणे (हा कर राज्य सरकारे गोळा करुन त्यांच्या महसुलात जमा करतात) आणि दुसरा, सेवांवर कर लावण्याचा फक्त केंद्राला अधिकार दिला आहे. उदा. सेवाकर.

अशा कर रचनेमुळे संपूर्ण अप्रत्यक्ष करप्रणाली किचकट होऊन जाते. एवढेच नाही तर त्यात अनेक प्रकारचे तोटे देखिल आहेत. उदाहरणार्थ, व्यवसाय करणाऱ्याला विविध करांसाठी अनेक प्रकारच्या नोंदी जतन कराव्या लागतात. त्यामुळे व्यवसाय चालवण्याचा खर्च वाढत जातो आणि हे व्यवसाय करण्याच्या सुलभीकरणाच्या तत्त्वाच्या एकदम विरुद्ध आहे. त्याचप्रमाणे करांमधल्या विविधतेमुळे एका करावर दुसरा कर लागत जातो. परिणामी ग्राहकाला वस्तु खूप जास्त खर्चिक वा महाग पडते. जीएसटी प्रणालीमधे मात्र एकच कर असल्याने त्याची अंमलबजावणी सोपी होईल. व्यावसायिकाला देखिल नोंदी ठेवायचा खर्च आणि त्रास कमी झाल्यामुळे ह्या पद्धतीने व्यवसाय करणे अधिक सुलभ होईल. त्याचबरोबर जीएसटी हा वस्तुच्या उत्पादनापासून अंतिम उपभोक्त्यापर्यंत पोहोचायच्या प्रत्येक टप्प्यावर लागणार असल्याने आणि त्यात आधीच्या टप्प्यावर भरलेल्या करावर प्रशंसात्मक प्रोत्साहन मिळणार असल्याने ह्या पद्धतीत करांवर कर भरावा लागण्यातली विसंगती दूर होईल. असे मानले जातेय की, नव्या करप्रणालीमुळे सध्या उत्पादकांवर किंवा

सेवा पुरवणाऱ्यांवर असलेले कराचे ओझे (जे सध्याच्या पद्धतीनुसार २५ ते ३० टक्के आहे) कमी होईल. परिणामी ग्राहकांसाठी या वस्तु आणि सेवा स्वस्त होतील.

**जीएसटीएन (वस्तु आणि सेवा करासाठी आवश्यक सेवांचे जाळे)**

जीएसटीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक माहिती तंत्रज्ञानविषयक पायाभूत सेवा आणि सुविधा पुरवण्यासाठी सरकारने वस्तु आणि सेवा करासाठी आवश्यक जाळे उभारले आहे. ही विभाग २५ अंतर्गत उभारलेली कंपनी म्हणजे नफा न कमवता काम करणारी कंपनी आहे. ही बिगर सरकारी, खाजगी मालकीची कंपनी आहे. यात केंद्र सरकारचा वाटा २४.५ टक्के आहे, दिल्ली आणि पुदुचेरी सहित सर्व केंद्रशासित प्रदेश, सर्व राज्ये आणि राज्यांच्या अर्थमंत्र्यांची अधिकारी समिती या सर्वांकडे मिळून २४.५ टक्के वाटा असेल. उरलेला वाटा बिगर सरकारी आर्थिक संस्थांकडे आहे. ह्या कंपनीला काही कामे पूर्ण करणे बंधनकारक आहे :

- केंद्र सरकार, राज्य सरकारे, करदाते आणि इतर गुंतवणुकदारांना सामायिक, सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान विषयक पायाभूत सुविधा आणि सेवा पुरविणे.
- अत्यंत कार्यक्षम आणि वापरण्यास सुलभ असे, जीएसटी विषयक वातावरण निर्माण करण्यासाठी इतर संबंधित सेवा पुरविणाऱ्या संस्थांशी भागिदारी करणे.
- गुंतवणूकदार वा भागधारकांना सुलभ सेवा पुरविण्यासाठी जीएसटी अर्ज तयार करण्यासाठी जीएसटी सुविधा देणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देऊन एकत्र काम करणे.
- संशोधन कार्य सुरु ठेवणे, उत्तम कार्यपद्धतीसाठी अभ्यास करणे आणि करविषयक अधिकारी व्यक्ती आणि इतर भागधारकांना प्रशिक्षण आणि सल्ला उपलब्ध करुन देणे.
- केंद्र आणि राज्य सरकारांच्या कर विभागाला जेव्हा गरज लागेल तेव्हा अत्यंत कार्यक्षम सेवा पुरविणे.
- केंद्र आणि राज्य सरकारांच्या करविषयक प्रशासनाच्या उपयोगासाठी करदात्यांच्या माहितीची उपयुक्तता जाणणारी प्रणाली विकसित करणे.
- कर भरण्याची प्रणाली आणि करविषयक प्रशासनिक प्रणाली सुधारण्यासाठी कर विभागाच्या अधिकाऱ्यांना मदत करणे.

***एकशे एकावी घटना सुधारणा झाल्यानंतर झालेली पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे जीएसटी संबंधी सल्लागार मंडळाची स्थापना. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या जीएसटी संबंधीच्या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवणारी सर्वोच्च संस्था म्हणजे हे सल्लागार मंडळ. जीएसटीबाबतच्या सर्व लहान-सहान अटी, नियम आणि बाबींचे निर्णय घेणे हे या मंडळाचे काम आहेच. पण त्याबरोबरच जीएसटी संबंधीचे सर्व वादविवाद सोडविणे हे देखिल सल्लागार मंडळाला करावे लागणार आहे.***

- केंद्र आणि राज्य सरकारे आणि संबंधित भागधारकांच्या विनंतीवरुन जीएसटीशी संबंधित कोणतीही सेवा सुविधा उपलब्ध करुन देणे.

**''जीएसटी सल्लागार मंडळ''**

एकशे एकावी घटना सुधारणा झाल्यानंतर झालेली पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे जीएसटी संबंधी सल्लागार मंडळाची स्थापना. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या जीएसटी संबंधीच्या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवणारी सर्वोच्च संस्था म्हणजे हे सल्लागार मंडळ. जीएसटीबाबतच्या सर्व लहान-सहान अटी, नियम आणि बाबींचे निर्णय घेणे हे या मंडळाचे काम आहेच. पण त्याबरोबरच जीएसटी संबंधीचे सर्व वादविवाद सोडविणे हे देखिल सल्लागार मंडळाला करावे लागणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री या सल्लागार मंडळाच्या अध्यक्षस्थानी असतील आणि केंद्रीय अर्थ राज्यमंत्री, महसूल मंत्री, अर्थविषयक किंवा करविषयक पदभार असणारे मंत्री तसेच राज्य सरकारांनी सुचविलेले कुठलेही इतर मंत्री हे या मंडळाचे सदस्य असतील. परिणामी या मंडळात अध्यक्षांसहित दोन केंद्रीय मंत्री आणि २९ राज्ये तसेच २ केंद्रशासित प्रदेशामधून प्रत्येकी एक सदस्य असे एकूण ३३ सदस्य असतील. केंद्रीय महसूल सचिव हे या मंडळाचे पदसिद्ध सचिव असतील, तर केंद्रीय अबकारी आणि सीमा शुल्क मंडळाचे अध्यक्ष (मतदानाचा अधिकार नसलेले) कायमचे आमंत्रित सदस्य असतील आणि हे दोघेही मंडळाच्या सर्व कामकाजात भाग घेतील.

जीएसटीशी संबंधित सर्व महत्त्वाच्या बाबींवर हे सल्लागार मंडळ केंद्र आणि राज्य सरकारांना शिफारसी करेल. या बाबींमधे जीएसटीमध्ये समाविष्ट होणाऱ्या किंवा या कराच्या कार्यक्षेत्राबाहेर असणाऱ्या वस्तु आणि सेवा निश्चित करणे, जीएसटीबाबतचे नियम ठरविणे, पुरवठ्याची जागा, किमान आणि कमाल मर्यादा, जीएसटीचे दर याबाबतची

मार्गदर्शक तत्त्वे ठरविणे, नैसर्गिक आपत्ती अपघाताच्या दरम्यान अतिरिक्त संसाधने वाढवण्यासाठीचे विशेष दर, काही राज्यांसाठी विशेष तरतुदी इत्यादी गोष्टींबाबतही सल्लागार मंडळ शिफारसी करेल.

मंडळाचा कोणताही निर्णय सदस्यांच्या बैठकीत मतदानाने घेतला जाईल, त्यामधे उपस्थित सदस्यांच्या तीन चतुर्थांश किंवा त्यापेक्षा जास्त मताधिक्य आवश्यक असेल. आता यात मतदानाची पद्धत अशा प्रकारे ठरविली आहे की, केंद्र किंवा सर्व राज्य सरकारे यापैकी कोणीही एकत्रितपणे नकाराधिकार वापरु शकणार नाही. केंद्र सरकारच्या मताचे वजन एकूण वापरलेल्या मतांच्या एक तृतीयांश असेल, तर सर्व राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांच्या एकत्रित मतांचे वजन एकूण मतांच्या दोन तृतीयांश इतके असेल. कुठलाही निर्णय घेण्यासाठी मतदान झालेल्या एकूण मतांपैकी तीन चतुर्थांश मतांची आवश्यकता असेल.

**जीएसटी सल्लागार मंडळाने घेतलेले काही महत्त्वाचे निर्णय**

पहिल्या दोन बैठकांमधे मंडळाने काही महत्त्वाचे निर्णय घेतले.

'कर मर्यादेची हद्द' :-

जीएसटीचा विचार करता, या करातून सूट मिळण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा २० लाख रुपये ठरविण्यात आली आहे. मात्र ईशान्येकडील आसाम, मेघालय, मणिपूर, नागालँड, मिझोराम, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम या सात राज्यांमधे तसेच जम्मू-कश्मीर, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेश या तीन पर्वतीय राज्यांमधे ही मर्यादा १० लाख रुपये इतकी ठेवण्यात आली आहे. याचाच अर्थ, वार्षिक २० लाख रुपयांची उलाढाल असलेल्या व्यापाऱ्याला, जर तो सामान्य राज्यांमधला असेल, तर करातून सूट मिळेल. त्याचवेळी ईशान्येकडच्या आणि पर्वतीय राज्यांमधल्या व्यापाऱ्याची वार्षिक उलाढाल १० लाख रुपयांपेक्षा कमी असेल, तर त्यांना जीएसटी द्यावा लागणार नाही. जीएसटी भरावा लागण्यासाठीच्या या मर्यादांचे तज्ञ व्यक्ती समर्थनच करत आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार या मर्यादेमुळे अनेक लघुउद्योजक आणि सेवा पुरवठादार जीएसटी भरण्याच्या अनावश्यक सक्तीपासून वाचतील. तसेच यामुळे कमी कालावधीसाठी छोट्या प्रमाणावर व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या व्यवहारांची तपासणी, मोजणी करुन प्रत्येकाचा कर ठरवण्याचे किचकट काम कर विभागाच्या अधिकाऱ्यांना करावे लागणार नाही. त्यामुळे त्यांच्या कामाचा भार कमी होईल.

***केंद्र आणि राज्य सरकारांना दिलेल्या प्रशासन विषयक अधिकारांमधे सहयोग आणण्यासाठी मध्यम मार्ग स्वीकारायचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. दीड कोटी रुपयांपर्यंतची वार्षिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकडून करवसुली करायचे सर्व अधिकार राज्य सरकारांना देण्यावर सहमती झाली आहे. दीड कोटी रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांवर केंद्र आणि राज्य सरकार दोन्हींच्या अधिकाऱ्यांना करवसुलीचा अधिकार आहे.***

**'एकमेकात गुंतलेल्या अधिकार मर्यादा :-**

केंद्र आणि राज्य सरकारांना दिलेल्या प्रशासन विषयक अधिकारांमधे सहयोग आणण्यासाठी मध्यम मार्ग स्वीकारायचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. दीड कोटी रुपयांपर्यंतची वार्षिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकडून करवसुली करायचे सर्व अधिकार राज्य सरकारांना देण्यावर सहमती झाली आहे. दीड कोटी रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांवर केंद्र आणि राज्य सरकार दोन्हींच्या अधिकाऱ्यांना करवसुलीचा अधिकार आहे. अर्थात यासाठी इतर अटींच्या अधीन रहावे लागणार आहे. तसेच सेवा कर भरण्यासाठी नोंदणीकृत असलेल्या ११ लाख व्यापाऱ्यांवर त्यांच्या उत्पन्नाच्या पातळीचा विचार न करता जीएसटी लावण्याचा पूर्ण अधिकार केंद्र सरकारला दिला गेला आहे.

**रचनात्मक योजना :-**

सर्व सहमतीने जीएसटीसाठी रचनात्मक किंवा चक्रवाढ स्वरुपातली योजना आकाराला आली आहे. ज्या व्यापाऱ्यांची ढोबळ स्वरुपातली एकूण उलाढाल ५० लाख रुपयांपर्यंत आहे, ते १ ते २ टक्के कर भरतील असे ठरविण्यात आले आहे. ही योजना छोट्या व्यापाऱ्यांचा विचार करुन त्यांच्या सोयीसाठी तयार करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत करदात्याला त्याच्या वार्षिक उलाढालीच्या काही टक्के भाग कर म्हणून भरावा लागेल. अर्थात त्याच्या कच्च्या मालावर त्याने भरलेल्या कराची पूर्वजमा मिळण्याचा फायदा तो घेऊ शकणार नाही. केंद्रीय जीएसटी आणि राज्यातल्या जीएसटीच्या कराचा दर १ टक्क्यापेक्षा कमी असणार नाही.

मिश्र स्वरुपाची कररचना स्वीकारणाऱ्या करदात्याला त्याच्या ग्राहकांकडून करवसुली करता येणार नाही. आंतरराज्यीय व्यापार करणारे करदाते किंवा परतफेड शुल्कांवर आधारीत कर रचनेद्वारे कर भरणाऱ्या व्यावसायिकांना मिश्र स्वरुपाच्या कररचनेत प्रवेश करता येणार नाही.

**विभागांवर आधारीत करातली सूट :-**

सध्या तीन पर्वतीय राज्ये आणि ईशान्येकडच्या सात राज्यांना विभागवार करातून सूट दिली गेली आहे. उद्योग उभारणाऱ्या कंपन्यांना करात अशा प्रकारची सूट देणे कठीण आहे. सध्या विभागवार अबकारी करात सूट देण्याची पद्धत सुरु आहे. मात्र पुढच्या वर्षी जीएसटीमुळे ही पद्धत बंद होणार आहे. तरीही ही सूट, सूट म्हणून नाही तर परतावा म्हणून करदात्याला देण्यात येईल. करातून सूट देण्यात आलेल्या सर्व गोष्टींवर जीएसटी अंतर्गत कर बसवण्यात येईल. केंद्र किंवा राज्य सरकार, ज्यांच्याकडे हा कर जमा झाला असेल, ते नंतर त्या त्या व्यावसायिकाला तो परतावा म्हणून देतील. विशिष्ट औद्योगिक क्षेत्राला देण्यात येणारी करातील सूट, यापुढे सुरु ठेवण्याबाबतचा निर्णय राज्य सरकारांना देण्यात आला आहे.

करांमधे दिली जाणारी सूट बंद करायची, परतावा द्यायचा की नाही द्यायचा याबाबतचे निश्चित तपशील अजून ठरायचे आहेत.

**जीएसटीचे दर :-**

केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या नेतृत्वाखालच्या सक्षम समितीने जीएसटीचे दर ठरविण्यासाठी दोन मार्गदर्शक तत्त्वे सुचविली आहेत. आणि ही तत्त्वे जीएसटी सल्लागार मंडळाला सुद्धा मार्गदर्शन करत आहेत. यातले पहिले तत्त्व सांगते की, जीएसटीच्या अंमलबजावणीपासून सध्या ठरविलेले करांचे दर लागू झाले, तरी हळुहळु ते कमी होतील आणि नागरिकांना स्वीकारार्ह होतील. दुसरे मार्गदर्शक तत्त्व असे सांगते की, जीएसटीच्या रचनेतले करनिर्धारण इतके असायला हवे की, त्यातून जमा होणारा महसूल आताच्या प्रमाणाएवढाच असायला हवा आणि केंद्र सरकार आणि राज्य सरकारांना त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडता येतील आणि त्यांच्याकडे जमा होणाऱ्या महसूलातून ही कामे व्यवस्थितपणे करता येतील. जीएसटी सल्लागार मंडळ ही मार्गदर्शक तत्त्वे पाळून मगच करविषयक दर निश्चित करेल, असे मानण्यात येत आहे. या जीएसटीमधे चार प्रकारचे दर असतील अशी अपेक्षा आहे.

***संपूर्ण देशभरातला बाजार एकीकरणाने सामायिक होऊन जाणार असेल, तर अशी करप्रणाली ग्राहकांसाठी नक्कीच सोपी सुलभ असेल. वस्तू आणि सेवा स्वस्त होतील, एकावर एक असे अनेक कर भरण्याच्या पद्धतीतून मुक्तता होईल, देशभरात वस्तुंचे एकसमान दर असतील, करप्रणालीमधे पारदर्शकता असेल आणि रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील, अशा अपेक्षा ग्राहक या प्रणालीकडून ठेऊ शकेल.***

१) उच्च श्रेणी दर - अत्यावश्यक वस्तु आणि सेवा

२) प्रमाणित दर - सर्वसाधारण वस्तु आणि सेवा

३) विशेष दर - सोन्याचांदीसारखे मौल्यवान धातू

४) शून्य दर - करातून सूट दिलेल्या सर्व वस्तू आणि सेवा

जीएसटी करप्रणाली फक्त व्यवसाय उद्योगांसाठीच नाही, तर सर्वसामान्य नागरीकांसाठी फायद्याची आहे, ही गोष्ट ठळकपणे लोकांसमोर मांडायला हवी. जर नवी करप्रणाली करांमधली किचकट गुंतागुंत कमी करणार असेल, दुहेरी किंवा साखळी पद्धतीने कर भरण्यापासून वाचवणार असेल, उद्योगांसाठी विशेषत: निर्यात उद्योगांसाठी अधिक प्रभावीपणे करांचे निष्क्रियीकरण करणार असेल आणि संपूर्ण देशभरातला बाजार एकीकरणाने सामायिक होऊन जाणार असेल, तर अशी करप्रणाली ग्राहकांसाठी नक्कीच सोपी सुलभ असेल. वस्तू आणि सेवा स्वस्त होतील, एकावर एक असे अनेक कर भरण्याच्या पद्धतीतून मुक्तता होईल, देशभरात वस्तुंचे एकसमान दर असतील, करप्रणालीमधे पारदर्शकता असेल आणि रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील, अशा अपेक्षा ग्राहक या प्रणालीकडून ठेऊ शकेल. जीएसटीच्या प्रवेशामुळे आपली उत्पादने अधिकाधिक स्पर्धात्मक दर्जाची होतील आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारांमधे ती ठळकपणे स्पर्धेला तोंड देतील. यामुळे स्थूल राष्ट्रीय उत्पादनात लगेचच २ टक्क्याची वाढ होईल, असे अभ्यासाअंती सिद्ध झाले आहे. या कररचनेमुळे केंद्र आणि राज्य सरकारांचा महसूल वाढेल. कारण करांचा पाया वाढलेला असेल, व्यापाराचे प्रमाण वाढेल, करवसुली देखिल वाढेल. हा कर अत्यंत पारदर्शक

असल्यामुळे व्यवस्थापनाला सोपा आहे. जीएसटीच्या लागू होण्यामुळे व्यवसाय करण्यासाठीच्या सुलभतेच्या दृष्टीने भारताची श्रेणी वाढायला मदत होईल, ज्यामुळे जास्तीत जास्त प्रमाणात परदेशी गुंतवणूकदार देशात जास्तीत जास्त परकीय चलन घेऊन येतील.

**वस्तु आणि सेवा कर - मुलभूत मुद्दे**

**केंद्राच्या अधिकारात अंतर्भूत होणारे कर आणि कर्तव्ये :-**

- केंद्रीय जकात कर
- औषधे आणि शौचालय बांधणीसाठीची जकात
- विशेष महत्त्वाच्या वस्तुंसाठीची अतिरिक्त जकात
- कपडे आणि कापडाच्या इतर वस्तुंवरची अतिरिक्त जकात
- अतिरिक्त सीमाशुल्क
- विशेष अतिरिक्त सीमाशुल्क
- सेवा कर
- वस्तु अथवा सेवा पुरविण्याशी संबंधित स्थानिक कर आणि अधिभार

**राज्य सरकारांच्या अधिकारात येणारे कर**

- राज्य मूल्यवर्धित कर
- केंद्रीय विक्री कर
- खरेदी कर
- चैनीच्या वस्तुंवरचा कर
- सर्व प्रकारचा प्रवेश कर
- स्थानिक संस्थांनी लावलेल्या कराखेरीजचा मनोरंजन कर
- जाहिरातींवरचे कर
- लॉटरी, जुगार, पैसे लावणे यांवरचे कर
- वस्तु अथवा सेवा पुरविण्याशी संबंधित राज्य सरकारचे कर आणि अधिभार

**जीएसटीमधे अंतर्भूत नसलेल्या गोष्टी :**

- पिण्यासाठी वापरली जाणारी दारु
- वीज
- स्थावर मालमत्ता

**जीएसटीमधे काही कालावधीनंतर अंतर्भूत होणाऱ्या गोष्टी :**

- कच्चे पेट्रोलियम तेल
- वाहनांसाठीचे इंधन
- विशेष दर्जाचे डिझेल
- नैसर्गिक वायू
- हवाई वाहतुकीसाठी लागणारे इंधन
- ह्या सगळ्या वस्तुंसाठी सध्या अस्तित्वात असलेला मूल्यवर्धित कर आणि विक्रीकर आहे त्या दरांसह सुरु राहील.

**जीएसटीमधे तंबाखूसाठीचे धोरण पुढीलप्रमाणे असेल :**

तंबाखू आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांवर जीएसटी लावला जाणार आहे. त्यासोबतच या सगळ्या उत्पादनांवर केंद्रीय अबकारी कर लावायचा अधिकार केंद्र सरकारला असेल.

**जीएसटी लागू झाल्यानंतर राज्यांच्या महसुलात येणारी तूट भरुन काढण्यासाठी दिली जाणार भरपाई :**

जीएसटी लागू झाल्यानंतरच्या पाच वर्षांमधे राज्य सरकारांच्या महसुलात येणाऱ्या तुटीची पूर्ण भरपाई राज्यांना दिली जाईल.

**'आयात' व्यापाराला असा कर भरावा लागेल :**

वस्तु आणि सेवांची देशात होणारी आयात, आंतरराज्यीय व्यापाराप्रमाणेच समजली जाईल आणि आयात केलेल्या उत्पादनांवर एकात्मिक वस्तु आणि सेवा कर लावला जाईल.

**निर्यात व्यापाराला असा कर भरावा लागेल :**

निर्यात होणाऱ्या वस्तु आणि सेवांवर शून्य दराने कर लागेल.

**करातून सूट दिल्या जाणाऱ्या वस्तु आणि सेवांची यादी :**

सूट दिल्या जाणाऱ्या वस्तु आणि सेवा कमीत कमी असतील आणि त्याचा तपशील जीएसटी सल्लागार मंडळ ठरवेल.

**जीएसटी लागू करण्यासाठीची पूर्वतयारी**

केंद्र सरकारला दोन स्वतंत्र कायदे करावे लागतील.

(१) केंद्रीय वस्तु आणि सेवा करासंबंधी आणि (२) राज्यातल्या वस्तु आणि सेवा करासंबंधी.

राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना राज्य वस्तु आणि सेवा कराबाबत कायदा करावा लागेल हे अत्यंत साधे कायदे असून, संसद आणि राज्य विधीमंडळात सध्या बहुमताने ते अस्तित्वात आणणे शक्य आहे.

■■■

*लेखक मागील २१ वर्षापासून राष्ट्रीय पातळीवर अर्थविषयक पत्रकारिता करत असून सध्या 'एबीपी न्यूज' या वाहिनीमध्ये 'बिझीनेस एडीटर' पदी कार्यरत आहेत.*

email:hblshishir@gmail.com

# वस्तू व सेवा कर आणि आंतरराष्ट्रीय अनुभव

प्रवाकर साहू व अश्वनी बिश्नोई




**भारतात गुंतवणूकदार व उद्योग यांच्यासाठी करप्रणाली ही एक अवघड आव्हान आहे, कारण केंद्राचे व राज्यांचे कर वेगळे आहेत. त्यात कर निकषांचे पालन करताना मोठा वेळ व पैसा खर्च होतो. आता कर सुलभीकरण होत असल्याने उद्योग व गुंतवणूकदारांच्या अडचणी दूर होणार आहेत. वस्तू व सेवा कर अंमलबजावणीत हा बराच खर्च कमी होणार आहे.**

भारतात वस्तू व सेवा कर विधेयक संमत झाल्यानंतर आता त्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. हा आर्थिक सुधारणांचाच एक भाग असून त्यात एकसमान कर असणार आहे. वस्तू व सेवा कर विधेयक ३ ऑगस्ट २०१६ रोजी संसदेत संमत झाले. स्वतंत्र भारतातील ही सर्वात मोठी कर सुधारणा असून १९९१ च्या आर्थिक सुधारणानंतरची सर्वात मोठी रचनात्मक आर्थिक सुधारणा आहे. दोन्ही सभागृहात ११ वर्षांच्या अडथळ्यानंतर हे विधेयक मंजूर झाले. त्यावर वाद चर्चाही झाल्या. जीएसटीमध्ये १५ केंद्रीय व राज्य कर एकत्र केले असून त्यात सर्व राज्यांमध्ये एकच कर असणार आहे व त्यामुळे बाजारपेठही एकात्म होण्यास मदत होणार आहे. एप्रिल २०१७ मध्ये मोदी सरकार आर्थिक सुधारणांचा हा मोठा टप्पा पार करील पण जीएसटी कर अजून निर्धारित व्हायचे असून काही कार्यात्मक बाबींचे निराकरण होणे आवश्यक आहे. केंद्रीय मूल्यवर्धित कर सेनव्हॅट व राज्याचा मूल्यवर्धित कर व्हॅट यांच्यावर काही प्रमाणात परिणाम होईल. हे दोन कर एकमेकांशी निगडित नसल्याने ग्राहकांना जास्त कर भरावा लागत होता व केंद्र व राज्यांचे इनपुट टॅक्स क्रेडिट वेगळे होते. व्हॅटचे दरही राज्यांमध्ये वेगळे होते. भारतात गुंतवणूकदार व उद्योग यांच्यासाठी करप्रणाली ही एक अवघड आव्हान आहे, कारण केंद्राचे व राज्यांचे कर वेगळे आहेत. त्यात कर निकषांचे पालन करताना मोठा वेळ व पैसा खर्च होतो. आता कर सुलभीकरण होत असल्याने उद्योग व गुंतवणूकदारांच्या अडचणी दूर होणार आहेत. वस्तू व सेवा कर अंमलबजावणीत हा बराच खर्च कमी होणार आहे. त्यामुळे इंटपुट टॅक्स क्रेडिट वाढणार आहे.सध्याची व्हॅट प्रणाली ही केंद्र व राज्यात त्रुटींनी भरलेली आहे. केंद्रीय पातळीवर केवळ कच्च्या मालावर कर भरला जातो व इनपुट क्रेडिट जिले जाते पण उत्पादनानंतर आलेल्या खर्चावर इनपुट क्रेडिट दिले जात नाही. सेवा कर काही मर्यादित उत्पादनांवर आहे व त्यामुळे सेवा करावर इनपुट क्रेडिट देणे अवघड असते. जीएसटीमध्ये वस्तू व सेवा या दोन्हीत हा परिणाम होणार नाही. सध्या व्हॅटवर काही मर्यादा आहेत. त्यात केंद्राने लावलेल्या

अबकारी करावर पुन्हा व्हॅट लावला जातो. आलिशानता कर, करमणूक कर असे इतर अप्रत्यक्ष कर लावले जातात. केंद्रीय विक्री करावर इनपुट कराची सुविधा नाही. त्यामुळे जीएसटी लावताना सीजीएसटी व एसजीएसटी यात क्रेडिटची सुविधा असलेले नियम सुसंगत असावे लागतील. साध्या करप्रणालीतून अनेक अनिष्ट परिणाम टाळता येतील, सामायिक बाजारपेठ निर्माण होऊन करपाया वाढेल तसेच अंमलबजावणी खर्च कमी होईल. प्रस्तावित जीएसटी हा राज्य व केंद्र यांच्या जीएसटीसह सध्याच्या प्रणालीची जागा घेईल. सीएसटीची जागा एकात्म वस्तू व सेवा कर घेईल तो आंतर राज्य सेवा व वस्तू पुरवठ्यावर लागेल तो केंद्र सरकार वसूल करील. प्रस्तावित जीएसटी हा वस्तूच्या ठिकाणावर अवलंबून असेल त्यात कराचे ओझे उत्पादन राज्याकडून ग्राहक राज्याकडे सरकेल त्यामुळे उत्पादन महसूल कमी होईल. जीएसटीमुळे राज्यांना भरपाई दिली जाणार असली तरी पहिली पाच वर्षे विकसित राज्यांना त्यात तोटाच आहे .ग्राहक व उत्पादन राज्यात त्याचा परिणाम दिसून येईल . ओडिशा, उत्तर प्रदेश, बिहार व केरळ यांना फायदा होईल. तामिळनाडू, गुजरात व महाराष्ट्र यासारख्या प्रगत राज्यांना तोटा होईल. एकच अप्रत्यक्ष कर दर भारतात लागू केल्याने सामायिक बाजारपेठ तयार होऊन ग्राहकांवरचा बोजा कमी होईल. भारतभरात एकच कर असल्याने इनपुट क्रेडिट वाढेल व कराचे परिणाम कमी होतील वस्तू व सेवा यांचे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाणे सोपे होईल, उत्पादन कंपन्यांना कच्च्या मालाचा पुरवठा होईल तसेच त्यांच्या उत्पादनांवर जादा कर लागणार नाही त्यात इनपुट क्रेडिटही चांगले असेल.

### आंतरराष्ट्रीय अनुभव

शिक्षण, आरोग्यास व्यावसायिक व उद्योग सेवा यावर कर लागणार नाही किंवा कमी कर लागेल. जीएसटी साधारण १८ ते २२ टक्के असेल व त्याची अंमलबजावणी चलनवाढ काही काळ कमी करील. आंतरराष्ट्रीय अनुभवानुसार कमी काळासाठी या पद्धतीने चलनवाढ कमी होते व अनेक

---

***प्रस्तावित जीएसटी हा राज्य व केंद्र यांच्या जीएसटीसह सध्याच्या प्रणालीची जागा घेईल. सीएसटीची जागा एकात्म वस्तू व सेवा कर घेईल तो आंतर राज्य सेवा व वस्तू पुरवठ्यावर लागेल तो केंद्र सरकार वसूल करील. प्रस्तावित जीएसटी हा वस्तूच्या ठिकाणावर अवलंबून असेल त्यात कराचे ओझे उत्पादन राज्याकडून ग्राहक राज्याकडे सरकेल त्यामुळे उत्पादन महसूल कमी होईल.***

---

वस्तू व सेवा या करात नव्याने येतात, जीएसटी पद्धत उत्पादन ते किरकोळ विक्री यातील करात पारदर्शकता आणते कारण त्यात आयटी पायाभूत सुविधा वापरल्या जातात. त्यामुळे एकीकडे कराचे ओझे कमी होणार असले तरी कराचा पाया वाढणार आहे त्यामुळे काही वस्तूंच्या किंमती वाढू शकतात. फ्रान्समध्ये जीएसटी १९५४ मध्ये लागू झाला त्यानंतर जर्मनीत १९६८ मध्ये तर ब्रिटनमध्ये १९७३ मध्ये लागू झाला. जीएसटी ही एकात्म कर प्रणाली आहे व अनेक देशात ती लागू आहे. कॅनडा व ब्राझील या देशात दुहेरी जीएसटी आहे. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड, सिंगापूर, जपान, कोरिया, ब्रिटन या देशात स्थूल आर्थिक निर्देशक त्यामुळे सुधारले आहेत. जीएसटी प्रत्येक देशानुसार वेगळा आहे. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड यात अगदी निष्पक्ष पद्धतीने ही प्रणाली चालवली जाते तर कॅनडात काही मधल्या प्रणाली यात काम करतात. अनेक देशात जीएसटीनंतर वस्तूंच्या दरात बदल झाले ते सुरूवातीला वाढले पण नंतर स्थिर झाले नंतर वस्तूंच्या किंमती कमी झाल्या, त्यामुळे जीएसटी प्रणालीमुळे अर्थव्यवस्था स्पर्धात्मक बनतात. निर्यात वाढून महसूलात भर पडते. किंमती स्थिर होतात. भारताच्या संदर्भात कॅनडासारखी दुहेरी जीएसटी पद्धत वापरली आहे. कॅनडातही या पद्धतीला राजकीय पक्षांनी विरोध केला पण तरी त्याची अंमलबजावणी झाली पण कॅनडा सरकारने जीएसटीचे दर कमी ठेवले होते. इतर काही देशांनी ते वाढवले. भारतात महसूलाच्या दृष्टीने २७ टक्के दराची चर्चा आहे तर अंदाज मात्र तो १६ ते १८ टक्के असेल असा आहे. जीएसटी यशस्वी करण्यासाठी कराचा दर कमी असायला हवा.

### आंतरराष्ट्रीय अनुभव

जीएसटीमुळे चलनवाढ होते असा एक अनुभव आहे पण जर तो कर पूर्वीपेक्षा जास्त असेल तरच असे होते.




सिंगापूरमध्ये १९९४ मध्ये जीएसटीमुळे चलनवाढ म्हणजे महागाई झाली होती. मलेशियात काही उद्योगांना जीएसटीचे पालन करताना अडचणींना सामोरे जावे लागले. भारतातील जीएसटी प्रारूप गुंतागुंतीचे आहे त्यामुळे उद्योगांना अनेक बदलांना सामोरे जावे लागेल. भारत सरकारला ९ महिन्यात जीएसटी लागू करणे आव्हानात्मक आहे कारण त्याची अंतिम तारीख १ एप्रिल २०१७ दिली आहे.

जीसएटी कर लोक, उद्योग व आस्थापनांनी स्वीकारला आहे पण ते काम सोपे नाही त्यासाठी बरेच नियोजन लागेल. उद्योगांना वेळ द्यावा लागेल. उद्योजक, प्रशासक यांच्यात संवाद असावा लागेल तर त्याची अंमलबजावणी योग्य होईल. कराचा दरही योग्य असावा लागेल. वैधानिक कागदपत्रे वेळेत द्यावी लागतील. जीएसटी हा प्रभावी कर आहे पण सुरूवातीला त्याच्या अंमलबजावणीत उणिवा राहू शकतात.

**कार्यात्मक अडचणी**

घटनात्मक सुधारणेचा अडथळा दूर झाला असला असून जीएसटीची अंमलबजावणी आता १ एप्रिल २०१७ पासून होईल असे अर्थ मंत्र्यांनी सांगितले

***जीएसटी हे महत्वाचे सुधारणा विधेयक आहे पण भारताची कर प्रणाली जटील आहे. त्यामुळे जीएसटीच्या अंमलबजावणीत अडचणी आहेत. महसूल सापेक्ष दर योग्य असणे आयटी कनेक्टिव्हिटी असणे आवश्यक आहे. राज्यांमध्ये भौगोलिक असमानता बरीच आहे त्यामुळे आव्हान मोठे आहे. जीएसटी हाताळण्याची क्षमता कर यंत्रणेत असली पाहिजे.***

पण अनेक प्रश्न अजून अनुत्तरित आहेत. जीएसटी हे महत्वाचे सुधारणा विधेयक आहे पण भारताची कर प्रणाली जटील आहे. त्यामुळे जीएसटीच्या अंमलबजावणीत अडचणी आहेत. महसूल सापेक्ष दर योग्य असणे आयटी कनेक्टिव्हिटी असणे आवश्यक आहे. राज्यांमध्ये भौगोलिक असमानता बरीच आहे त्यामुळे आव्हान मोठे आहे. जीएसटी हाताळण्याची क्षमता कर यंत्रणेत असली पाहिजे.

प्रथमच राजकीय पक्षांनी एकी दाखवून जीएसटी विधेयक एकमताने मंजूर केले. ती परिपक्वतेची कृती होती व सरकारसाठी मोठी कामगिरी ठरली. जीएसटी ही जगातील सर्वात जटील कर प्रणाली आहे त्यात ७५ लाख उद्योग नोंदणी करून कर भरणा करतील, विवरणपत्रे जीएसटी पोर्टलवर सादर करतील अशी अपेक्षा आहे. आज करांचे स्तर जास्त आहेत व काही कर सवलती जास्त आहेत. त्यामुळे उद्योगांना हा मोठा दिलासा राहील पण त्याची अंमलबजावणी करण्याचा खर्च जास्त राहील.जीएसटी फायद्याचे आहे पण त्यासाठी त्याचा सविस्तर तपशील अजून हाती येणे महत्वाचे आहे त्यावरच त्याचे यश अवलंबून आहे.

■■■

*प्रवाकर साहू इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ या दिल्लीस्थित संस्थेत सहप्राध्यापक आहेत तर अश्वनी बिश्नोई कुरूक्षेत्रास्थित एनआयटीमध्ये सहप्राध्यापक आहेत.*

email: pravakarfirst@gmail.com
ashwani.mbe@gmail.com

# भारतीय करप्रणाली

मालिनी चक्रवर्ती




**सरकार आपल्या विविध योजनांना अर्थसाहाय्य करण्यासाठी असे आर्थिक स्त्रोत मुख्यत्वे कर, उपभोक्ता शुल्क/ सेवा शुल्क आणि कर्ज यांच्या माध्यमातून निर्माण करते. निधीचे जे स्त्रोत तिजोरीवर उत्तरदायीत्व निर्माण करत नाहीत किंवा मालमत्तेमध्ये घट करत नाहीत(उदा. निर्गुंतवणूक) त्यांना भांडवली प्राप्ती म्हणतात. अशा प्रकारे कर आणि वापर शुल्क/ सेवा शुल्क ही सरकारच्या महसूल प्राप्तीची काही उदाहरणे आहेत तर कर्जे ही भांडवली प्राप्ती आहेत.**

आपण आपल्या दैनंदिन जीवनात कोणत्या ना कोणत्या प्रकारे कर भरत असतो. सरकारच्या विविध योजनांना अर्थसाहाय्य करण्यामध्ये आपण भरत असलेल्या या कराची भूमिका महत्त्वाची असते. सरकारला अनेक जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात. यामध्ये कायदा सुव्यवस्था राखणे, सार्वजनिक माल आणि सेवा उपलब्ध करून देणे, सामाजिक आणि भौतिक पायाभूत सुविधा निर्माण करणे, देशातील लोकसंख्येला शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षणामध्ये गुंतवणूक करणे, दारिद्र्य निर्मूलन करणे इत्यादींचा त्यात समावेश असतो. साहजिकच सरकारला अशा अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी विशिष्ट रक्कम उभारून देतील असे आर्थिक स्त्रोत निर्माण करावे लागतात. सरकार आपल्या विविध योजनांना अर्थसाहाय्य करण्यासाठी असे आर्थिक स्त्रोत मुख्यत्वे कर, उपभोक्ता शुल्क/ सेवा शुल्क आणि कर्ज यांच्या माध्यमातून निर्माण करते. निधीचे जे स्त्रोत तिजोरीवर उत्तरदायीत्व निर्माण करत नाहीत किंवा मालमत्तेमध्ये घट करत नाहीत(उदा. निर्गुंतवणूक) त्यांना भांडवली प्राप्ती म्हणतात. अशा प्रकारे कर आणि वापर शुल्क/ सेवा शुल्क ही सरकारच्या महसूल प्राप्तीची काही उदाहरणे आहेत तर कर्जे ही भांडवली प्राप्ती आहेत.

**कर महसूल आणि बिगर-कर महसूल**

सरकारच्या महसूल प्राप्तीची कर महसूल आणि बिगर-कर महसूल अशी आणखी दोन भागात विभागणी करता येऊ शकते.

कर महसूल: सरकारने लागू केलेल्या कायद्यामुळे सरकारकडे चुकत्या केल्या जाणाऱ्या देयकांच्या माध्यमातून जमा होणाऱ्या पैशाला कर समजले जाते.

बिगर-महसूल कर: बिगर-कर महसूल म्हणजे सरकारकडे करांव्यतिरिक्त शुल्क/ वापर आकार, डिव्हिडंड आणि सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांना झालेला लाभ, व्याजाची प्राप्ती, दंड इ. साधनांच्या माध्यमातून जमा होणारा महसूल. जगभरातील अनेक देशांमध्ये कर महसूल म्हणजे सरकारकडे जमा होणाऱ्या महसुलाचा एक मोठा भाग असतो.

**प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर**

करांची विभागणी प्रामुख्याने दोन

प्रकारांमध्ये करता येते:

थेट कर: करांचा भार थेट एका अशी व्यक्ती किंवा आस्थापनेवर पडतो जिच्यावर कर आकारला जातो अशा करांना प्रत्यक्ष कर म्हणतात. दुसऱ्या शब्दात एक अशी बाब जी एक अशा प्रकारचा थेट कर सरकारकडे भरत असते ज्या कराचा भार तिला सहन करावा लागतो आणि त्याचा भार ती अन्यत्र वळवू शकत नाही. प्रत्यक्ष कर उत्पन्नावर, मालमत्तेवर आणि संपत्तीवर आकारले जातात. दुसरीकडे अप्रत्यक्ष कर म्हणजे असे कर ज्यांच्यासाठी कराचा भार दुसऱ्यावर किंवा इतर व्यक्तींवर नंतर मालाच्या/सेवांच्या व्यापाराच्या व्यवहारांद्वारे वळवता येऊ शकतो. हे कर अप्रत्यक्ष कर समजले जातात कारण या करांचा भार ज्याला सहन करावा लागतो त्या मध्यस्थावर या कराची थेट आकारणी झालेली नसते. अप्रत्यक्ष करांमध्ये सीमाशुल्क, उत्पादन शुल्क, सेवा कर आणि विक्री कर/ मूल्यवर्धित कर( व्हॅट) यांचा समावेश होतो.

**भारतातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचे प्रकार**

एखाद्या अर्थव्यवस्थेमध्ये विविध प्रकारचे उत्पन्न, उत्पादन आणि मालाची व सेवांची विक्री यांवर आकारण्यात येणारे आणि सीमेपलीकडे होणाऱ्या मालाची ने-आण यांच्यावर लागू होणारे इतर कर अशा प्रकारचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे दोन्ही प्रकारचे कर अस्तित्वात असतात. भारतामध्ये अस्तित्वात असलेल्या विविध प्रकारच्या काही करांचे उदाहरण खाली दिलेले आहे.

**प्रत्यक्ष कर**

- **कॉर्पोरेशन टॅक्स**: हा कर नोंदणीकृत कंपन्या/ देशातील बड्या आस्थापना( राष्ट्रीय किंवा बहुराष्ट्रीय/ परदेशी असू शकतात). भारतातील राष्ट्रीय कंपन्यांवर त्यांच्या एकंदर उत्पन्नाच्या आधारे, उत्पन्नाचा स्रोत व मूळ विचारात न घेता करांची आकारणी केली जाते. तर परदेशी कंपन्यांच्या निव्वळ भारतातील व्यवहारांतून निर्माण होणाऱ्या उत्पन्नावर करांची आकारणी केली जाते.
- **उत्पादन शुल्क**: हा एक असा कर आहे ज्याची आकारणी भारतात तयार होणाऱ्या व स्थानिक वापरासाठी असलेल्या मालावर होते.
- **वैयक्तिक उत्पन्नावर कर**: व्यक्ती, मोठ्या कंपन्यांशिवाय इतर आस्थापना यांच्यावर प्राप्तिकर कायदा १९६१ नुसार हा कर आकारला जातो.
- **शेअर व्यवहार कर**: प्रत्यक्ष करांमध्ये शेअर व्यवहार कर यांसारख्या करांचाही समावेश होतो ज्याची आकारणी नोंदणीकृत नियामकांच्या व्यवहारांवर होते जे शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडांच्या युनिटमध्ये होतात.
- **कॅपिटल गेन्स टॅक्स**: एखाद्या भांडवली मालमत्तेच्या म्हणजे विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यावर
- एखाद्या भांडवली मालमत्तेच्या विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यावर( भौतिक व आर्थिक) म्हणजे एखाद्या करदात्याकडे असलेली चित्रे, दागिने व आभूषणे, शेअर, म्युच्यअल फंड इ. कॅपिटल गेन्स म्हणून अल्पकालीन किंवा दीर्घकालीन करआकारणीसाठी पात्र आहेत, कॅपिटल गेन किंवा एकूण नफा जो करआकारणीसाठी पात्र असतो तो म्हणजे मुख्यत: त्या वस्तूची विक्री किंमत व त्या वस्तूची विक्री करतानाची किंमत व तिची बाजारातील खरेदी किंमत यामधील फरकाइतकी असते. ज्या वर्षात या भांडवली मालमत्तेची विक्री होते त्या वर्षात हा कर लागू होतो.
- **संपत्ती कर**: व्यक्ती आणि कंपन्यांसह विशिष्ट व्यक्तींच्या विशिष्ट मालमत्तेवर हा कर संपत्ती कर कायदा १९५७ अंतर्गत आकारला जातो. हा कर उत्पादित मालमत्तेवर लागू होत नाही. म्हणूनच शेअर्स, डिबेंचर्स, युटीआय म्युच्युअल फंड्स इत्यादींवर या कराची आकारणी होत नाही. मात्र, २०१५-१६ मध्ये हा कर रद्द करण्यात आला आणि त्याच्या जागी सुपर रिच म्हणजे अतिश्रीमंत व्यक्तींवर अतिरिक्त अधिभार लावण्यात आला.
- **मालमत्ता कर**: भारताच्या प्राप्तिकर कायद्यानुसार मालमत्तांमधून मिळणारे उत्पन्न उत्पन्नांच्या प्रमुख स्रोतांपैकी एक समजले जाते. म्हणूनच मालमत्तांच्या उत्पन्नावर कर आकारला जातो. साधारणपणे यामध्ये इमारती, फ्लॅट्स, दुकाने आणि जमीन इत्यादींचा समावेश होतो.

**अप्रत्यक्ष कर**

- **उत्पादन शुल्क**: हा एक असा कर आहे ज्याची आकारणी भारतात तयार होणाऱ्या व स्थानिक वापरासाठी असलेल्या मालावर होते.
- **विक्री कर**: सामान्यत: याची आकारणी त्या ठिकाणी होते जिथे विशिष्ट करपात्र मालाची खरेदी किंवा अदलाबदल होत असते. संपूर्ण

उत्पादनाच्या एकूण मूल्याच्या काही टक्के अशी याची आकारणी होत असते.

- **मूल्यवर्धित कर:(व्हॅट)** मूल्यवर्धित कर बहुस्तरिय कर आहे. ज्याची आकारणी पुरवठा साखळीच्या वेगवेगळ्या टप्प्यावर भर पडणाऱ्या मूल्याच्या आधारे केली जाते आणि संपूर्ण मालाच्या विक्रीमूल्यावर केली जात नाही. करदात्यांना आधीच चुकत्या केलेल्या कराचा परतावा पुरवठा साखळीतील आधीच्या टप्प्यातील माहितीद्वारे मिळतो.
- **सेवा कर:** एखादी व्यक्ती अथवा कंपनीने दिलेल्या सेवेवर हा कर लावला जातो आणि हा कर भरण्याची जबाबदारी ही सेवा पुरवणाऱ्यावर असते.
- **सीमा शुल्क:** देशामध्ये आयात केल्या जाणाऱ्या आणि त्याचबरोबर निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर हा कर लावला जातो.

**केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यात कर आकारणीच्या अधिकारांची विभागणी**

भारताच्या राज्यघटनेने अतिशय स्पष्टपणे करआकारणीच्या अधिकारांची विभागणी प्रशासनाच्या विविध पातळ्यांवर केलेली आहे. अशा प्रकारे कर आणि शुल्क आकारणीच्या अधिकारांची विभागणी सरकारांमध्ये तीन टप्प्यांवर केलेली आहे. ती म्हणजे केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था

- कॉर्पोरेशन्स आणि वैयक्तिक उत्पन्नावर कर आकारण्याचे अधिकार (कृषिउत्पन्नावरील कराशिवाय, कारण हा कर राज्य सरकारे आकारू शकतात) जास्त करून केंद्र सरकारकडे असतात. अप्रत्यक्ष करांच्या अस्तित्वाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडे उत्पादनावरील किंवा निर्मितीवरील उत्पादन शुल्क आणि पुरवल्या जाणाऱ्या सेवांवर सेवाकर असे व्यापक कर आकारणीचे अधिकार आहेत तर राज्यांकडे मालाच्या विक्रीवर कर आकारण्याचे आणि इतर काही कर आकारण्याचे अधिकार आहेत. केंद्र सरकार आकारत असलेल्या अप्रत्यक्ष करांमध्ये सीमाशुल्क, केंद्रीय उत्पादन शुल्क, विक्री कर आणि सेवा कर यांचा समावेश आहे.
- राज्य सरकारांना विक्री कर, मुद्रांक शुल्क/ स्टॅम्प ड्युटी( मालमत्ता हस्तांतरणाचे शुल्क), राज्य उत्पादन शुल्क( अल्कोहोल उत्पादनांवरील शुल्क) जमीन महसूल( शेतीसाठी वापरलेल्या जमिनीवरील शुल्क), मनोरंजन शुल्क आणि व्यवसायांवरील कर हे कर आकारण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. राज्य सरकारांकडून आकारण्यात येणा-या विक्री कर प्रणालीची जागा २००५ मध्ये ज्या वेळी सर्व राज्य सरकारे व्हॅट प्रणालीमध्ये आली तेव्हापासून मूल्यवर्धित कराने घेतलेली आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांना मालमत्तेवर( इमारती, इ.), ऑक्ट्रॉय( उपयोगासाठी/वापरासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात प्रवेशावर असलेला कर), बाजारांवर कर आणि पाणीपुरवठा, सांडपाणी वहन इ. सारख्या सोयीसुविधांवरील कर/वापर शुल्क अशा प्रकारचे कर आकारण्याचे अधिकार दिले आहेत. गेल्या काही वर्षात अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ऑक्ट्रॉय रद्द केला आहे.

***एखाद्या देशाचे कर-जीडीपी अर्थात कर आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे गुणोत्तर एक महत्त्वाचा निर्देशांक मानला जातो ज्यामुळे सरकारकडून अर्थव्यवस्थेच्या आकारमानाच्या तुलनेत किती प्रमाणात कर महसूल जमा केला जात आहे याची माहिती मिळण्यास मदत होते. उच्च कर-जीडीपी गुणोत्तर असल्यास सरकारला अर्थसंकल्पात अधिक मोकळीक मिळते जेणेकरून कोणतेही कर्ज न घेता सरकारला जास्त खर्च करता येतो.***

- **केंद्रीय कर प्रणाली अंतर्गत संकलित केलेल्या महसुलाचे वितरण**

अनेक कारणांमुळे केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये करआकारणीचे अधिकार आणि खर्चाच्या जबाबदाऱ्यांमध्ये असंतुलन निर्माण होते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी दर पाच वर्षांनी एका वित्त आयोगाची स्थापना करण्यात येते. केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यात आर्थिक स्रोतांची विभागणी कशी करायची याची शिफारस करण्याचे काम या आयोगाकडे असते. केंद्र सरकारच्या कर प्रणालीमध्ये जमा झालेल्या महसुलापैकी ब-याच मोठ्या भागाच्या विभागणीशी त्याचा संबंध असतो. सध्या सर्व केंद्रीय करांच्या माध्यमातून जमा झालेला महसूल, सेस, अधिभार आणि केंद्रशासित प्रदेशांचे कर वगळता केंद्रीय करांच्या माध्यमातून जमा झालेल्या किंमतीइतकी रक्कम ही विभागणी करण्याजोगी/

केंद्रीय कर महसुलाच्या साठ्याला विभागण्याजोगी समजली जाते. १४व्या वित्त आयोगाने( १ एप्रिल, २०१५ पासून लागू झालेला) दरवर्षी केंद्रीय कर महसुलाच्या विभागणी करण्याजोग्या/ विभागण्याजोग्या साठ्याच्या ४२ टक्के वाटा राज्यांना देण्याची शिफारस केली आहे आणि केंद्राने उर्वरित रक्कम केंद्रीय अर्थसंकल्पासाठी राखून ठेवायची आहे.

**कर-जीडीपी गुणोत्तर आणि भारतातील करांची प्रागतिकता**

एखाद्या देशाचे कर-जीडीपी अर्थात कर आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे गुणोत्तर एक महत्त्वाचा निर्देशांक मानला जातो ज्यामुळे सरकारकडून अर्थव्यवस्थेच्या आकारमानाच्या तुलनेत किती प्रमाणात कर महसूल जमा केला जात आहे याची माहिती मिळण्यास मदत होते. उच्च कर-जीडीपी गुणोत्तर असल्यास सरकारला अर्थसंकल्पात अधिक मोकळीक मिळते जेणेकरून कोणतेही कर्ज न घेता सरकारला जास्त खर्च करता येतो. मात्र, भारताच्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या उच्च वृद्धीनंतरही भारताचे कर- जीडीपी गुणोत्तर अल्प राहिलेले आहे. ते इतके कमी आहे की 'ब्रिक्स' देशांमध्ये भारताचे कर-जीडीपी गुणोत्तर सर्वात तळाला आहे. म्हणूनचे हे गुणोत्तर सुधारण्याची गरज आहे.

भारताच्या संरचनेचा आणखी एक पैलू म्हणजे त्यातील प्रागतिकतेचा अभाव होय. जे कर तुलनेने सर्वात जास्त भार( त्यांच्या वापराशी किंवा उत्पन्नाशी असलेला संबंध) उच्च उत्पन्न गटांपेक्षा अल्प उत्पन्न गटावर टाकतात त्यांना प्रतिगामी(रिग्रेसिव) कर असे म्हटले जाते. त्यामुळेच अप्रत्यक्ष करांना प्रतिगामी कर समजले जाते कारण श्रीमंत आणि गरीब यांना ते वापर करत असलेल्या मालासाठी सारखाच कर भरावा लागतो. दुसरीकडे प्रत्यक्ष करांना पुरोगामी (प्रोग्रेसिव) कर समजले जाते कारण ते करदात्याच्या कर भरण्याच्या क्षमतेशी संबंधित असतात आणि कराचा सरासरी दर करदात्याच्या उत्पन्नातील वाढीनुसार वाढत जातो. भारतामध्ये एकूण जमा झालेल्या करापैकी(केंद्र व राज्यांचा) ६० टक्यांहून अधिक कर अप्रत्यक्ष करांमधून जमा होतो. म्हणजेच यातून असे सूचित होते की ही करप्रणाली अतिशय प्रतिगामी आहे.

**करातील सुधारणा**

गेल्या काही वर्षांत करांमध्ये अनेक प्रकारच्या सुधारणा झाल्या आहेत. विशेषत: अप्रत्यक्ष करप्रणालीमध्ये सरकारने बदलांची प्रक्रिया सुरू केली आहे. भारताला अधिक कर-अनुकूल बनवण्याबरोबरच कर प्रणालीमधील गुंतागुंत आणखी कमी करण्याचा त्यामागे उद्देश आहे. यापैकी सर्वात मोठ्या सुधारणेसाठी केलेला पाठपुरावा म्हणजे वस्तू आणि सेवा कर(जीएसटी) होय. खरेतर सर्व राज्यांमध्ये २००५ मध्ये विक्रीकराची जागा मूल्यवर्धित कराने घेतली आणि सध्या मूल्यवर्धित

भारताचे कर-जीडीपी गुणोत्तर(केंद्र व राज्यांचे एकत्रित) (% मध्ये)

| वर्ष | एकूण कर-जीडीपी गुणोत्तर | प्रत्यक्ष कर-जीडीपी गुणोत्तर | अप्रत्यक्ष कर-जीडीपी गुणोत्तर |
|---|---|---|---|
| २००१-०२ | १३.३९ | ३.११ | १०.२८ |
| २००२-०३ | १४.०८ | ३.४५ | १०.६३ |
| २००३-०४ | १४.५९ | ३.८६ | १०.७३ |
| २००४-०५ | १५.२५ | ४.२३ | ११.०२ |
| २००५-०६ | १५.९१ | ४.५४ | ११.३७ |
| २००६-०७ | १७.१५ | ५.३९ | ११.७७ |
| २००७-०८ | १७.४५ | ६.३९ | ११.०६ |
| २००८-०९ | १६.२६ | ५.८३ | १०.४३ |
| २००९-१० | १५.५ | ५.८ | ९.६ |
| २०१०-११ | १६.३ | ५.८ | १०.५० |
| २०११-१२ | १६.३ | ५.६ | १०.७ |
| २०१२-१३ | १६.९ | ५.६ | ११.३ |
| २०१३-१४(RE) | १७.१ | ५.७ | ११.४ |
| २०१४-१५ (BE) | १७.४ | ५.८ | ११.६ |

टीप: RE – सुधारित अंदाज, BE – अर्थसंकल्पीय अंदाज;

स्रोत: भारतीय सार्वजनिक वित्त सांख्यिकी २०१४-१५, अर्थ मंत्रालय, भारत सरकार

कराव्यतिरिक्त इतर अप्रत्यक्ष करांची आकारणी होत आहे. यामुळे करांमध्ये पुनरावर्ती परिणाम दिसून येऊ लागला आहे. म्हणजे एकाच वस्तूवर उत्पादनापासून ते त्याच्या किरकोळ दुकानातील विक्रीच्या अंतिम टप्प्यांपर्यंत पुन्हापुन्हा कराची आकारणी होऊ लागली आहे. त्यामुळे उत्पादनांच्या कराच्या आकारमानात वाढ झाली आहे आणि उच्च कर आकारणी लागू असलेले दर दिसत आहेत. तसेच विविध राज्यांकडून व केंद्र सरकारकडून आकारल्या जाणा-या अनेक प्रकारच्या करांमुळे करचुकवेगिरीला मोठ्या प्रमाणात वाव मिळू लागला आहे.

या सर्व सध्या अस्तित्वात असलेल्या गुंतागुंतीच्या अप्रत्यक्ष करांच्या जाळ्यांचा अंत करण्यासाठी आणि त्यांच्या जागी एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यासाठी जीएसटी प्रणाली आणली गेली आहे. मूल्यवर्धित करासारखाच हा कर आहे आणि म्हणूनच तो करांच्या पुनरावर्ती परिणामांना संपुष्टात आणेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पेट्रोलिअम, तंबाखू, अल्कोहोल इ. वगळता बहुतेक माल आणि सेवांवर त्याची आकारणी केली जाणार आहे. जीएसटी हा जरी एकच कर असला तरी त्यामध्ये दोन भागांचा समावेश आहे. ते म्हणजे केंद्रीय जीएसटी व राज्य जीएसटी. ए. सुब्रमणियन यांच्या नेतृत्वाखालील समितीच्या म्हणण्यानुसार अनेक प्रकारचे दरही मर्यादित होण्याची शक्यता आहे. १) बहुतेक माल व सेवांवर एक प्रमाणित दर आकारला जाईल. २) अत्यावश्यक वस्तू आणि गुणवत्ताप्राप्त मालावर कमी दर आणि ३) बिगर-गुणवत्ताप्राप्त चैनीच्या वस्तूंसारख्या मालावर उच्च दर अशी रचना प्रस्तावित आहे. जीएसटीमुळे करआकारणीच्या अधिकारांची केंद्र आणि राज्य सरकारांमधील विभागणी पुसट होत जाणार आहे कारण केंद्र व राज्य दोघेही आता उत्पादनांवर त्याचबरोबर मालाची विक्री व सेवांवर अप्रत्यक्ष कर आकारू शकणार आहेत. जीएसटीच्या आगमनामुळे करप्रणाली सोपी आणि न्याय्य होईल आणि अनुपालन वाढेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. त्याच वेळी प्रत्यक्ष करांमध्ये वाढ करण्यासाठी सरकारने देखील काही पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे. ज्यामुळे भारताच्या कर संरचनेची प्रागतिकता वाढवण्यास मदत होऊ शकेल.

■■■

*लेखक नवी दिल्ली येथील धोरण संशोधन संघटना असलेल्या सेंटर फॉर बजेट अँड गवर्नन्स अकाउंटेबिलिटी (सीबीजीए) सोबत काम करत आहेत,*
email: malini@cbgaindia.org



# अप्रत्यक्ष कर आणि अर्थव्यवस्था

वैभव वझे




**अर्थव्यवस्थेमध्ये करांचं योगदान महत्त्वाचं असतं. त्यातही अप्रत्यक्ष करांचं योगदान हे लक्षणीय राहतं, फक्त ते दिसत नाही. जीएसटी आल्यानंतर हे अप्रत्यक्ष कर रद्दबातल होतील, असं म्हटलं जातं. खरंच असं होईल, की ते सगळे कर जीएसटी या एकाच शीर्षकाखाली आपण भरू? कदाचित असंच होईल. म्हणजेच या करांचं योगदान हे राहणारच ना. त्या अनुषंगाने अप्रत्यक्ष करांचा घेतलेला हा वेध...**

भारतीय अर्थव्यवस्था ही गेल्या काही वर्षांत संपूर्ण जगाचं आकर्षण ठरली आहे. कारखानदारी, प्रत्यक्ष कर (प्राप्तिकर किंवा इन्कम टॅक्स), अप्रत्यक्ष कर (इन्डायरेक्ट टॅक्स), गुंतवणूक, थेट परदेशी गुंतवणूक (फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट अर्थात एफडीआय), आयात, निर्यात अशा अनेक अंगांनी आपली अर्थव्यवस्था समृद्ध आहे, होते आहे. यामध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात सर्वाधिक चर्चा होणारे घटक हे कायम प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर राहिले आहेत. प्रत्यक्ष कर अर्थात प्राप्तिकर व त्याची करपात्र तसंच करमुक्त उत्पन्नाची मर्यादा हा सर्वसामान्यांसाठी उत्सुकतेचा विषय असतो. या उत्सुकतेचं, कुतूहलाचं निराकरण करणं हे त्यासाठी टॅक्स स्लॅब जाहीर करून करता येतं, ते तितकं गुंतागुंतीचं नसतंही. परंतु अप्रत्यक्ष करांबाबतचे निर्णय अतिशय काळजीपूर्वक घ्यावे लागतात. कारण, हा कर नागरिकाच्या खिशातून अलगद काढायचा असतो! नागरिकाचे दैनंदिन व्यवहार सुरू राहताना, प्रत्येक पावलावर याच नागरिकाकडून अप्रत्यक्ष कर वसूल केला जातो. हॉटेलमधलं खाणं असो, परदेशी वस्तूंची खरेदी असो की चित्रपटगृहात चित्रपट पाहणं असो, सगळीकडे अप्रत्यक्ष कर नागरिकाला द्यावा लागतो.

आपल्या देशात मुख्यत: सात प्रकारचे अप्रत्यक्ष कर द्यावे लागतात. त्यांची आपण थोडक्यात माहिती करून घेऊ.

**सेवाकर :**

डॉ. राजा चेल्लय्या समितीने केंद्र सरकारला सर्वप्रथम सेवांवर कर आकारण्याचा सल्ला दिला आणि १९९३-९४ या आर्थिक वर्षापासून सेवाकर लागू झाला. सुरुवातीला दोन सेवांवर हा कर लागू झाला आणि त्याचा दर २००३पर्यंत सरसकट पाच टक्के होता. त्यानंतर तो वाढत वाढत १५ टक्के झाला आहे. (पहा चौकट १).

कोणतीही व्यक्ती, संस्था, कंपनी यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या सेवेवर हा कर आकारला जातो. त्यामुळे अशांपैकी कोणीही सेवा देताना, त्याचा मोबदला घेताना त्यावर सेवाकर आकारूनच तो मोबदला घेणं बंधनकारक आहे. निगेटिव्ह लिस्टमधील सेवा वगळता सर्वच सेवांवर आपल्याला सेवाकर द्यावा लागतो. सरकारसाठी हे उत्पन्नाचं चांगलं साधन आहे. त्यामुळेच २००३ मध्ये सेवाकरापोटी मिळणारं २५४ कोटी

रुपयांचं करउत्पन्न वाढून आज सुमारे दीड लाख कोटी रुपयांवर गेलं आहे.

**उत्पादन शुल्क :**

देशात तयार होणाऱ्या (उत्पादन केल्या जाणाऱ्या) वस्तूंवर उत्पादन शुल्क आकारलं जातं. यासाठी १९४४चा सेंट्रल एक्साइज अॅक्ट लागू होतो. अर्थात उत्पादन शुल्क लागू करण्यासाठी काही निकष पूर्ण करावे लागतात. ते असे

-उत्पादन कारखान्यात तयार झालेले असावे.

-विशेष आर्थिक क्षेत्र वगळता उत्पादन भारतात तयार झालेले असावे.

-उत्पादन ही वस्तू असावी.

-उत्पादित वस्तू ही उत्पादन शुल्कासाठी योग्य असावी. त्यासाठी तिचा समावेश सेंट्रल एक्साइज टारिफ अॅक्ट, १९८५मध्ये झालेला असावा.

---

***सेवाकराचा प्रवास***

***१ जुलै १९९४ ते १३ मे २००३ : ५ टक्के***

***२००४ : ८ टक्के + २ टक्के शिक्षण उपकर***

***२००६ : शिक्षण उपकरासह एकूण १२ टक्के***

***२००७ : माध्यमिक व उच्च शिक्षण उपकरासह एकूण १२.३६ टक्के***

***१ जून २०१५ : १४ टक्के***

***१५ नोव्हेंबर २०१५ : १४ टक्के + ०.५ टक्के स्वच्छ भारत उपकर (एकूण १४.५ टक्के)***

***१ जून २०१६ : १४.५ टक्के + ०.५ टक्के कृषिकल्याण उपकर (एकूण १५ टक्के)***

---

**मूल्यवर्धित कर :**

चल वस्तूंवर मूल्यवर्धित कर अर्थात व्हॅट आकारणी केली जाते. वस्तूच्या बाबतीत प्रत्येक व्यवहार टप्प्यावर त्या वस्तूमध्ये मूल्यवृद्धी होत असते. त्यामुळे अशा प्रत्येक टप्प्यावर हा कर लावला जातो. म्हणजेच हा कर उत्पादन व वितरण यांच्या विविध टप्प्यांवर लागू होतो. परिणामी, हा कर ग्राहकालाच अप्रत्यक्षरीत्या भरावा लागतो.

व्हॅट हा राज्याच्या अखत्यारीतील कर आहे. त्यामुळे हा कर नेमका किती टक्के लावावा, ते ठरवण्याची मुभा राज्य सरकारांना देण्यात आली आहे.

**सीमाशुल्क :**

सीमाशुल्क अर्थात कस्टम ड्युटी ही आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर लागू होते. काही वस्तूंच्या बाबतीत भारतातून निर्यात होतानाही सीमाशुल्क आकारले जाते. देशामध्ये कस्टम्स अॅक्ट, १९६२नुसार सीमाशुल्काची आकारणी केली जाते. या कायद्यानुसार सरकारला आयात व निर्यात, आयात-निर्यात प्रक्रिया, आयात-निर्यातीसाठी विविध प्रतिबंध, दंड, गुन्हे आदींवर सीमाशुल्क आकारता येऊ शकते.

**रोखे व्यवहार कर :**

रोखे व्यवहार कर किंवा सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स हा भारतीय भांडवल बाजारातून रोखे खरेदी केल्यास किंवा विकल्यास त्यावर लागू होतो. या रोख्यांमध्ये शेअर्स, म्युच्युअल फंडाच्या योजना, फ्युचर्स अँड ऑप्शन्स व्यवहार आदींवर लागू होतो. हा कर १ एप्रिल २००४पासून लागू करण्यात आला आहे. अल्पकालीन भांडवली लाभावर असलेला कराचा बोजा कमी करण्यासाठी तसेच दीर्घकालीन भांडवली लाभकरमुक्त करण्यासाठी रोखे व्यवहार कराचा अंतर्भाव अप्रत्यक्ष करामध्ये करण्यात आला.

**मुद्रांक शुल्क :**

मुद्रांक शुल्क अर्थात स्टॅम्प ड्युटी हा राज्य सरकारांचा कर आहे. अचल मालमत्तेच्या हस्तांतरावर हा कर लागतो. याखेरीज सरकारच्या सर्व वैधानिक कागदपत्रांवरही हा कर लावला जातो. राज्यानुसार मुद्रांक शुल्काचे दर बदलतात.

---

***जीएसटी परिषदेत ठरवला गेलेला जीएसटी***

***जीएसटी परिषदेच्या दोन दिवसीय बैठकीत चार स्तरीय जीएसटी लागू करण्याचे निश्चित झाले आहे. यानुसार, ५, १२, १८ व २८ टक्के जीएसटी लागू होणार आहे. सर्वसामान्यांकडून वापरण्यात येणाऱ्या वस्तूंवर ५ टक्के जीएसटी लागू होईल. जीएसटीचा प्रमाणित दर १२ व १८ टक्के राहील. जीएसटी येण्यापूर्वी ३० किंवा ३१ टक्के अप्रत्यक्ष कर आकारण्यात येत असलेल्या वस्तूंवर सर्वाधिक स्तराचा, म्हणजेच २८ टक्के जीएसटी आकारला जाणार आहे. म्हणजे या प्रकारच्या वस्तू काही प्रमाणात स्वस्त होण्याची शक्यता आहे. आलिशान कार, तंबाखू, शीतपेये यांच्याबाबत लागू होणाऱ्या २८ टक्के जीएसटीवर अतिरिक्त उपकर लागू करण्यात येणार आहे.***

---

**मनोरंजन कर :**

मनोरंजनाशी संबंधित सर्व अंतिम

व्यवहारांवर मनोरंजन कर लागू होतो. यामध्ये मनोरंजन उद्याने, व्हिडिओ गेम्स, आर्केड्स, प्रदर्शने, सेलिब्रिटी स्टेज शो, क्रीडा इव्हेन्ट आदी सर्वांवर मनोरंजन कर आकारण्यात येतो.

वर नमूद केलेले अप्रत्यक्ष कर हे महत्त्वाचे अप्रत्यक्ष कर आहेत. याशिवाय चैन कर (लक्झरी टॅक्स), विक्रीकर, जकात यासारखे अप्रत्यक्ष कर आकारले जातात. हे सगळे कर जीएसटीत विलिन होतील.

या अप्रत्यक्ष करांचे हे सगळे प्रकार आपण पाहिले. या करांचे अर्थव्यवस्थेतील नेमके योगदान काय याचाही विचार आपल्याला करावा लागेल. या करांकडे केंद्र व राज्य सरकार केवळ महसुलाचे साधन म्हणून पाहत असेल, असे वाटत नाही. थोडा सामाजिक पातळीवर येऊन या करांचा विचार केला तर असे लक्षात येते, की उत्पादन, कारखानदारी, वस्तूंचा वापर किंवा कन्झम्शन या सर्वांना शिस्त लागावी यासाठीही या अप्रत्यक्ष करांचा उपयोग होतो. वस्तूंची आयात अनिर्बंध पद्धतीने होऊ नये, कोणत्याही वस्तू देशात कितीही संख्येने येऊ नयेत यासाठी यावर लक्ष ठेवण्याचे कामही अप्रत्यक्ष कर करतात. अर्थात आपल्या देशात अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अधिक असल्यामुळे मालाची किंमत बऱ्याचदा वाढते. प्रत्यक्ष कर म्हणून प्राप्तिकर किंवा आयकर आपण भरतो. वरील अप्रत्यक्ष कर आपण प्रत्यक्ष भरत नसल्यामुळे लक्षात येत नाहीत. (चौकट ३)

*केंद्र व राज्य यांचा कर महसूल (वर्ष २०११-१२)*

***केंद्राचा प्रत्यक्ष कर महसूल : ५ लाख ३२ हजार ६५१ कोटी रुपये***

***केंद्राचा अप्रत्यक्ष कर महसूल : ३ लाख ९१ हजार ७८९ कोटी रुपये***

***राज्यांचा प्रत्यक्ष कर महसूल : ६४ हजार ८०९ कोटी रुपये***

***राज्यांचा अप्रत्यक्ष कर महसूल : ४ लाख ६२ हजार २१२ कोटी रुपये***

जीएसटीमुळे हे सगळे कर रद्दबातल होणार आहेत. २००६-०७च्या केंद्रीय अर्थसंकल्पात तत्कालीन अर्थमंत्र्यांनी जीएसटीची घोषणा केली होती. हा कर १ एप्रिल २०१०पासून लागू करण्याचे लक्ष्य त्यावेळी ठेवण्यात आले होते. त्यानंतर दहा वर्षांनी जीएसटी प्रत्यक्षात येण्याची खात्री देण्यापर्यंत आपण आलो आहोत. या सगळ्या अप्रत्यक्ष करांऐवजी एकच कर ही कल्पना ऐकायला गोड वाटत असली तरी या अप्रत्यक्ष करांचा राज्यांना मिळणारा महसूलही जाणार आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही. उदाहरणार्थ, जगात इथियोपिया व देशात मुंबई या दोनच ठिकाणी जकात वसूल केली जाते. ही जकात जीएसटीमुळे रद्द करावी लागणार असेल तर मुंबई महापालिकेचे बुडणारे उत्पन्न कसे भरून निघणार हा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या अखत्यारीतील विक्रीकर, मनोरंजन कर, मूल्यवर्धित कर यासारख्या करांपोटी मिळणारा महसूल राज्याच्या तिजोरीत जीएसटी लागू झाल्यानंतर कसा जमा होणार हादेखील प्रश्न आहे. आपल्या देशात आयकरापोटी मोठ्या प्रमाणावर महसूल जमा होतो. परंतु तो केंद्राच्या तिजोरीत जमा होतो. म्हणून मग राज्यांकडे त्यांचे हक्काचे वरील अप्रत्यक्ष कर उरतात. हा सगळा महसूल जीएसटीमुळे पुन्हा केंद्राकडे गेला तर राज्याच्या तिजोरीला पडणारे खिंडार कोण बुजवणार, हा राज्यांपुढचा प्रश्न आहे.

जीएसटी लागू करणे हा केंद्र सरकारने प्रतिष्ठेचा केलेला प्रश्न आहे. अर्थात त्यासाठी केंद्रीय पातळीवर जोरदार तयारीही सुरू आहे. जीएसटीमुळे बुडणारा कर महसूल राज्यांना उपलब्ध व्हावा यासाठी ५० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय जीएसटी परिषदेने घेतला आहे. त्यामुळेच अप्रत्यक्ष करांचा महसूल बुडाल्यामुळे होणारे कोट्यवधींचे नुकसान भरून काढले जाणार आहे. या करांच्या जाण्यामुळे सर्वाधिक तोटा होणाऱ्या राज्य सरकारांना केंद्राने दिलेला हा मोठाच दिलासा आहे.

■■■

*लेखक महाराष्ट्र टाईम्स दैनिकाचे वरिष्ठ पत्रकार असून आर्थिक विषयाचे अभ्यासक आहेत.*
email: vsv1975@gmail.com

**आगामी अंक**

**डिसेंबर २०१६ (विशेषांक)**
**'प्रगतीसाठी विज्ञान'**

विकास आराखडा

# जागतिक स्पर्धात्मक निर्देशांकात भारताची दमदार प्रगती



जागतिक अर्थविषयक परिषदेने (World Economic Forum) नुकत्याच प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार भारताच्या स्पर्धात्मक निर्देशकांत चांगलीच प्रगती केली असून सोळा राष्ट्रांना मागे टाकत यावर्षी १३८ देशांच्या तालिकेमध्ये ३९ वा क्रमांक पटकावला आहे. ब्रिक्स देशांच्या दृष्टीतून विचार करता चीन हा देश २८ व्या क्रमांकावर दिसून येतो. २०१४-१५ साली भारताने असलेल्या ७१ व्या क्रमांकावरुन २०१५-१६ मध्ये ५५ व्या स्थानावर झेप घेतली होती. याचाच अर्थ आपण सोळा देशांना मागे टाकले होते आणि आता तर नुकत्याच प्रसिध्द झालेल्या अहवालानुसार ३९व्या स्थानावर पोहोचलो आहोत. या सुधारलेल्या गुणवत्तेच्या अनुषंगाने भारताने खूप मोठे अंतर कापलेले दिसते आणि जागतिकीकरणाच्या वातावरणात एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून आपली वलय निर्माण करण्यात यश मिळवले आहे. जागतिक आर्थिक परिषदेकडून जागतिक स्पर्धात्मक निर्देशांक हा अहवाल प्रसिध्द केला जातो. हा अहवाल एक महत्त्वपूर्ण अभ्यास आहे. यामध्ये देशांना गुणांकन दिले जाते व जागतिक स्पर्धात्मकतेची दिशाही स्पष्ट केली जाते. हा निर्देशांक बारा घटकांची आकडेमोड करत तयार केला जातो व त्यानंतर तीन मोठ्या व महत्त्वपूर्ण घटकांमध्ये त्याचे रुपांतरण केले जाते. हे तीन महत्त्वाचे घटक म्हणजे मूलभूत गरजा, कार्यक्षमता व नाविन्यपूर्ण तसेच सुसंस्कृतपणा. हा अहवाल व्यापारी तसेच सामाजिक दृष्टीकोनातून विचार करुन तयार केला जातो. याचा दृश्य किंवा अदृश्य परिणाम जागतिकीकरणाच्या भोवऱ्यात देशाच्या स्पर्धात्मकतेवर दिसतो. जागतिक स्पर्धात्मक निर्देशकाने ज्या बारा बाबींचा उल्लेख केला आहे. त्या म्हणजे संस्था, पोषक वातावरण, सूक्ष्म आर्थिक वातावरण, आरोग्य, प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, प्रशिक्षण बाजारामधील कार्यक्षमता, श्रमिकांची कार्यक्षमता, वित्तविषयक विकास, तांत्रिक तत्परता, बाजाराचे आकारमान आणि नाविन्य. या सर्वांमध्ये भारतीयांची स्पर्धात्मकता ज्या मध्ये विशेषकरुन वाढली आहे, त्या मध्ये मालासंबंधातील तत्परता, उद्योगातील सुलभता आणि नाविन्यपूर्णता यांचा समावेश होतो. या सुरेख अशा आर्थिक वातावरणासाठी प्रगत असे वित्तधोरण आणि तेल किंमतीमध्ये आलेली घट यांचाही वाटा आहे.

भारताने गुंतवणुकदारांच्या संरक्षण देण्याच्या कामी ८ वा क्रमांक पटकावला आहे . येऊ घातलेल्या काळात बाजारातील मालासंदर्भातील तत्परता यामध्ये लक्षणीय सुधारणा होईल. जीएसटी कराच्या माध्यमातून ही किमया गाठता येणार आहे. कारण देशांतर्गत विखुरलेल्या बाजारपेठेचे आकारमान कमी होणार आहे.

**साहसी भांडवल योजनेचे लाभार्थी**

अनुसुचित जातींसाठी असलेल्या योजनेचा लाभ घेऊन एका उद्योजकाने 'जीवन सुधा' - आयुर्वेदिक हक्क संपदा असलेले एक औषध, साहसी भांडवली योजने अंतर्गत बाजारात आणले. या कामी सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने २०१४-१५साली पुढाकार घेतला. मेसर्स मल्लूर फ्लोरा अँड हॉस्पिटॅलिटी लि. या योजनेचे लाभार्थी आहेत. त्यांना सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने तसेच आएफसीआय या केंद्रशासनाचा अंगीकृत व्यवसाय असलेल्या वित्तसंस्थेने आणि कर्नाटक शासनाच्या कल्याण खात्याने (केएफसीआय) वित्तपुरवठा केला.

सन २०१४ -१५ ने सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाने अनुसुचित जातींकरिता साहसी भांडवल योजनेची निर्मिती केली. या योजनेअंतर्गत उद्योजाकांना विविध फायदे मिळाले आहेत. त्याचप्रमाणे उद्योजकांना आर्थिक सबलता प्राप्त करण्यासाठी मदतही मिळाली आहे.

अनुसुचित जातींसाठीच्या साहसी भांडवल निधी योजनेची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

१) भारतातील अनुसुचित जातीमध्ये उद्योगशीलता निर्माण व्हावी म्हणून राष्ट्रीय स्तरावर सामाजिक क्षेत्राने या कामी पुढाकार घेतला आहे.

२) अनुसुचित जातींमधील उद्योगशीलतेला प्रेरणा देण्याकरिता त्याचप्रमाणे जे नवनाविन्य आणि प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करु इच्छितात. अशांसाठी ही योजना आहे.

३) अनुसुचित जातींमधील उद्योजकांना अल्पदरात वित्तपुरवठा करणे. त्यातून अधिकाधिक संपत्तीची निर्मिती होईल, तो एक नफा कमविणारा उद्योग ठरेल. निर्मिती झालेल्या मालमत्तेमुळे अनुशेष भरुन काढता येईल तसेच त्या विभागामध्ये उद्योजकांचे जाळे निर्माण होईल.

४) अनुसुचित जातींमधील उद्योजकांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त होईल आणि त्यांच्या माध्यमातून त्या समाजातील लोकांचा अधिकाधिक विकास साधता येईल.

५) अनुसुचित जातींमधील उद्योजकतेचा आर्थिक विकास साधणे.

६) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करुन अनुसुचित जातींमध्ये उद्योगशीलता निर्माण करणे.

■■■




पृष्ठे १०४० ₹ ५२५

# के'सागरीय संदर्भ

- आई-वडिलांनी अभ्यासलेले अन् मुलांच्या हाती सोपविलेले, ३५ वर्षांचा इतिहास असलेले संदर्भ..
- अधिकाऱ्यांच्या पिढ्यानुपिढ्या घडविणारे संदर्भ..
- १९८६ पासून एमपीएससीत पहिल्या येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने अभ्यासलेले संदर्भ...

**३५ वर्षांच्या प्रदीर्घ लेखनानुभवातून आता साकारलीयत– नव्या अभ्यासक्रमाचा परामर्श घेणारी आयोगाच्या नव्या प्रश्नधर्तीनुसार व वाढलेल्या काठिण्यपातळीनुसार रचना केलेली पुस्तके... ...ज्यांना पर्याय नाही!**

## सूट 20% ते 50%




| | | |
|---|---|---|
| पृष्ठे १२० ₹ ९५ | पृष्ठे १९२ ₹ १४५ | पृष्ठे ५३६ ₹ ३४५ |
| पृष्ठे २४८ ₹ १७५ | पृष्ठे १६८ ₹ १२५ | पृष्ठे २९६ ₹ २३५ |
| पृष्ठे ४७२ ₹ २९५ | पृष्ठे ५१२ ₹ ३७५ | पृष्ठे ९६८ ₹ ५५० |

स्पर्धा पुस्तकांसंदर्भात योग्य मार्गदर्शन करू शकणारे अभ्यासू विक्रेते
**सर्व स्पर्धा परीक्षांची सर्व प्रकाशनांची**
**सर्व पुस्तके असणारी महाराष्ट्रातील दोन स्वतंत्र दालने–**

**K'Sagar बुक सेंटर**
**K'Sagar बुक्स एजन्सीज्**
**K'Sagar's हाऊस ऑफ बुक्स**

**अप्पा बळवंत चौक, पुणे**
८०८७७२२२७७, ९५४५५६७८६२/६३,
☎ (०२०) २४४५३०६५/२४४८३१६६

**क्लास कोणताही लावा, यश मिळवायचे असेल तर पुस्तके अभ्यासा के'सागरचीच!**

**Yojana Marathi** (Monthly) **November 2016** **RNI No. MAHMAR/2009/32156** Reg No.G/NMD/137/2016-18 Published Date: 12th **November,** 2016 Date of Posting : 16th **November ,** 2016


# Opinion of some Successful Student MPSC 2015-16




अभिजीत नाईक
(एस.टी. प्रवर्गात प्रथम)
**Dy. Collector**

" माझ्या यशामध्ये माझ्या कुटुंबियांचा आणि सरांच्या सर्व पुस्तकांचा मोलाचा वाटा आहे. सरांनी घेतलेल्या मॉक इंटरव्हूव मुळे मला खुप फायदा झाला. सरांनी विचारलेले प्रश्न तसेच प्रश्न मला आयोगात विचारण्यात आले. "



उमाकांत पारधी
(राज्यात पाचवा) **Dy. Collector**

" माझ्यासारख्या कुठलाही क्लास करण्याची परिस्थिती नसलेल्या ग्रामीण भागातील मुलांसाठी कोळंबे सरांचे Economics, Indian Constitution ही पुस्तके म्हणजे One Stop Solution. महाराष्ट्रातला प्रत्येक विद्यार्थी हा सरांशी पुस्तक रुपाने जोडलेला असतो मग तो सरांचा विद्यार्थी असो वा नसो. "



स्नेहा उबाळे
**Dy. Collector**

When you want something all the universe conspires in helping you to achieve it.... and Ranjan Sir and his Bhagirath Academy provided the requisite universe for me.



संदिप मिटके **Dy. SP.**

" माझ्या यशाचे संपूर्ण श्रेय श्री. रंजन सर आणि माझ्या कुटुंबाला जाते. रंजन सरांच्या मार्गदर्शनाचा मला परीक्षेच्या Prelim, Main आणि Interview या तिन्ही टप्प्यावर खूप फायदा झाला. संवाद कसा साधायचा आणि कोणत्याही बाऊंसवर शांत कसे रहायचे हे सरांकडून शिकलो. त्यामुळेच मी Jack of everything, though master of none बनू शकलो. Thank you so much Sir.... "



अनुराधा गुरव **Dy. SP.**
(ओबीसी मुलींमध्ये प्रथम)

" मी फक्त कोळंबे सरांचीच विद्यार्थीनी आहे. Pre पासुन Interview पर्यंत रंजन सर हे असे एकमेव व्यक्तीमत्त्व आहे की, जे स्वत: UPSC, MPSC चे लेक्चर स्वत: घेतात. सोबत सेमीनार घेतात, दर्जेदार पुस्तके लिहितात इतके असुनही UPSC, MPSC चे मॉक इंटरव्हूव सुद्धा घेतात. रंजन सर हेच खरे आमचे प्रेरणास्त्रोत! त्यांनी रचलेल्या पायावरच आम्ही आमची यशाची इमारत उभी




धनंजय पाटील
**Dy. SP.**

" सरांच्या Teaching चा आणि सर्व पुस्तकांचा माझ्या यशामध्ये प्रचंड मोलाचा आहे. जवळ-जवळ सर्वच विषयांसाठी मी श्री. रंजन कोळंबे सरांचीच पुस्तके वाचली आहेत. सरांच्या Interview चा मला खुप फायदा झाला. One Man Army आहेत सर मी सरांचे आभार मानतो आणि भगीरथच्या पुढील वाटचालीस खुप शुभेच्छा... "

# UPSC I MPSC

**श्री. रंजन कोळंबे सर लिखित भगीरथ प्रकाशनाची दर्जेदार पुस्तके...**




सुधारीत १२ वी आवृत्ती नोव्हेंबर २०१६

सुधारीत २ री आवृत्ती ,फेब्रुवारी २०१७




**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197 | 7378406920**
***Web :*** www.bhagirathacademy.com
***E-mail :*** bhagirathacademypune@gmail.com
***Facebook :*** Bhagirath IAS Academy


Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.